# अंकुश शिंगाडे

# धर्मयोगी



## या मित्रांनो! सुंदर पुस्तकांचा मनमुराद आनंद लुटा!!

# धर्मयोगी

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

## पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# धर्मयोगी

(कादंबरी)

अंकुश शिंगाडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# धर्मयोगी

लेखक : अंकुश शिंगाडे

फ़ोन – ९३७३३५९४५०

पत्ता : अंकुश शिंगाडे- १२२बी, गजानन नगर, भरतवाडा, कळमना मार्केट रोड,
नागपूर. महाराष्ट्र

ईमेल - geetshingade454@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

**e**sahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळण्यासाठी आपले नाव व गाव कळवा)

प्रकाशन: १५ ऑगस्ट २०२४



©esahity Pratishthan®2024

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

**हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.**

# धर्मयोगी नावाच्या पुस्तकाविषयी

धर्मयोगी नावाची पुस्तक वाचकांच्या हाती देतांना मला अतिशय आनंद होत आहे. तशी धर्मावरील मी एक पुस्तक धर्मांतरण नावाची यापुर्वी वाचकांना दिलेली आहे. त्याच अनुषंगानं ही देखील पुस्तक मी वाचकांसाठी खास पर्वणी म्हणून लिहिलेली आहे. ही पुस्तक प्रेमावर आधारीत आहे. असं प्रेम की ज्याची आपण कल्पना करु शकत नाही.

प्रेमाविषयी सांगायचं झाल्यास प्रेमाच्या कथा आपण बऱ्याच वाचलेल्या आहेत. बऱ्याच चित्रपटांमधून पाहिलेल्या आहेत. काहींच्या तोंडून ऐकलेल्या आहेत. परंतु असंही एक प्रेमाचं कथानक असू शकते की ज्यानं आपलं मत छिन्नभिन्न होईल. मनात विचारांचं वादळ सुटेल. लोकं तर्क वितर्क करु शकतील. परंतु ते गुपीत प्रेम आहे. आता ते प्रेम कशाचं आहे? मित्र मैत्रीणीचं की आणखी कशाचं आहे? यासाठी ही पुस्तक वाचावी लागेल. शिवाय ही पुस्तक वाचल्यावर आपल्या मनातील बऱ्याच शंकांचे समाधान होईल.

या पुस्तकाबद्दल आणखी सांगायचं झाल्यास ही पुस्तक भारत पाकिस्तान फाळणीवर आधारीत असून यातील पुर्णच भाग हा काल्पनिक आहे. त्याचा सत्याशी संबंध जोडू नये. कारण सत्य हे काल्पनीक आहे. महत्वपुर्ण बाब ही की दोन्ही देश चांगले असून केवळ पुस्तक लिहिण्यासाठीच काही बाबींची तुलना केलेली आहे. जी तुलनाही काल्पनिकच आहे. हे विशेष करुन सांगतो.

या पुस्तकाच्या शिर्षकाविषयी सांगतांना मी एवढंच सांगेन की या पुस्तकाच्या शिर्षकाविषयी बराच संभ्रम माझ्या मनात होता. माझे मित्र सुनील वाडेंशी मी कथानकाच्या माध्यमातून चर्चा केली. यातील काही काही भाग त्याच चर्चेतून साकार झालेले आहेत. त्यांनी या कथानकाला धर्मयोगी शिर्षक त्यांनी सुचविलं होतं. परंतु माझ्या मनात गुपीत

प्रेम असं शिर्षक द्यायचं होतं. तसं पाहिल्यास माझी चर्मयोगी नावाची यापुर्वी एक पुस्तक निघालेली आहे. त्यामुळंच मला धर्मयोगी हे नाव पटलं नाही. तसंच गुपीत प्रेमही आवडलं नाही. कारण त्यातून एकच अर्थ निघत होता. तो म्हणजे प्रेमाचा. मला अनेक अर्थ निघणारं शिर्षक हवं होतं. त्यामुळंच एक वेगळंच नाव ओढ ठेवलं. ज्या शिर्षकातून अनेक अर्थ निघतात. परंतु ओढ नावाची एका लेखकाची पुस्तक प्रसिद्ध असल्यानं मला या पुस्तकाचं नाव बदलवून नाईलाजानं धर्मयोगी ठेवावं लागलं.

या पुस्तकाविषयी सांगायचं झाल्यास या पुस्तकात ओढ शिर्षकाअंतर्गत तीन अर्थ आहेत. ते हळूहळू आपल्याला पुस्तक वाचल्यावर समजेलच. ते धर्मयोगी नावानं समजणार नाहीत. शेवटी एकच सांगतो की शिर्षक कोणतेही का असेना, त्यातील कथानक व कथानकाचा अर्थ समजला म्हणजे झालं. आपण ती पुस्तक वाचावी व ते अर्थ कोणते? हे जाणून घ्यावेत ही विनंती. ही माझी एकोणसत्तरावी कादंबरी असून छयान्नवी प्रकाशित पुस्तक आहे. ही पुस्तक आपल्या आशिर्वादाची वाट पाहात आहे. आपण तो द्यावा व आवडल्यास एक फोन अवश्य करावा ही विनंती..

**अंकुश शिंगाडे, नागपूर , ९३७३३५९४५०**

ही कादंबरी

सर्व प्रेमिकांना

आदरपूर्वक समर्पित

# धर्मयोगी

(कादंबरी)

## अंकुश शिंगाडे

ही कादंबरी काल्पनिक असून या कादंबरीतील स्थळे, व्यक्ती व घटना काल्पनिक आहेत. त्यात कोणाच्याही भावना दुखाविणे हा हेतू नाही. कोणाही स्थळ, व्यक्ती वा घटनेशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध नाही. तसा तो आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

.

# धर्मयोगी

## कादंबरी

## भाग एक

## अंकुश शिंगाडे

ती निरतिशय प्रेम करीत होती त्याचेवर. तशी ती बालपणाची त्याची मैत्रीण. त्याच्यावर जीवापाड प्रेम करणारी. त्यातच त्यांच्यात पुढील काळात प्रेम निर्माण झालं व त्याचं रुपांतर हाताची नस कापण्यात झालं.

ती त्याचेवर प्रेम करीत होती निरतिशय. परंतु तो तिच्यावर प्रेम करीत नव्हता. अशातच त्याचं दुसऱ्या एका महिलेसोबत अफेअर सुरु झालं होतं. ती महिला होती धर्म. ती गोष्ट झाकून होती बरेच दिवसपर्यंत. परंतु कालांतरानं ती गोष्ट तिला माहिती झाली. मग काय ती त्याला बरीच बोलली. त्यावेळेस त्यानं तिला असे काही शब्द म्हटले की त्या शब्दाचा तिच्यावर आघात होवून तिनं आपल्या हाताची नस कापून स्वतःला दुखापत केली होती.

शर्मिला नाव होतं तिचं. ती आता या जगात होती. ती देवाघरी निघून गेली नव्हती एवढ्याशा चुकीनं. चूक तिची होती की तिची ती चूक आज तिला कळत नव्हती. ती आता म्हातारी झाली होती व मरणाची वाट पाहात होती. परंतु तिला मृत्यू येत नव्हता. तो मृत्यू यावा यासाठी तडपत होती तरी. तो मात्र मरण पावला होता, अपघातात. त्याचं नाव आबेद होतं.

धर्म...... तो धर्मावरही प्रेम करीत होता निरतिशय. त्याचं तिच्यावर तर प्रेम होतंच. परंतु त्याच्या दृष्टीनं त्याला धर्मही प्रिय होता. त्या धर्मापुढं त्याच्यासाठी प्रेम वैगेरे वायफळ गोष्ट होती. परंतु जेव्हा त्याच्या लक्षात आलं की ज्या धर्मावर तो प्रेम करतो, तोच धर्म त्याला आपला मानत नाही. तेव्हा त्याला पश्चाताप झाला व त्याला प्रेम आठवलं. परंतु तेव्हा वेळ निघून गेली होती. ज्याची परियंती अपघातात झाली होती. परंतु अपघात कसा झाला? त्याला पश्चाताप का झाला? वैगेरे प्रश्न आजही अनाकलनीयच होते.

आबेदचं बालपण अतिशय थाटामाटात गेलं होतं. त्यातच त्याला अगदी छान वाटत होतं. त्याच्या बालपणात रमणीयत्व होतं.

आबेदच्या बालपण हे कोकणात गेलं होतं. तेथील निसर्गरम्य वातावरण व त्या वातावरणात येत असलेली मजा रमणीय होती. ती मजा पाहिली की कोणालाही कोकणातच जावून राहावंसं वाटत असे. कोकणात संततधार पडणारा पाऊस. जो पाऊस थेंब थेंब स्वरुपात येत असे. जो पाऊस शेतात, बागेत व मैदानात पडत असे. तेथे पडून त्या ठिकाणाहून हिरवगार गवत उगवायचं. जे गवत मखमल

अंथरल्यासारखंच दिसायचं. जे गवत पाहून एखाद्यानं गालिचं अंथरुणच पसरवल्यासारखं वाटायचं.

कोकणात पडणारा पाऊस नदी नाल्यातही आणि कोकणात विस्तीर्ण पसरलेल्या समुद्रातही पडायचा. तो पाऊस पावसाळ्यात पडायचा व पडल्यानंतर लोकांना थंडावा प्रदान करायचा. ज्यामुळं बेडकासारखे प्राणी, मोर या सर्व प्राण्यांना आनंद व्हायचा. तो आनंद पाहिला की पावसालाही अतिशय आनंद होत असे व तो आपल्या थेंबाचा वेग वाढवीत असे. त्यानंतर तसा पाऊस पडायला लागला की मोर आपला पिसारा फुलवून थयथय नाचत असे आणि बेडकं आपल्या मंजूळ आवाजानं गाणी गात असत. त्यातच पावसात एकदा तरी भिजावे. असं आबेदला वाटत असे.

पावसाळा......... पावसाळा कुणाला आवडतो तर कुणाला अजिबात आवडत नाही. कारण पावसाळ्यात संततधार पाऊस पडत असतो. त्यातच लहान मुलं बाहेर निघून पावसात भिजलीच तर आई वडील सारखे ओरडत असतात. म्हणत असतात की बाहेर निघू नकोस. पावसात भिजशील. अन् तेच घडतंही. बाहेर पावसात निघालो आणि भिजलोच तर सर्दी पडसं होतं आणि विनाकारणच खर्च मायबापांवर पडतो. जे काबाडकष्ट करुन पैसे मिळवीत असतात.

पावसाळ्याबद्दल सांगायचं झाल्यास कालही आबेद पावसात भिजत होता. त्याचा जन्म ग्रामीण भागातील. त्याचं गाव ग्रामीण असल्यानं त्या काळात गावात रस्तेही नव्हतेच. शिवाय गावात एक शाळा होती. ती घरापासून थोडी लांबच होती. तसं पाहिल्यास जास्त रहदारीही नव्हतीच. मधली सुट्टी शाळेला व्हायची. तेव्हा तो घरी जेवायला यायचा. त्यातच दुपारी पाऊस आला तर मग त्याची मजाच मजा.

त्याला पावसाची चिंता वाटायची नाही. उलट मजाच वाटायची. मग तो शाळेत गेलाच आणि मधली सुट्टी झालीच तर तो त्याच्या बाईला न घाबरता चक्कं पावसात घराकडे त्या तेवढ्या पावसात धुम्म पळत सुटायचा. अन् घरी गेल्यावर आई ओरडायची. केसं पुसून द्यायची. म्हणायची की असं येत जावू नकोस. सर्दी होईल. आजारी पडशील. परंतु ते बोलणं मनावर घेत नव्हता तो. कारण त्यावेळेस आजार त्याच्या पाचवीलाही शिवत नव्हताच. याचा अर्थ त्याला आजार होत नसेल काय? आजार होतच होता. सर्दी सदोदीत राहायची आणि ती सर्वांनाच असायची. त्यामुळंच त्याचा बाऊ वाटायचा नाही. तशी आई नेहमीच म्हणायची. शेंबूड काढून टाकत जा. रुमालानं पुसत जा. परंतु ऐकतो कोण? सारखं सर्वांचं शाळेत फुरक फुरक करणं सुरु असायचं. परंतु तसं असलं तरी डॉक्टरचं तोंड पाहात नव्हता तो, वर्ष न् वर्ष.

शाळेच्या मधल्या सुट्टीत जेवणाला घरी आलाच तर आई जेवन झाल्यावर कपडे बदलवून पाऊस येत असेल तर छत्री द्यायची व तो ती छत्री घेवून शाळेत निघायचा. परंतु ती छत्री आईला दाखविण्यापुरतीच असायची. एकदा काय घरातून बाहेर पडलाच की बस. तो ती छत्री बंद करीत असे आणि बंद्या पावसात पावसाची मजा घेत धावत पळत शाळेत जात असे. तशी त्याची बाई देखील छानच होती. ती तो भिजलेला शाळेत गेलाच तर त्याला सुट्टी द्यायची. मग संपूर्ण दिवस आनंदात जायचा. त्यामुळंच पावसात भिजण्याचा आनंद काही औरच असायचा आबेदच्या जीवनात.

आबेद पावसात भिजत असे. अलबत पाण्यात उतरत असे आई ओझल होताच. त्यावेळेस आई म्हणायची, "बापू, पाण्यात जळू असते. ती रक्त पिते. ती

एकदा का अंगाला चिकटली की पुर्ण रक्त पिल्याशिवाय सोडत नाही. मग माणूस मरतो." तेव्हा थोडीफार भीती वाटायची. परंतु पुढल्याच क्षणी मित्र म्हणायचे, "अरे, जळू काही करीत नाही. ती अंगाला चिकटलीच तर तिच्या तोंडावर मीठ टाकायचं. ती पळते." असं मित्रानं सांगताच मित्रांबरोबर तोही त्याच्या खिशात मीठ ठेवत पावसात फिरत असे. त्यातच पावसाची त्याला अजिबात भीती वाटत नव्हती.

तो पाऊस...... तो पाऊस आलाच तर रस्त्यारस्त्यावर पाणी गोळा व्हायचं. त्यात पाय बुडायचे. परंतु त्या पाण्यातून घोड्यासारखं धावतांना जी मजा येत असे. ती आता येत नव्हती. लहानपणी भीती वाटायची सापाची. परंतु तिही भीती कालांतरानं लहानपणीच नष्ट झाली होती. पावसाळ्यात गावात लपायला येणारी माकडं बंद पावसात हाकलून लावायला मजा यायची. ती आता येत नव्हती. व्यतिरीक्त अलिकडचे आजार हे लहान मुलांच्या पाचवीलाच पुजलेले दिसत होते. शिवाय साधी सर्दी जरी झाली तरी आपल्या मुलाचा आजार वाढू नये. म्हणून त्याला ताबडतोब रुग्णालयात नेणारे पालक आज दिसत होते. त्याचं कारण म्हणजे आज साधी सर्दीही जीवघेण्या स्वरुपाची ठरत होती. तसं काल नव्हतं.

आबेदला पावसाळा आवडायचा. कारण त्याला त्या काळात पावसातच खेळायला मजा यायची. आजही पावसाळा आवडत होता. कारण आजचा पावसाळा त्याला अन्नधान्य पुरवत होता. अंगात घालायला कापड देत होता. राहायला एक लहानसं घरही देत होता. परंतु पाऊस जर आलाच नाही तर झाडं दिसणार नाही. सगळीकडे हिरवळ दिसणार नाही. अन्नधान्य पिकणार नाही. कापूस पिकणार नाही. मग पोटाला अन्न, घालायला कापड आणि राहायला घरही कदाचीत नशिबात नसेल, अशी आपली स्थिती होवून जाईल. असं आज आबेदला वाटत

होतं. तेव्हा सर्वांनाच तो सांगत असे की पावसाला कोणीही हिणवू नये. त्याचं स्वागतच करावे. तो जर आला तर त्याला अलगद ओठावर टिपावं. त्याच्या पडणाऱ्या सरीत स्वतःला न्हाऊन टाकावं. तसेच ते पावसाचे थेंब न् थेंब अलगद गिळावे. ज्यातून आपलीच रोगप्रतिकारक शक्ती वाढू शकेल. म्हणतात ना की पाऊस जर अंगावर गेलाच तर शरीरातील उष्णता पुर्णतः निघून जाते व आपण वर्षभर आजारी पडत नाही. अगदी तसंच आपण पावसाची तमा न बाळगता वागावं. एकदा तरी पावसात पुर्ण भिजावं आणि पावसाचा आनंद घ्यावा म्हणजे झालं.

आबेदला जसा पाऊस आवडत असे. तसा शर्मिलालाही पाऊस आवडत असे. त्या पावसात भिजण्याचा तिलाही आनंद वाटत असे व तिही त्या पावसात त्याचबरोबर भिजत भिजत आपले दिवस काढू लागली होती. लहानाची मोठी होवू लागली होती. त्यातच त्यांच्यात केव्हा प्रेम निर्माण झालं तेही त्यांना कळलं नाही.

कोकणात तसा जास्तच पाऊस पडायचा. तो सतत पडत असे आणि तो पडलाच तर नारळाच्या झाडावरून अलगद त्याचे तृषार ओसंडून खाली पडत. ते पाहून सुपारीची झाडं हसायची.

समुद्र तर पावसाळ्यात खवळलेलाच असायचा. तो ऐकायचाच नाही कुणाचंही. कारण त्याला त्याच्या नदीरुपी बहिणी भेटायला यायच्या. त्या भेटायला येतांना आपल्यासोबत काही वस्तूही आणायच्या. त्यानं तो आपलं अंग फुगवून टाकायचा. तो चार महिने आपलं अंग फुगवूनच ठेवायचा. ते त्याचं अंग फुगवणं पाहिलं की त्याच्याशी कुणालाही या पावसाळ्यातील चार महिने बोलावसं वाटत नसे. तसं पाहिल्यास कोणीही पावसाळ्यात त्याच्याशी बोलत नसे व त्याला

भेटायलाही जात नसे. मग नारळी पौर्णिमा आली की समुद्राच्या बहिणी आपल्या माहेरला परतत असत. त्यानंतर सगळेजण समुद्राला नारळ अर्पण करीत व भेटायला जात. कारण त्यावेळेस तो दुःखी असायचा, त्याच्या बहिणी माहेराला परतल्या असल्यानं. जणू त्याचं एकाकीपणाचं दुःख दूर करण्यासाठीच.

************************

आबेद व शर्मिला कोकणात राहात होते. बालपण त्यांचं कोकणात जात होतं. त्या दऱ्याखोऱ्यात फिरतांना व चोरवाटा न्याहाळतांना त्यांना मजा वाटायची. त्यातच आबेद हा मुस्लीम जरी असला तरी शर्मिलाला त्याचं गैर वाटत नव्हतं. तो स्वातंत्र्यापुर्वीचा काळ होता. देशात स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले होते. मुस्लिमांनाही स्वातंत्र्य हवं होतं. त्याचबरोबर हिंदूनाही स्वातंत्र्य हवं होतं.

तो कोकणचा प्रदेश अतिशय रमणीय असा प्रदेश होता. आबेद व शर्मिलाच्या गावाला लागून अरबी समुद्र होता. या अरबी समुद्रात मासेमारी फार चालत असे. कधीकधी आबेदला त्याचे वडील मासेमारी करण्यासाठी समुद्रात खोलवर नेत असे. शिवाय आबेदही आवडीनं जात असे मासे पकडायला.

आबेदचे वडील व शर्मिलाचे वडील एकमेकांचे घनिष्ठ मित्र होते. ते एक पान वाटून खायचे. त्यातच गावात इतरही बरेच मुस्लीम होते. ज्यांचे हिंदूशी घनिष्ठ संबंध होते. तेही सर्वजण गावात अगदी एकोप्यानं राहात असत. ना हिंदू मुस्लीमांचा राग

करायचा ना मुस्लीम हिंदूंचा. त्यातच जे गाव होतं. त्या गावातील एकोपा इतरांना लाजविणाराच होता. अशातच सामाजीक बदलाचे वारे सुरु झाले.

सामाजीक बदलानुसार इंग्रजांनी डाव साधला. त्यांनी एक सभा भरवली. ज्यात केवळ इंग्रजच होते. त्यांनी गुप्त मसलत केली. मसलत होती, हिंदू मुस्लीमात फुट टाकणे. त्यानंतर विचारविमर्श झाला व फुटीची योजना बनवली गेली. त्यानंतर दुसरी सभा इंग्रजांनी भरवली. ज्यात काही मुस्लीम नेत्यांना बोलावण्यात आले व सांगीतलं गेलं की हे हिंदू तुमचे शत्रूच. ते आजचे शत्रू नाहीत, तर बऱ्याच वर्षांपासूनचे शत्रू आहेत. असं सांगत असतांना याच काही मुस्लीम नेत्यांना त्यांच्याच बिरादरीतील मुस्लीम राज्यकर्त्यांना हिंदू शासकांनी कसं मारलं. कशी हत्या केली याचा इतिहास दोन हात वाढवून सांगण्यात आला. ज्यात राजा दाहिरच्या मुलींनी कसा बदला घेतला? अफजलखानाला कसे मारले? शायिस्तेखानाची चार बोटं कशी कापली? या इतिहासाचा समावेश होता.

इंग्रजांनी जशी मुस्लीम नेत्यांची सभा घेतली व सांगीतलं की त्यांच्या पुर्वजांची हिंदूंनी हत्या केली. तशीच दुसरी सभा हिंदूंचीही घेतली. ज्यात बयाण केलं की मुस्लीम राज्यकर्त्यांनी तुमच्यावर अतिशय क्रूर असा अत्याचार केलेला असून त्यांनी तुमच्या धर्मातील राजा दाहिरची हत्या केलेली आहे. कित्येक हिंदू लोकांना ठार केलं आहे. पृथ्वीराज चव्हाणची हत्या केली आहे. नालंदा तक्षशिलेसारखी तुमची वाचनालयं जाळलेली आहेत. संभाजी आणि कवी कलशांना अतिशय क्रुरपणे मारलं आहे. तुमची देवळं पाडली आहेत. कित्येक विधवा स्रियांना भ्रष्ट केलं आहे. काहींना सती जावं लागलं आहे मुस्लीम राज्यकर्त्यांच्या धाकाने.

इंग्रजांनी जसं मुस्लिमांना सांगीतलं की हे हिंदू तुमचे आजचे नाही तर फार पुर्वीच्या कित्येक पिढ्यांपासूनचे शत्रू आहेत. तसंच त्यांनी हिंदूंना मुस्लीम हे तुमचे आजचे नाही तर फार पुर्वीपासूनचे शत्रू आहेत. हे इंग्रजांनी अतिशय अक्कल हुशारीनं सांगीतलं. त्यातच वर्तमान परिस्थिती न पाहता हिंदू भडकले. तसे मुस्लीमही भडकले आणि अशातच एक तात्कालिक कारण घडवलं. ते कारण म्हणजे कायदे. त्यांनी जे जे कायदे बनवले. त्या त्या कायद्यात मुस्लिमांच्या हिताचा विचार केला. हिंदूंना डावलून टाकलं. मग जनमत खवळलं. त्याचा भडका हिंदू मुसलमान एकता तोडण्यात झाला. परंतु तो इंग्रजांचा डाव सहजासहजी ना हिंदूच्या लक्षात आला. ना मुस्लिमांच्या. इंग्रज चाल चालत राहिले आणि त्यात फसत गेले हिंदू मुस्लिमांचे नेते.

हिंदू मुस्लीमांची असलेली एकता. हिंदू मुस्लिमांची एकता पाहिली व त्यांनी विचार केला. विचार केला की ही एकता तोडायला हवी. ही एकता जर तोडली नाही तर आपल्याला तमाम हिंदूस्थानावर राज्य करता येणार नाही. त्यानंतर त्यांनी पाहिलं की हिंदूंची संख्या अफाट आहे. मुस्लिमांची कमी. मग आपण त्यांना भडकवावं. जेणेकरुन ते जर भडकले तर ते एकमेकांशी नक्कीच भांडतील. तसेही या देशातील काही लोकं मूर्खच आहेत की जे चांगला विचार करीत नाही. आपण मुस्लीम नेत्यांच्या मनात असा विश्वास निर्माण करावा की ते आपलं ऐकतील. ज्यातून हिंदू मुस्लिमात फुट पाडली जाईल.

विचाराचा अवकाश. इंग्रजांनी जे हिंदू मुस्लीम एकता तोडण्यासाठी पाऊल उचललं. ते यशस्वी पाऊल ठरलं. ज्यातून हिंदू मुस्लीम एकता तुटली. तद्नंतरच्या काळात तोच द्वेष धुमसत गेला. तशी मुस्लिमांची पाठराखण इंग्रज करीतच होते. मग इंग्रजांनी मुस्लिमांना शह देत काही नेत्यांना हाताशी धरुन सांगीतलं की तुम्ही स्वतंत्र

पाकिस्तान मागा तर काहींना सांगीतलं की तुम्ही पाकिस्तान मागणीचा विरोध करा. तिथंही मुस्लीम मुस्लीमात फुट पाडली गेली. मग ठरलं. भारत स्वातंत्र्य मागतंय ना. सहजासहजीच देवू. परंतु ते भांडत राहावेत सदैव. आम्ही गेल्यावर त्यांचेही मुदडे पडावेत. मुस्लिमांनी मुस्लीमांचेच मुदडे पाडावेत. तसेच मुदडे हिंदूंचेही मुदडे पाडावेत आणि हिंदूंनी हिंदूंचे मुदडे पाडावेत. असे करीत असतांना त्यांनी मुस्लिमांचेही मुदडे पाडावेत. ही आग. ही आग लावली इंग्रजांनी. ज्यात ते यशस्वी झालेत आणि इथं हिंदू मुस्लीम भांडत बसले.

आबेद लहान असतांना सामाजीक क्रांती झाली असल्याचं चित्र होतं. आबेदचा बाप फकरुद्दीन हा तसा कमी शिकलेला होता. गावात मुस्लीम समाज तसा जेमतेमच होता. गावातील व्यवसाय मासेमारी होता. काही लोकं सुपारी, फणस, हापूस आंबा व नारळाचीही शेती करीत. ते आपल्या शेतात मजूरीला फकरुद्दीन व त्याची पत्नी झैबुन्नीसाला बोलवीत आणि फकरुद्दीनही जेव्हा समुद्रात मासे पकडायला जात असे. तेव्हा तोही काही हिंदूंना सोबत घेवून जात असे. अशातच त्या गावात एक अनामीक मुस्लीम व्यक्ती आला. त्यानं संपुर्ण मुस्लीम बिरादरीला सांगीतलं की हे सर्व हिंदू आपले शत्रू आहेत.

इंग्रजांनी पाडलेली फुट. स्वातंत्र्य द्यायचंच. परंतु हिंदू मुस्लीम भांडायला हवेत. त्यांनी एकमेकांचे मुदडेही पाडायला हवेत. परंतु त्यात आमचं नाव समोर येवू नये. आम्ही पदड्यामागचं राजकारण करु. असा राजकारणी डावं. त्यांनी पेरलेलं दुहीचं बीज. मग काय, मुस्लिमांनी आपला एक दूत लागलीच गावागावात, शहराशहरात आपल्याच बिरादरीत पोहोचवला. ज्यानं सांगीतलं,

"आजपासून हिंदूंशी संपर्क ठेवूच नये. ते आपले शत्रू आहेत. गतकाळातील फार पुर्वीपासूनचे असलेले शत्रू. त्यांनीच आपल्या मोहम्मद बिन कासीमला ठार केलं. त्यांनीच अफजलखानाचीही हत्या केली आणि त्यांनीच शायिस्तेखानाचीही चार बोटं कापली."

त्या दुतानं सांगीतलेल्या गोष्टी. परंतु असं त्यांनी का केलं? हे त्या दुतानं सांगीतलं नाही. शिवाय जो कोणी आजपासून हिंदूंशी संपर्क ठेवेल. बोलेलं. त्याला वाळीत टाकलं जाईल. त्याचेशी संपर्क तोडला जाईल. असंही तो दूत म्हणाला.

गावागावात व शहराशहरात जसा मुस्लीम नेत्यांनी आपला आपला एक दूत पाठवला होता. तसा हिंदूंनीही आपला एक दूत गावागावात व शहराशहरात पाठवला व त्यानंही तेच व्यक्त करावं हे सांगीतलं. मग हिंदूंचा दूत आला. त्यानंही तोच इतिहास आळवला.

"मुस्लीम आपले जुने शत्रू आहेत. त्यांनी राजा दाहिरची हत्या केली. पृथ्वीराज चव्हाणची हत्या केली. संभाजी महाराजांची हत्या केली. ताराबाईंना भयंकर त्रास दिला. एवढंच नाही तर कित्येक स्त्रियांच्या अब्रू लुटल्या आणि कित्येक स्त्रियांना जोहार करायला भाग पाडलं."

इंग्रज बोलून गेले. तशी आग लागली होती. त्यातच मुस्लीम खवळले होते व हिंदूही खवळले होते. ज्यातून हिंदू मुस्लीम एकता तुटली. मग मुस्लीम स्वतंत्र्य पाकिस्तानची मागणी करु लागले होते आणि हिंदूही मुस्लिमांचा द्वेष करु लागले होते. त्यांना वाटत होतं की हे मुस्लीम पाकिस्तानात जावे. त्यातच कोणी मुस्लिमांना पाकिस्तानात का हाकलता, ते आपलेच भाऊ आहेत. असे म्हणत असत. परंतु

कोणी तसं म्हटल्यास भयंकर राग यायचा त्यांना. त्यातच ते बोल ऐकणारे हिंदू त्यांची हत्याच करुन टाकायचे.

पावसाळा नुकताच सुरु झाला होता. युद्ध सुरु झालं होतं. महात्मा गांधी तसेच तत्सम नेत्यांनी आम्ही युद्धाला मदत करतो. परंतु युद्ध समाप्तीनंतर आम्हाला स्वातंत्र्य द्या असे म्हटले होते. त्यानंतर इंग्रजांनी मान्यही केलं होतं. परंतु इंग्रजांना सहजासहजी स्वातंत्र्य द्यायचंच नव्हतं.

मुस्लिमांनी गावागावात पाठविलेला दूत आबेदच्याही गावात कोकणात आला होता. त्यानं म्हटलं की आबेदच्या वडीलानं हिंदूशी संबंध ठेवू नये. ते आपले फार पुर्वीपासूनचे शत्रू आहेत आणि संबंध ठेवलेच तर आम्ही तुम्हाला आमच्या बिरादरीतून काढून टाकू.

ती मुस्लीम वस्तीत झालेली सभा. त्या सभेत पारीत झालेला ठराव. त्यातच सर्व मुस्लीम समुदायांनी ठरवलं. आपण हिंदुंशी संबंध ठेवू नये. आपण हिंदुंशी व्यवहार करु नये. त्यांच्या घरी जावू नये. त्यांना आपल्या घरी येवू देवू नये. त्यांना आपल्या घरातील कोणत्याही समारंभाला बोलावू नये. आपणही जावू नये. कारण आपण जर त्यांच्याशी संबंध ठेवला आणि आपल्या बिरादरीतील लोकांना माहीत झालं तर ते आपल्याला वाळीत टाकतील.

सभा झाली होती व त्या सभेनुसार ठरलं होतं की आपण हिंदूंच्या घरी जावू नये. सभासमारंभातही जावू नये. व्यवहार करु नये व संबंध ठेवू नये. मग काय सारेच मुस्लीम फारकतीनं वागू लागले होते. त्यातच तशाच प्रकारची सभा हिंदू वस्तीतही

झाली होती. त्यानुसार हिंदूंनीही ठरवलं होतं की आपणही मुस्लिमांना मदत करु नये. कारण बिरादरी नाराज होईल.

दोन्ही धर्माचे दूत आपआपल्या धर्मातील लोकांना काही गोष्टी सांगून गेले होते. त्याचे नियम ठरवले होते. ते नियम काही लोकांना मान्य होते तर काही लोकांना मान्य नव्हते. त्याचा फार त्रास होत होता.

शर्मिला लहान होती. तसा आबेदही. त्यांना कळत नव्हत्या त्या गोष्टी. धर्म म्हणजे काय व धर्माचे नियम काय? हेही माहीत नव्हतं त्या लहानग्या जीवांना.

ती लहानगी मुलं. ज्यात हिंदू मुस्लीम यांचाही समावेश होता. ते खेळत असत एकत्र त्या आमराईत. जी गावापासून थोड्या दूर अंतरावर होती. चक्करबिल्ला खेळायला त्यांना फार आवडत असे. त्यातच दोन्ही समुदायातील मुलंही लपंडाव, लघोरी, धावण, डाफ यासारखे खेळ खेळायचे. त्यावर त्यांची आई वा वडील सातत्यानं आवर्जून सांगायचे की तुम्ही त्या दुसऱ्या धर्माच्या मुलांसोबत खेळू नका. जर तसे खेळाल तर आपल्या धर्मातील माणसं आपल्याला आपल्या बिरादरीतून काढून टाकतील. परंतु ते आईचं म्हणणं. त्या गोष्टी समजत नव्हत्या त्या सर्वांना. ते ऐकत नसत आपल्या आईवडीलांचं व एकत्रच खेळत असत.

**********************

तो त्रास होताच त्यांना. त्यातच फकरुद्दीनलाही तो त्रास होता. फकरुद्दीन तसा सामान्य माणूस. त्याला वाटत होतं की असं आपल्या मुस्लीम समुदायाने वागू नये.

हिंदू काही आपले शत्रू नाहीत. शत्रू आहेत हे नेते. ज्यांना हिंदू आवडत नाहीत. हिंदू जर वाईट असते तर आपल्याला याठिकाणी राहायलाच जागा मिळाली नसती. आज आपल्याला या देशात ज्या सोयी मिळतात ते यांच्याचमुळे. मग आपण हे का विसरावे? अन् त्रास तो होणारच. त्याला पर्याय नाही. शिवाय आपण विदेशीच आहोत. कुठून तरी आलेले आणि या हिंदुस्थानात आपण सामावले गेलो आहोत. आज कित्येक पिढ्या आपण या हिंदुस्थानात काढल्या आहेत. आता जीव लागला आहे. तसं पाहिल्यास धर्म आपल्या जागी. आपण आपल्या जागी. कारण माणूसकी महत्वाची. परंतु काय करावं. त्रास तर होणारच. तेव्हा शेवटी त्रासालाच आपलं शस्त्र बनवावं.

त्रास.......त्रासाबाबत सांगायचं झाल्यास काही लोकांना भयंकर त्रास होत असतो तर काही लोकांना काहीच त्रास होत नाही. ज्यांना त्रास होत नाही. ते अतिशय भाग्यवान लोकं असतात. अन् ज्यांना अतिशय वेदनादायी त्रास होत असतो. ते कमी भाग्याचे असतात. तसं पाहिल्यास त्रासाचा पुनर्जन्माशी काहीही संबंध नाहीच. कारण काही लोकं पुनर्जन्माला मानत नाहीत. ते पुनर्जन्माला थोतांड असं संबोधतात.

पुनर्जन्म असतो काय? याचं उत्तर होय आणि नाही असं संभ्रमाचं आहे. मागील जन्मात आपल्या काही इच्छा अपुर्ण राहिलेल्या असतात. त्या इच्छा पुर्ण झालेल्या नसतात. त्या पुर्ण करण्यासाठी पुनर्जन्म असतो. असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. पुनर्जन्म हा कुणाच्याही रुपात होवू शकतो. साहजीकच एखादे प्राणी वा पक्षी किंवा एखादं झाड. मग हे प्राणी एखाद्या वेळेस आपल्याला अकस्मात चावा घेतात. त्यानंतर आपलं विधान असतं की मी अमूक रस्त्यानं गेलो नसतो तर तो प्राणी चावला नसता किंवा एखाद्याचा अपघात होतो, एखाद्या गाडीनं.

त्यावेळेसही लोकं म्हणतात की अमूक व्यक्तीनं माझं ऐकलं असतं तर तो मरण पावला नसता. परंतु हे सर्व आपले तर्कवितर्क असतात. त्या व्यक्तीचा मृत्यु हा तसाच ठरलेला असतो. ज्याला कोणी कितीही थांबवलं तरी तो थांबू शकत नाही. हेही काहीसे पुनर्जन्मावर आधारीत असते. जसं मरणाऱ्या व्यक्तीनं मागील जन्मात असंच त्याला तुडवून मारलं असेल. याबाबत एक महाभारतातील उदाहरण आहे. भीष्म पितामहा बाणशय्येवर असतांना विधात्याला विचारतात की मलाच ह्या बाणाची शय्या का? त्यावर विधाता उत्तर देतो,

"आठव की तू तरुण असतांना व राजपद असतांना व तू एका रस्त्यानं लवाजमा घेवून चाललेला असतांना एका सैनिकानं तुला म्हटलं. साप आडवा आला आहे. विशालकाय आहे. काय करावे. त्यावर तू म्हणाला की त्याला बाजूला करा. तसं तुझं ऐकून तुझा आदेश पाळत त्या सैनिकानं त्या सापाला जीवंत असतांनाच दूर फेकलं. ज्यामुळं तो साप एका काटेरी बाभळीवर पडला. ज्यातून त्याला काटेरी बाभळीचे काटे रुतले व अत्यंत करुणेनं व दुखदायी अंतकरणानं तो मरण पावला. तो सापच अर्जुनाच्या रुपानं आलेला आहे, ज्यानं तुला हे बाणरुपी काटे दिलेले आहेत." त्यानंतर भीष्म काय समजायचं ते समजला व चूप बसला.

महत्वपुर्ण बाब ही की आपण जसे कर्म करतो. कुणाला सतवतो. परंतु त्याच आपल्या कर्मानुसार तद्नंतरच्या काळात आपल्याला त्रास होत असतो. म्हणतात की मला किती त्रास आहे. कारण त्रास हा सहन होत नसतो. तो जीवघेण्या स्वरुपाचा असतो. आपण जसे मागील जन्मी कर्म केले. कुणाकुणाला कसाकसा त्रास दिला. तसेतसे ते कर्म याजन्मी आपल्याला छळत असतात. कोणी माणूस बनून छळतो तर कुणी प्राणी वा पक्षी तर कुणी झाड बनून. तसंच आपण जर या जन्मात कोणाला

मदत केली तर पुढील जन्मात तेच घटक आपल्याला मदतही करीत असतात. शिवाय आपल्या इच्छा आकांक्षा या जन्मात पुर्ण न झाल्यास त्या पुढील जन्मातही पुर्ण होवू शकतात. मात्र तुमच्या इच्छा आकांक्षेत काहीतरी दम हवा. जसं रामाला मर्यादा पुरुषोत्तम म्हटलं आहे. कारण त्यांनी सीता नावाची एकच पत्नी केली. जी शेवटपर्यंत पुर्णकालीक त्यांच्याजवळ राहिली नाही. त्यात रामाला भयंकर त्रास झाला. परंतु पुढील जन्मात तो जेव्हा क्रिष्ण बनून आला. तेव्हा त्याला अनेक पत्नींचं सुख प्राप्त झालं. याचाच अर्थ असा की ज्या जन्मात त्याला पत्नीविरह सहन करावा लागला. पुढील जन्मात ते पत्नीविरहाचं दुःख सारं संपलं. तसंच याजन्मात राम सुखातच नव्हताच आणि पुढील जन्मात क्रिष्ण बनूनही तो सुखात नव्हताच. कारण त्रासानं कुणालाच सोडलेलं नाही.

त्रासाबद्दल सांगायचं झाल्यास ज्याला जास्त त्रास होतो. त्याला अमरत्व प्राप्त होतं असं म्हटल्यासही आतिशयोक्ती होणार नाही. रामाला चौदा वर्षाचा वनवास झाला. पत्नीविरहाचा त्रास झाला. क्रिष्णाला जन्मापासूनच त्रास झाला. स्वतःची आई सोडून राहावं लागलं. त्यातच जेव्हा तो तरुण झाला. तेव्हा त्याला प्रेम देणारी आई नाईलाजानं सोडावी लागली. शिवाय ते सर्व मित्रमंडळ सोडावं लागलं. परंतु त्या त्रासातूनच ते घडले. आज त्यांचं नाव जगात आहे. एवढंच नाही तर आधुनिक काळातील उदाहरण आपल्यासमोर आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पुत्र औषधाअभावी मरण पावले. पत्नी रमाबाईही तशीच. त्यात त्यांना किती त्रास झाला असेल, आपण कल्पनाही करु शकत नाही. तरीही ते सगळं सहन करुन ते शिकले. समाजासाठी झटत राहिले. चवदार तळ्याचा जेव्हा खटला सुरु होता. तेव्हा जवळ जे तुटपुंजे पैसे असायचे. ते पत्नी रमाबाईच्या प्रकृतीला न लावता खटल्याला

लावले. ज्यातून खटला जिंकल्या गेला. परंतु रमाबाई मरण पावल्यात. आज समाज आरक्षणाचं सुख भोगतो आहे. तरीही काही समाजकंटक बाबासाहेबांना नावबोटं ठेवतात. तसंच दुसरं उदाहरण थॉमस एडीसनचं. त्यांनी विजेच्या बल्बचा शोध लावला. परंतु तसा शोध लावत असतांना व प्रयोग करीत असतांना त्यांनी आपल्या घरच्याच शेतातील धानाच्या गंजीला आग लावली. ज्यातून कितीतरी मिळकत गेली. त्यावेळेस त्यांच्या वडीलांनी त्यांना घरातून हाकलून दिले. त्यानंतर ते रेल्वेगाडीत वस्तू विकून आपला उदरनिर्वाह करुन प्रयोगाचाही छंद जोपासू लागले. त्यावेळेस पांढरा फॉस्फरस सांडल्यानं रेल्वेगाडीच्या डब्याला आग लागली. ज्यांचा त्रास थॉमस एडीसनला भरपूर झाला. परंतु त्यातूनच त्यांना विजेच्या बल्बचा शोध लावता आला.

अशी बरीच माणसं आहेत की ज्यांना ते जीवंत असतांना भरपूर त्रास झाला. ज्यात छत्रपती शिवाजी, आग्र्याची नजरकैद व पन्हाळयाची कैद, प्रतापगडावरील जीवघेणा हल्ला. महाराणी जीजाबाई, शहाजीपासून कितीतरी दिवस फारकत. महाराणी ताराबाई, पतीचं आजारपण, त्यातच पतीच्या मृत्यूनंतर आलेली स्वराज्य टिकविण्याची जबाबदारी. ज्यातून झालेला तीव्र त्रास. महाराज संभाजी, जीवंत असतांनाच जिव्हा व हात कापले गेलेत. डोळेही काढले गेलेत. अनंत हालहाल केले व नंतर एकेक अवयव कापत मान कापली. महाराज पृथ्वीराज चव्हाण, डोळे काढले. महाराणी पद्मावती, महाराणी संयोगीता, जोहार करावा लागला. गॅलिलिओ पृथ्वी गोल आहे असं म्हणताच हत्या, महात्मा गांधी, अछूत म्हणत दक्षीण आफ्रिकेत असतांना रेल्वेगाडीच्या डब्यातून उतरवून देवून अपमान केला.

आज अशी कितीतरी मंडळी आहेत की ज्यांचे नाव जगात आहे. कारण त्यांनी त्यांच्या जीवंत असतांना अतिशय वेदना भोगल्या. ज्यातून त्यांना संघर्ष करावा लागला व असे करीत असतांना त्यांचं नाव जगात वाढलं. आपणाला राजा विक्रमादित्याचं नाव माहीत आहे. नल दमयंती माहीत आहे. राजा भोज माहीत आहे. ते कशामुळे? तर त्याचंही उत्तर त्यांनी भोगलेला त्रासच.

त्रासाबाबत सांगायचं झाल्यास जो जास्त त्रास सहन करतो. जो जेवढा त्रास सहन करतो आणि जो जसा त्रास सहन करतो. त्याला अमरत्वच प्राप्त होत असतं. शिवाय त्रासाची गती, रचना व स्वरुप कसे आहे? यावरुन इतिहास घडतो. कोणी म्हणतात की रामायण महाभारत घडलंच नाही. ते थोतांड आहे. परंतु ते थोतांड नाही. तिही आपल्यासारखीच माणसं असतील. परंतु त्यांचा पुरावा नष्ट करण्यात आला. नालंदा तक्षशिला तसेच भोजशाला आणि इतर तत्सम तमाम हिंदूस्थानातील विद्यापीठं जाळून. नालंदा विद्यापीठामध्ये एवढे ग्रंथ होते की जे जळायला सहा महिने लागले. ज्यात तमाम हिंदूस्थानातील फार पुर्वीपासूनच्या राजे रजवाड्यांचा इतिहास अस्तित्वात होता. जो मिटविण्याचा प्रयत्न केल्या गेला. परंतु ते साहित्य आजही आपल्याला माहीत झालं. कारण ते काही लोकांना मुखोद्गत होतं तर त्याच्या काही प्रती या लोकांच्या घरी अस्तित्वात होत्या. ज्या शोधून जाळता आल्या नाहीत.

महत्वाचं सांगायचं म्हणजे त्रासापासून कोणीच सुटलेले नाहीत. सर्वांना थोड्याफार प्रमाणात त्रास असतोच. तेव्हा त्रासाला कोणीही घाबरुन जावू नये. त्याचा सहर्ष स्विकार करावा. स्वागतंही करावं. कारण आपल्याला होत असलेला त्रासच आपली दिशा ठरवतो नव्हे तर आपल्याला मार्ग दाखवीत असतो. म्हणूनच त्रासाचा कोणाताही बाऊ न करता, तसंच त्याबद्दल कोणताही किंतू परंतु मनात न

बाळगता त्रासालाच आपलं शस्त्र बनवावं. जेणेकरुन त्यातून आपली दिशा ठरेल व व्यवस्थीत, सुखरुप मार्ग काढता येईल. ज्यातून इतरांना प्रेरणा मिळेल आणि तो एक इतिहास बनेल. इतरांना प्रेरणा देण्यासाठी नव्हे तर दिशा देण्यासाठी आणि मार्ग धरण्यासाठी.

फकरुद्दीनला त्रास होत होता त्या वेगळेपणाचा. आता ना हिंदू त्यांच्या घरी समारंभाला येत असत. ना मुस्लीम त्यांच्या घरी जात असत. सबंध व्यवहारच बंद झाले होते. आता समुद्रात मासे पकडायला फकरुद्दीन एकटाच जात असे. तसेच हिंदूही वेगळ्याच नावेनं समुद्रात जावून मासे पकडत असत.

फकरुद्दीन एकतेचा विचारच करीत होता. अशातच त्याला आठवला शिवरायांचा काळ. शिवरायांच्या काळातही राजसत्तेवर औरंगजेब नावाचा आमच्याच बिरादरीतील माणूस. तरीही शिवरायांच्या सैन्यात दौलतखान आरमाराचा प्रमुख. एक मुसलमानच. शिवाय शिवरायांना सिद्दी इब्राहिम, सिद्दी जौहर, मसूद खान, अंबर वहाब, शमा खान, नूर खान बेग आरमार प्रमुख, इब्राहिम पठाण, दाऊद खान, मसूद खान, हुसेन खान, जाफर खान, मदारी मेहतर, काजी हैदर, मोहंमद खान हकीम आदी मुस्लीम सरदारांनी शिवरायांना मदतच केली स्वराज्य बनविताना. जे स्वराज्य हिंदू मुस्लीमांचं आपलं हक्काचं स्वतःचं स्वराज्य होतं. मात्र इंग्रज डावखुरे. त्यांनीच पाडली असेल अशी फुट. त्यांनीच सांगीतलं असेल आपल्या नेत्यांना. असं वागा, तसं वागू नका. परंतु आपल्या तरी लोकांनी तसं का वागावं.

शिवाजी महाराजांनी चांगलं कर्तृत्व केलं. त्यांच्या चांगूलपणावरच तर मुस्लिमांनी मदत केली त्यांना. जीवावर उदार होवून लढले ते त्या आपल्याच बिरादरीतील औरंगजेबाच्या विरोधात. तसे सरदारच बनवले होते शिवाजी महाराजांनी मुस्लिमांना. शिवाय महाराजांच्या या सगळया सरदारांचा धसका इंग्रजांनीही घेतला होता. उगाचंच जॉन फायर नावाच्या एका ब्रिटिश लष्करी अधिका-याने ईस्ट इंडिया कंपनीच्या संचालकांना १६७२ मध्ये पत्र पाठवून या सरदारांच्या शौर्याचा उल्लेख केला नाही. मुस्लीम सरदारांनी मोठमोठे पराक्रम गाजविल्यानंच तर मराठेशाही जीवंत राहिली होती आणि आज अशी फुटीची गोष्ट. आमच्या पुर्वजांना तर त्यावेळेस असं कधीच वाटलं नाही की आम्ही हिंदू असलेल्या शिवरायांना मदत करु नये. मग आजच का बिघडलं?

शिवाजी महाराजांच्या काळात सक्रिय असलेल्या दौलतखानामुळे पुढे त्याच ब्रिटीश अधिकारी जॉन फायरनं म्हटलं की 'कोकण भागात शिवाजी महाराजांचे आरमार खूपच जागरूक आहे. त्यामुळे येथे आपली डाळ शिजणार नाही,' ते उगाचच म्हटलं नसेल. या पत्रावरुनच या सरदारांच्या कर्तबगारीची महती पटते. अफजल खान वधाच्या वेळीही तीन मुस्लीम सरदार होते की ज्यांच्यामुळं शिवरायांच्या जीवावर आच आली नाही. शिवाजी महाराजांनी अफझल खानाचा वध केल्याचा प्रसंग इतिहासात आहे. महाराजांच्या अंगरक्षकांतही नेहमी तीन मुसलमान सरदार असायचे. सरदार नूर खान, इब्राहिम आणि सुलतान अशी त्यांची नावे. छत्रपती शिवाजी महाराज अफझल खानाला भेटायला गेले. त्या वेळी हे तिन्ही मुस्लीम सरदार तेथे हजर होते.

फकरुद्दीन आठवत होता एकएक गोष्ट. आजपर्यंत मुस्लिमांनी हिंदूला व हिंदूंनी मुस्लिमांना केलेली मदत. आपल्याच बिरादरीतील माणसांनी फक्त माणुसकी पाहून त्यांना मदत केली आणि त्यांनीही आपल्याला सन्मानानं वागवलं. आपल्या बिरादरीतील माणसं म्हणतात की राजा दाहिरच्या मुलींनी मोहम्मद बिन कासीमची हत्या केली. त्यानं आपल्या धर्मातील काजीची हत्या केली. जो एक धर्मगुरु होता. परंतु ती हत्या करण्यापुर्वी त्यानं त्या मुलीच्या बापाची म्हणजेच राजा दाहिरची हत्या केली होती. हे विसरलेत आपले नेते. आपले नेते म्हणतात की पृथ्वीराज चव्हाणनं मोहम्मद घोरीची हत्या केली. परंतु त्या पृथ्वीराज चव्हाणचे डोळे बिनाकारण फोडलेल्या मोहम्मद घोरीचा कोणीच दोष दाखवत नाही. आपला समुदाय म्हणतो की शायिस्तेखानाची चार बोटं कापली. परंतु त्यानं जो हिंदूंना त्रास दिला होता. ते कोणीच सांगत नाही. शिवाय आपला समुदाय म्हणतो की अफजलखानाची हत्या केली. परंतु अफजलखानानं हिंदूसोबत काय केलं. ते कोणीच सांगत नाही. अफजलखान जेव्हा वाई मार्गानं महाराष्ट्रात आला होता. तेव्हा त्यानं कित्येक हिंदूंच्या देवळांना शह पोहोचवला होता. त्यानं तुळजापूरच्या देवी भवानीचे तुकडेही केले होते. शिवाय कित्येक हिंदूंच्या स्रियांवर अत्याचार केला होता त्यानं आणि करतच होता. शिवाय प्रतापगडावर जेव्हा शिवराय अफजलखानाला भेटायला गेले. तेव्हा त्या भेटीदरम्यान आलिंगन देतांना अफजलखानाला काय गरज होती त्यांची मान दाबायची. तद्वतच त्यांच्यावर बिचव्यानं वार करायची. बरं झालं शिवरायांनी चिलखत घातलं होतं म्हणून ते वाचले. नाहीतर....... नाहीतर ना शिवाजी वाचले असते, ना कोणाला स्वराज्य स्थापन करताच आलं असतं. आपण जसे वागलो. तसे

आपल्याला फळ मिळते. औरंगजेब बादशाहा जसा वागला. तसं त्याला फळ मिळालं.

शिवाजी महाराजांनी तर मुस्लिमांचं पोट तरी जगवलं. परंतु औरंगजेबानं काय केलं. त्यानं तर चक्कं आपल्या बापाला नजरकैदेत टाकलं अन् आपल्याच भावाची हत्या केली आलमवीर बनण्यासाठी. मग तो कसा थोर होवू शकतो?

तो इतिहास...... तो इतिहास आठवत होता फकरुद्दीनला. इतिहासाचा परीपाठ एकेक खुलत होता त्याच्या नजरेसमोर. तसं त्याला आठवलं. आपण का बरं ऐकावं आपल्या बिरादरीतील माणसाचं की जे आपल्याच बिरादरीतील माणसांना भडकवू पाहात आहेत.

गुरुंचं शिकवणं प्रभावी असावं. त्याचं कारण आहे शिक्षकांचं शिकवणं. जो कोणी गुरु असेल त्या नेत्यांना शिकविणारा. तो बरोबर नसेल, त्यानं आपल्याच बिरादरीतील माणसांना कसं भडकवता येईल याचं विषच पाजलं असेल. त्याला. म्हणूनच तो दूत त्याच राजकारण्याचं ऐकून इथंपर्यंत आला.

फकरुद्दीननं काय विचार करायचा तो केला. तसं त्याला त्याचा मुलगा आबेद म्हणाला,

"अब्बू काल इमरान म्हणत होता की त्या हिंदूंच्या मुलांसोबत बोलायचं नाही. कारण काय?"

इमरान...... इमरान बिरादरीतील एक लहान मुलगा. त्यानं आईचं बोलणं ऐकलं होतं गुपचूप. त्याचे आईवडील आतमध्ये गोष्टी करीत होते की आपल्या मुलांना हिंदूंच्या मुलांसोबत खेळू द्यायचे नाही. तीच गोष्ट ऐकून तो आबेदला

सांगायला आला होता. तसं त्यानं आबेदला सांगीतलं व हेही सांगीतलं होतं की आपण आजपासून हिंदूंच्या मुलांसोबत खेळू नये. ते आपले शत्रू आहेत पुर्वीपासूनचे.

आबेद तीच गोष्ट आज आपल्या वडिलांनाही सांगू लागला होता. आता त्या आबेदच्या प्रश्नावर काय उत्तर द्यायचं हे काही फकरुद्दीनला कळेनासं झालं होतं. ते आपले मौन बाळगून होते.

लोकं म्हणतात की लहान मुलांना अक्कल नसते. काही शिक्षकही तसंच समजतात. परंतु जेवढी अक्कल लहान मुलाना असते. तेवढी अक्कल मोठ्यांना नसतेच कदाचीत. हे अलिकडील काळावरुन दिसून येते. अलिकडील काळातील मुलं हे मोबाईल वा स्मार्टफोन अतिशय चांगल्या पद्धतीनं हाताळतात. जो मोठी माणसं हाताळू शकत नाहीत. फरक एवढाच आहे की काय वाईट व काय चांगले हे त्या लहानग्या वयात कळत नाही. कारण त्यांना स्वतःचा अनुभव यायचा असतो. जो अनुभव एखादं संकट आल्यावर सहज येतो.

संकट....... संकटं येत असतात. जातही असतात. ज्याप्रमाणे सुर्य चंद्राला उदय व अस्त असतं, त्याप्रमाणेच संकटांनाही उदय व अस्त असतंच. याबाबत एक उदाहरण.

तो वर्ग पाचवा. तसं पाहिल्यास पाचव्या वर्गातील मुलांना तेवढी अक्कल नसतेच. असं आपण समजू शकतो. परंतु त्या वर्गातील मुलं अचानक एकदा आपल्या शिक्षकाला म्हणाले,

"सर, तुमची जन्मतारीख सांगा."

शिक्षकांनी प्रथम आढेवेढे घेतले व नंतर अगदी सहजरित्या आपल्या विद्यार्थ्यांना आपली जन्मतारीख सांगीतली. त्यानंतर शुक्रवार उजळला. तसं दर शुक्रवारी विद्यार्थी सरस्वतीपुजन करायचे. तसा तो दिवस उजळला. आजही सरस्वतीपुजन होतंच. तसं त्या दिवशी विद्यार्थी आपल्या शिक्षकाची वर्गात यायची वाट पाहात होते. त्यानंतर थोड्या वेळानं शिक्षक वर्गात आले.

शिक्षक ज्यावेळेस वर्गात आले, त्यावेळेस विद्यार्थ्यांनी त्या शिक्षकांच्या ध्यानीमनी नसतांना आणलेला केक आपल्या शिक्षकांच्या पुढ्यात ठेवला. तसं शिक्षकानं विचारलं,

"हे काय?"

"सर, हा केक. आपला आम्ही वाढदिवस साजरा करतोय."

ते विद्यार्थ्यांचं बोलणं. तो केक समोरच होता. तो शिक्षक त्या केकला न्याहाळत होता. अशातच तो विचार करीत होता आपल्याला असलेल्या शाळेतील त्रासाचा. त्यानं आजपर्यंत त्या शाळेत अतिशय वेदनादायी त्रास भोगला होता. कधी वार्षिक वेतनवाढ बंद तर कधी पत्र देवून त्याचेवर ताशेरे ओढणे, कधी नोकरी सुरु असतांनाही वेतन बंद. मग घरी हालअपेष्टा. कधी उपाशी राहणे आणि आताही त्रासच होता त्या शिक्षकाला. आता त्याचं वेतन बंद होतं व तो आपल्याला वेतन मिळावं म्हणून न्यायालयात शाळेविरुद्ध भांडत होता.

तो केक त्या शिक्षकाच्या पुढ्यात होता व तो केक त्याला पाहात हसत होता. कारण त्यानं बऱ्याच वर्षांपासून आपला वाढदिवस साजरा केला नव्हता. गतकाळातील बऱ्याच दिवसापुर्वी त्यानं वाढदिवस साजरा केला होता. परंतु

जेव्हापासून शाळेचं दुखणं खुपणं मागं लागलं. तेव्हापासून त्याला आपला वाढदिवस साजरा करणं आवडत नव्हतं आणि इतरांनीही त्यांचा साजरा केलेला वाढदिवस आवडत नव्हता. परंतु शाळेतील मुलंच ती. त्या मुलांची ती भावना. तो केक त्या शिक्षकासाठी महत्वाचा नव्हता. त्याची किंमत त्या शिक्षकासाठी महत्वाची नव्हती. तर त्या केकमधून जे प्रेम, आपुलकी आणि जिव्हाळा विद्यार्थ्यात निर्माण झाला होता. ते प्रेम, आपुलकी आणि जिव्हाळा महत्वाचा होता. ज्याला कोणत्याही मापानं मोजता येत नव्हतं

अलिकडील काळ असाच आहे. सर्वांवर काही ना काही प्रमाणात संकट असतंच आणि हे संकट पाचवीला पुजलेल्यासारखं वागत असतं माणसाच्या आयुष्याशी. त्यातही काही सुखाचे क्षण येतात. तो विद्यार्थ्यांनी अकस्मात आणलेला केक असंच काही त्या शिक्षकाच्या जीवनाला वळण देवून गेला. तो विचार करु लागला. विचार करु लागला की आपल्या या भांडणात या विद्यार्थ्यांचा कोणता दोष? दोष प्रशासन आणि शाळेचा. मग आपल्याला वेतन मिळो अगर न मिळो, आपण शिकवायचंच. चांगलंच शिकवायचं. त्यानंतर त्या शिक्षकानं आणखी चांगल्या प्रकारे शिकवणं सुरु केलं होतं.

एकदा तेच शिक्षक एका मैदानात उभे असतांना एक मुलगी त्याचेजवळ आली. तिच्या कडेवर एक लहान मुल होतं. येताबरोबर ती त्या शिक्षकाच्या पायावर नतमस्तक झाली. त्यानंतर ती तिच्याच जवळ उभ्या असलेल्या आपल्या पतीला सांगू लागली. यांच्यामुळंच माझं जीवन घडलं.

शिक्षकानं ते ऐकलं. तसा त्या शिक्षकाला विचार आला. विचार आला की मी प्राथमिकचा शिक्षक. शेंबड्या मुलांना शिकविणारा. मी काय ह्या मुलीचं जीवन घडवलं असेल. तसं त्यानं विचारलं, विचारलं की मी तुला ओळखलं नाही. तुझं नाव काय?

त्या मुलीनं तो प्रश्न ऐकला. तशी ती म्हणाली,

"सर, आपण मला ओळखलं नाही. मी त्याच वर्गातील मुलगी. ज्या वर्गात आम्ही केक आणला होता."

"सध्या काय करतेय?"

"मी सिनीअर कॉलेजची प्राध्यापिका आहे."

ते मुलीचं बोलणं. त्यानंतर त्यांच्यात बराच संवाद झाला. तसं बोलणं संपलं. तसा नोकरीकाळातील सर्व सारीपाट त्या शिक्षकाला आठवायला लागला. आठवायला लागलं की आपण शिकविलेली मुलगी हीच. हिच्या घरी अनेक बहिणी. त्यातच वडील तिला शिकवायला तयार नव्हते. ते कोणाकोणाला शिकविणार! शिवाय घरी बुरसटलेले विचार. मुलासाठी एवढ्या मुली जन्माला घातलेल्या. त्यातच ती शिक्षकांकडे यायची. वारंवार म्हणायची,

"सर, माझे वडील मला शिकवायला तयार नाहीत. तुम्ही त्यांना म्हणा ना."

त्यानंतर ते शिक्षक त्या विद्यार्थीनीच्या घरी जायचे. त्यांना समजावून सांगायचे की ही तुमची मुलगी उद्या तुमचा उद्धार करेल. कुटूंब पोसेल. त्यावर त्या पालकांनाही बळ यायचं. कधी तो शिक्षकही त्या मुलीला पैसे द्यायचा आणि ज्यावेळेस तो शिक्षक त्या विद्यार्थीनीला पैसे द्यायचा. तेव्हा त्याला अभिमान वाटायचा. कारण त्यावेळेस त्याचं वेतन बंद असल्यानं त्याची न्यायालयीन लढाई सुरु होती.

तोच शिक्षक एकदा शाळेत असतांना शाळेचं शिक्षण पुर्ण झाल्यानंतर शाळा सोडून गेलेल्या त्याच विद्यार्थीनींनी एकदा त्यांच्या वाढदिवशी एक दैनंदिनी व पेन त्या शिक्षकाला बक्षीस देण्यासाठी आणला होता.

महत्वपुर्ण बाब की आपलं जर चांगलं शिकवणं असेल तर विद्यार्थी असा केकचा प्रकार करीत असतात. ते विद्यार्थी आपल्या जीवाला जीव लावत असतात. त्यातच बहुतेक सर्वच विद्यार्थी हे हिरीरीनं शिकत असतात. हे प्रत्यक्ष निरीक्षणातून दिसून येतं. परंतु अलिकडील काळात असे चांगले शिक्षक शाळा प्रशासनाला आवडत नाहीत. शाळा प्रशासनाला आवडतात ते शिक्षक. जे नातेवाईक असतात वा देण देत असतात. मग त्यांच्यात शिकविण्याचं मुल्य असो वा नसो. ते शालेय प्रशासन त्या होतकरु शिक्षकांची किंमतच करीत नाही.

आज परिस्थिती अशीच आहे. जी मंडळी चांगले काम करतात. त्यांना समाज स्विकारत नाही. कारण कलियुग आहे. आज जे लोकं काहीही करीत नाहीत. उलट भ्रष्टाचार करुन बक्कळ पैसा कमवतात. त्यांना लोकं ते श्रीमंत असल्यानं मान सन्मान देत असतात. परंतु कालपरत्वे ते कालबाह्य होतात. उलट कालांतरानं मानसन्मान त्यांनाच मिळतो, जे इमानदार असतात आणि तेच कालांतरानं टिकूनही राहतात. शिक्षकांबद्दल सांगायचं झाल्यास पैसा हा क्षणीक असतो. परंतु जे शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांना चांगले शिकवतात. ते शिक्षक त्या विद्यार्थ्यांच्या जीवनात चिरकाल टिकून राहतात. अगदी त्यांच्या मरणापर्यंत. तेव्हा शिक्षकांचं शिकवणं प्रभावी असावं. त्यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांना चांगलंच शिकवावं. जेणेकरुन त्यांचं भविष्य घडू शकेल. कारण वेळप्रसंगी आपले बालपणातील मित्र आपल्याला कदाचीत आठवत नाहीत. त्यांचं विस्मरण होतं. परंतु चांगले शिक्षक आपल्याला सतत आणि नेहमी

आठवत असतात. ही वस्तुस्थिती आहे आणि भविष्यात जर त्या शिक्षकांच्या निवृत्त झाल्यानंतर एखादा विद्यार्थी त्याचेजवळ येवून त्याला नतमस्तक होत असेल वा एखादं लहानसं बक्षीस देत असेल, वा एखादा केक त्यांच्या वाढदिवशी त्यांना न सांगता कापत असतील तर तेच त्या शिक्षकांना मिळालेलं बक्षीस असतं. ते बक्षीस भारतरत्न वा जगरत्न पुरस्कारापेक्षाही अतिशय महत्वाचं असतं. म्हणूनच शिक्षकानं आपल्या मनात कोणतेही आढेवेढे वा विद्यार्थ्यांबद्दल कोणताही आकस न ठेवता अगदी निश्चींत मनानं, कोणताही किंतू परंतु मनात न बाळगता आपल्या विद्यार्थ्यांना शिकवावं. प्रभावी शिकवावं. जेणेकरुन त्यातून ते विद्यार्थी पुढील काळात सन्मान करु शकतील, नतमस्तक होतील वा आवर्जून येवून त्यांची भेट घेवू शकतील.

*************

ती पाकिस्तानची मागणी झाली होती. कवी इकबालनं पाकिस्तानची मागणी केली होती एका कार्यक्रमाच्या दरम्यान. त्याला पाकिस्तान हवाच होता. वाटत होतं की आपल्या लोकांना हक्काचा असा पाकिस्तान मिळायला हवा. ज्या देशात राहतांना आपल्या हक्काची पायमल्ली होणार नाही. आपल्या मुस्लिमांसाठी स्वतंत्र्य असा पाकिस्तान.

मोहम्मद इकबालनं पाकिस्तान मागितला. तशी कार्यक्रमातून पाकिस्तान मागणीची घोषणाही दिली आणि मोहम्मद जिनाला सांगीतलं की त्यांनी तसा प्रस्ताव तयार करावा. जेणेकरुन पाकिस्तानची आपण केलेली मागणी लावून धरता येईल.

ती पाकिस्तान मागणीची गोष्ट. ती मागणीची गोष्ट सगळीकडं पसरली. जनमत तयार होत होतं. तसं हिंदूनाही वाटायला लागलं होतं की मुस्लिमांनी पाकिस्तान

मागणी केलेली असून आता या देशात एकाही मुसलमानांनी राहता कामा नये. परंतु त्या मागणीला तमाम हिंदूस्थानातील मुठभरच मुस्लिमांचं सहकार्य होतं. ते खुश होते. मात्र बऱ्याच जणांना आजही वाटत होतं की मुस्लिमांनी पाकिस्तानची मागणीच करु नये आणि अखंड हिंदुस्थानाला तोडू नये.

काळ हळूहळू सरकत होता. पाकिस्तानची इकबालनं केलेली मागणी जोर धरू लागली होती. आता त्या मागणीला सहकार्य करणाऱ्यांची संख्या वाढू लागली होती. त्यातच फकरुद्दीनच्या गावातील बरेच लोकं तयार झाले होते पाकिस्तान मिळवायला. ज्यात नाईलाजास्तव का होईना, आपल्याला वाळीत टाकू नये म्हणून फकरुद्दीनही तयार झाला होता.

आबेद मोठा झाला होता. तशीच शर्मिलाही मोठी झाली होती. त्यातच बालपणापासून सोबत खेळत खेळत आज ते तरुण झाले होते व त्यांच्यात प्रेम निर्माण झालं होतं. त्यातच त्यांचे मायबाप आवर्जुन आणि वारंवार सांगत होते की आपण आपला धर्म पाळायला हवा. आबेदचे आईवडील त्याला कोणत्याही हिंदू मुलींसोबत वा मुलासोबत बोलू नये असं सांगत असे. तीच भाषा शर्मिलाचेही आईवडील करीत. मात्र तरीही मुलं एकमेकांशी बोलत असत आणि व्यवहारही ठेवत असत. अशातच शर्मिला व आबेद तरुण झाले.

आबेद आणि शर्मिला तरुण होताच त्यांचे संदर्भ बदलले. ते एकमेकांवर निरतिशय प्रेम करु लागले होते. आता ते एकमेकांपासून विलग होवू शकत नव्हते. ते त्यांचं प्रेम वाढत चाललं होतं. त्यातच पाकिस्तान मागणीही वाढत चालली होती.

# भाग दोन.

पाकिस्तान निर्मीती. त्यातच चर्चा व नंतर पाकिस्तान बनला. त्यानंतर ठरलं की ज्याला ज्याला पाकिस्तानात जायचं असेल, त्यांनी त्यांनी पाकिस्तानात जावं. मग ते हिंदू असो की मुस्लीम. अशी दवंडी सर्व गावागावात जाहीर झाली. तशाच पाकिस्तानच्या सीमाही दवंडीतून सांगण्यात आल्या होत्या. परंतु त्या सीमारेषा स्पष्टपणे समजल्या नव्हत्या स्थानिक लोकांना.

पाकिस्तान निर्माण झाला व मुस्लिमांनी आपल्या आपल्या बिरादरीत सांगीतलं, 'आपल्या हक्काचा पाकिस्तान आपण मागीतला आहे. तिथं आपल्याला खऱ्या स्वरुपाच्या स्वातंत्र्यानं राहायला मिळेल. आपला हक्कं तिथं कोणी डावलणार नाही. अतिशय सन्मानानं आपल्याला राहता येईल. शिवाय सर्वच प्रकारच्या सुखसुविधा मिळतील. तेव्हा आपण स्टेशनवर जावं व पाकिस्तानात रवाना व्हावं.

ज्याप्रमाणे गावागावात दवंडी झाली. त्याप्रमाणेच सर्वच लोकं पाकिस्तानात जायला निघाले. लोंढेच्या लोंढे दिसू लागले होते लोकांचे. काहींना भारताच्या सीमा कोणत्या आणि पाकिस्तानच्या सीमा कोणत्या हे कळायलाही मार्ग नव्हता. त्यातच ज्यांना भारतात राहायचे होते, तेही त्यांना सीमा माहीत नसल्यानं पाकिस्तानात जावू लागले होते.

गावागावातील लोकं आणि त्यातल्यात्यात शहरातील लोकंही पाकिस्तानात जावू लागले होते. अशातच एका अज्ञात व्यक्तीच्या मनात राग धुमसत होता. ज्याचं नाव इमरान होतं.

इमरान....... इमरानला पाकिस्तान व भारत असे हिंदुस्थानचे दोन तुकडे झालेले आवडत नव्हते. लहानपणापासूनच पाकिस्तानची मागणी जोर पकडत असतांना व घरी त्याचे आईवडील चर्चा करीत असतांना त्याला त्या चर्चा ऐकायला येत. त्यावेळेस त्याचं पायाची आग मस्तकात गेलेली असायची.

इमरानला हिंदुस्थान आवडत होता. त्याला ना भारत आवडत होता ना पाकिस्तान. त्याला वाटत होतं की अखंड हिंदुस्थानचे भारत आणि पाकिस्तान असे दोन भाग बनवणे म्हणजे हिंदुस्थान नावाच्या आईला कापून दोन भागात विभाजन करणे होय. तो आधीपासूनच सांगत होता लोकांना की त्यांनी पाकिस्तान नावाचं वेगळं राष्ट्र मागू नये. ते इंग्रजांचं षडयंत्र आहे. परंतु लोकं त्याचं ऐकतील तेव्हा ना. त्यावेळेस तो लहान होता. परंतु आता तो मोठा झाला होता, ज्यावेळेस पाकिस्तान बनला होता.

तो विचारच करीत होता की पाकिस्तान आणि भारत असे दोन तुकडे हिंदुस्थानचे करु नयेत. परंतु तुकडे बनले होते व लोकं त्या बनलेल्या तुकड्यानुसार पाकिस्तानात रवाना झाले होते. काही भारतात येत होते. अशातच त्याला आलेला राग. तो राग मनात न मावल्यानं त्यानं एका रात्री एका अज्ञात व्यक्तीचा खुन केला व प्रसार झाला.

ती रात्र गेली होती व आता दुसरा दिवस उजळला होता. त्यातच कोणाची तरी नजर त्या प्रेतावर पडली. ते प्रेत कुणाचं होतं याचीही शहानिशा झाली नाही. मग जनक्षोभ उसळला. हिंदूंना वाटायला लागलं की ते प्रेत हिंदूचं आहे व हे कृत्य मुस्लिमांनी केलंय. तसंच मुस्लिमांना वाटायला लागलं की ते प्रेत मुस्लिमांचं असून ते कृत्य हिंदूंनी केलेय. त्याच कारणावरुन पुढे वाद वाढला. आता त्यांना सोडायचे नाही असं समजून कत्तली सुरु झाल्या. हिंदू मुस्लीमांची कत्तल करु लागले तर मुस्लीम हिंदूंची. अशातच हिंसाचार वाढत चालला होता.

आज संपुर्ण हिंदुस्थानात नाही तर ज्या हिंदुस्थानाचे दोन तुकडे झाले होते, त्या पाकिस्तान व भारतात हिंसाचार सुरु होता. लोकं सैरावैरा पळत होते. कोणी रेल्वेगाडीवरही हल्ले करीत होते तर कोणी गावागातील लोकं कापून टाकत होते. अशातच भारतात राहणाऱ्या मुस्लिमांना वाटायला लागलं होतं, पाकिस्तान मुस्लीमांचा. त्या देशात संबधीत संपुर्ण मुस्लिमांनी जायला हवं. नाहीतर या देशात राहिल्यास येथील तमाम हिंदू लोक आपल्याला कापून टाकतील. आपल्याला जीवंत सोडणार नाही. तसंच पाकिस्तान सीमेत राहणाऱ्या हिंदू लोकांना वाटत होतं की त्यांनी भारतात यायला हवं. नाहीतर पाकिस्तानातील संबधीत मुस्लीम लोकं

त्यांना जीवंतच ठेवणार नाही. तीच गोष्ट वाटू लागली होती फकरुद्दीनलाही. ज्यावेळेस आबेद वयानं तरुण झाला होता.

फकरुद्दीन हा मुसलमान होता व त्यालाही तो मुस्लीम असल्यानं वाटू लागलं होतं की पाकिस्तानात जावं. नाहीतर येथील हिंदू लोकं आपल्याला जीवंत ठेवणार नाही. तसं त्यानं घरातील सर्व सदस्यांना सांगीतलं. त्याचबरोबर आबेदलाही. शिवाय आबेदही नाईलाजानं पाकिस्तानात जायला तयार झाला होता. कारण तो तरुण जरी असला तरी मायबापाच्या आज्ञेत होता. परंतु त्याला त्याचं प्रेम आठवत होतं. परंतु फकरुद्दीनचा आदेश तो धिक्कारु शकत नव्हता. शेवटी तो त्याच्या जीवामरण्याचा विषय होता. वाटत होतं की जीवंत राहू तर एकदा भेटायला येवू या भारत भुमीला. सर्व परिस्थिती ठीकठाक झाल्यावर. तसा त्यानं मनात विषय दाबताच फकरुद्दीन आला. तेव्हा रात्र झाली होती आणि फकरुद्दीन सर्वांना सांगत होता,

"आपल्याला पाकिस्तानात जायचं आहे. परवा रातच्याला तीन वाजता पाकिस्तानात जायची गाडी आहे. तेव्हा सर्वजण तयार राहा. मी रेल्वेस्टेशनवर जायसाठी गाडीची व्यवस्था करतोच."

ते गाव तसं शांतच होतं. आजुबाजूच्या गावात दंगे सुरु होते. लोकं एकमेकांच्या घरात शिरत होते. एकमेकांच्या घरात शिरुन तलवारीनं एकमेकांचे बळी घेत होते. महिलांवर अत्याचार करीत होते. लहान बायकांनाही कोंबड्या बकऱ्यासारखं करकरा कापत होते. ते पाहून कोणालाही किळस वाटू लागली होती. काही लोकं धाकानं लपून राहात होते. ज्यात फकरुद्दीन आणि फकरुद्दीनचा परीवारही होताच.

ती रात्र गेली. तसा दिवस उजळला. आबेदच्या वडीलानं पाकिस्तानात जायचा निर्धार केला होता. तसा त्यानंही. आज त्याला बेचैन वाटत होतं. कारण त्याचं शर्मिलावर निरतिशय प्रेम होतं. त्याला आता आठवायला लागल्या होत्या त्याच्या प्रेमाच्या आठवणी. ते समुद्रकिनाऱ्यावरील फिरणं. त्या वाळूत खेळणं. त्यातच आठवत होतं एकमेकांच्या गप्पागोष्टीत रंगणं. आजही त्याला वाटत होतं. आपण शर्मिलाची भेट घ्यावी. कारण उद्यापासूनच शर्मिला आपल्या डोळयाला दिसणार नाही.

लागलीच विचारांचा अवकाश. त्याची पावलं शर्मिलाच्या घराकडं वळली. तसं गाव शांत असल्यानं त्या गावात तेवढी भीती नव्हतीच.

आबेदचं आपल्या मुलीवर प्रेम आहे. हे शर्मिलाच्या आईवडीलांना माहीत नव्हतं. आबेद शर्मिलाच्या घरी नेहमीच जात असे. त्याचं घरच शर्मिलाच्या घराला लागून होतं. त्यामुळं नेहमीप्रमाणेच आबेद शर्मिलाच्या घरी गेला होता. तसा त्यानं तिला आवाज दिला व म्हटलं,

"मला तुझ्याशी एक महत्वाचं बोलायचं आहे."

"बोल ना. तुला कोणी अडवलंय?"

"इथं नाही सांगू शकत मी. तिकडे चल, समुद्रकिनाऱ्यावर. बरंच काही बोलायचं आहे तुझ्या बरोबर."

त्याचं ते बोलणं. ते बोलणं ऐकताच शर्मिला तयार झाली. तशी ती त्याच्याबरोबर सागरकिनाऱ्यावर गेली. त्या वाळूत ते अगदी फतकल मांडून बसले. तशी ती आबेदला म्हणाली,

"बोल, काय बोलायचंय ते?"

शर्मिलानं केलेला प्रश्न. आबेदच्या मनावर कोरला गेला. तसा त्यानं तो प्रश्न ऐकला. परंतु बोलायची हिंमत होत नव्हती. तसं त्यानं तिचे हात हातात घेतले. थोडा वेळ मौनात गेला. तशी ती म्हणाली,

"बोल ना रे. काय बोलायचं ते लवकर बोल. सध्या वातावरण तंग आहे. बाहेर पडायची परवानगी नाही. तरीही तुझ्या आग्रहाखातर आले. मला लवकर घरी जायचे आहे."

"अगं मी कसा सांगू तुला? समस्या मोठी बिकट आहे."

"तू सांग तर आधी. त्यावरही मार्ग काढू."

"नाही सांगू शकत. प्रश्न मोठा गंभीर आहे."

"ठीक आहे. मग मी जातेय आता. उद्या सांगशील."

"नाही. उद्या मी नसणारच इथं."

"म्हणजे?"

"उद्या आम्ही सर्वजण पाकिस्तानात जाणार."

"तू देखील."

"मी देखील."

"मला सोडून."

"होय, तुलाही सोडून."

"मग हे प्रेम कशाला केलंय. मला तर आता तुझ्याशिवाय राहावणार नाही. अन् तुला सांगतोय की त्यांना जावू दे. तू नोको जावूस मला सोडून."

"नाही. मला जावंच लागेल. तसं पाहिल्यास पाकिस्तान आमच्यासाठी सोयीस्कर आहे."

"अरे, परंतु भारतही चांगला आहे ना. तू तुझ्या आईवडिलांना समजव. म्हण की आपण भारतातच राहू. इथंच खरी सुख शांती आहे म्हणावं."

"नाही. आता आमचा निर्णय झाला. आम्ही जाणार म्हणजे जाणारच. मग काहीही होवो. निदान आमच्या धर्मासाठी तरी."

"अरे, मला सोडून तू जाशीलच."

"होय, जावंच लागेल."

"हे एवढं विशाल प्रेम सोडून."

"होय."

"मला मरतांना पाहूनही."

"होय, आता आम्हाला कोणीच अडवू शकत नाही."

"मग मी तरी जीवंत राहून काय करु? मीही कायमचीच जाते."

शर्मिलाचं ते बोलणं. तिनं पिशवीतून एक धारदार सुरी काढली आणि म्हणाली,

"हे बघ आबेद. तू जर जाणार असेल तर मी ही नसच कापून टाकेन हाताची."

तिच्या हातात धारधार सुरी होती. परंतु ती त्याला गंमत वाटत होती. त्याला वाटत होतं की ती त्याला धाकच देत आहे. ती कदाचीत गंमत करीत आहे. तसा तो म्हणाला,

"आता हात कापून टाक की मान. मी जाणार म्हणजे जाणारच."

आबेदच्या बोलण्याचा आता तिला तीव्र राग आला होता. त्यातच तिनं त्यावर थोडा विचार केला नाही आणि तत्क्षणी तिनं आपल्या हाताची नसच कापून टाकली. ते पाहून आबेद घाबरला.

शर्मिलानं आपल्या हाताची नस कापली होती. ते पाहून घाबरलेला आबेद. मात्र तो पळून गेला नाही. त्यानं आपल्या अंगातील उपरण्यानं तिची जखम बांधली. ज्यातून तिचं भळाभळा वाहणारं रक्त थांबलं होतं. त्यानंतर आबेद म्हणाला,

"एवढं प्रेम करतेय तू माझ्यावर. मी तुझी परीक्षा पाहात होतो. तू माझ्या परीक्षेत पास झाली तर........ आता माझा परीवार पाकिस्तानात गेला तरी चालेल, परंतु मी पाकिस्तानात अजिबात जाणार नाही. माझंही तुझ्यावर प्रेम आहेच तर."

ते आबेदचे शब्द. त्यावर शर्मिला म्हणाली,

"पुन्हा असली गंमत माझ्यासोबत करु नकोस. वेड्या, तू माझी परीक्षा पाहात होतास काय? अन् ही असली परीक्षा. आता माझा जीव गेला असता तर........"

"कसा जाईल? माझं खरं प्रेम आहे ना तुझ्यावर." आबेद म्हणाला.

सायंकाळ झाली होती. तसा अंधार पडू लागला होता. पाखरं आपल्या घरट्याकडं परतू लागली होती. तसा आबेदही तिला म्हणाला,

"चल, सायंकाळ झाली आहे. अंधार पडू लागला आहे. आपणही घराकडे परतू."

त्याचं ते बोलणं. त्या बोलण्यावर होकार देत शर्मिलानं होकारार्थी मान हलवली व ते आपआपल्या घराकडे परतू लागले होते.

************************

शर्मिला घरी आली होती. तशी तिच्या हाताला पट्टी बांधून होती. त्यातच तिची घरी विचारणा झाली. त्यावर तिनं उत्तर दिलं. जखम लहानशीच आहे. बाजूच्या गावात काही कामानिमित्त गेली होती. तेव्हा त्या आपल्याच बिरादरीतील हिंदूंनी अडवलं व म्हटलं की अशी बाहेर आता फिरत जावू नकोस. अशी फिरशील तर आपला जीव धोक्यात टाकशील. त्यांनी मला आठवण राहावी म्हणून माझ्या हाताला झळ पोहोचवली.

शर्मिलाचे वडील समजदार होते. ते काय समजायचं ते समजले. त्यानंतर ते चूप बसले होते. मात्र आबेदच्या घरी आबेद जाताच त्याच्या वडीलानं सांगीतलं की आपल्याला आजच पाकिस्तानात रवाना व्हायचं असून आज रातच्यालाच गाडी आहे.

आबेद वडीलांच्या शब्दाच्या बाहेर नव्हता. त्यातच त्याला वाटत होतं की आपला धर्म चांगला. आपण आपला धर्म सोडून इथं राहायला नको. शिवाय आपल्या धर्माला संरक्षण देणारा देश आपल्यासाठीच निर्माण होतोय. तेव्हा आपण

आपल्या देशात जायला हवं. असाच विचाऔर करीत तो रातच्यालाच पाकिस्तानात निघून गेला होता.

आबेद पाकिस्तानात गेला होता. शर्मिला मात्र भारतात होती. तिही त्या कोकणात. तिला तो भेटायला आला नव्हताच दुसऱ्या दिवशी.

दुसरा दिवस उजळला होता. आबेद भेटायला न आल्यानं ती समजून गेली होती की आबेद पाकिस्तानात गेलाय आणि आपण विनाकारणच त्याचेसाठी आपला हात कापलाय. तो धोकेबाज निघालाय आणि आपण आपल्याच हाताला वेदना देवून आपल्या हाताला दुःखी केलंय. आता आपण त्याला विसरायला हवं. कारण त्यानं धोका दिलाय. त्याला धर्म प्रिय होता. प्रेम नाही.

तिला आठवत होते ते दिवस. तो समुद्र आणि त्या समुद्रातील वाळू. कित्येक वेळेस तिनं त्या समुद्रात आपले व आबेदचे नाव कोरले होते आणि त्यानंही तिला ते नाव कोरतांना सहकार्य केलं होतं. शिवाय त्यानं तिचं नाव आपल्या छातीवर व तिनं त्याचं नाव आपल्या हातावर कोरलं होतं. मात्र वाळूवर कोरलेलं नाव. तसं नाव कोरताच समुद्राची एक लाट यायची व ती लाट ते संपुर्ण नाव मिटवून जायची. आज अशाच धर्मरुपी समुद्राची लाट येवून गेली आणि त्या लाटेनं आबेदला माझ्यापासून हिरावून नेलं.

शर्मिलाला आवडत होता आपला भारत. ज्या देशात ती लहानाची मोठी झाली होती. ज्या देशात तिचा जन्म झाला होता. ज्या देशात तिचं प्रेम झालं होतं. तसा आजपर्यंत आबेदही आवडत होता. तसं पाहिल्यास जरी मुस्लिमांनी त्या गावात

हिंदूंशी संबंध ठेवले नसतील तरी आबेद शर्मिलाच्या घरी येत असे व तिच्या वडीलांनाही तो गैर वाटला नाही.

शर्मिलाला आबेदची आठवण येत होती. परंतु ती त्याला पाकिस्तानात जाताच हळूहळू विसरायला लागली होती. जखम आता पुर्णतः बरी झाली होती. परंतु आबेदनं मनावर केलेली जी जखम होती, ती जखम अजून कोरडी व्हायची बाकी होती.

भारत स्वातंत्र्य झाला होता. स्वातंत्र्याचा उत्सव पार पडला होता. त्याचा सर्वत्र आनंद झाला होता. त्याचबरोबर आनंद शर्मिलालाही झाला होता.

दिनांक पंधरा ऑगस्ट. भारताला स्वातंत्र्य मिळाल्याचा गतकाळातील अतिशय मानाचा दिवस. त्या दिवशी तमाम भारतीयांना त्यांच्या मनमुराद स्वप्नांना आकार मिळाला व जाहीर झालं की आता यानंतर ब्रिटीशांची सत्ता राहणार नाही. ते येथून आपली सत्ता सोडून जातील. आता या भारतातील सत्ता येथीलच लोकं चालवतील आणि जेही लोकं चालवतील, त्यांनी कोणाला त्रास देवू नये.

भारताला स्वातंत्र्य जाहीर होताच दिनांक पंधरा ऑगस्टला रात्री बारा वाजताच ब्रिटीशांचा युनीयन जॅक खाली उतरला व त्याजागी भारताचा तीन रंगी तिरंगा वर चढला.

ती रात्र....... ती रात्र अतिशय मोलाची होती. सर्व भारतीयांनाच आनंद झाला होता. त्यातच तो आनंद येथील भुमी आणि वातावरणालाही झाला होता. जो आनंद प्रत्यक्ष पाहण्यासाठी पाऊस, वारा जातीनं हजर होता. तरीही लोकं डगमगले नाहीत. त्यांनी स्वातंत्र्योत्सव आपल्या गल्लीगल्लीत साजरा केला. असा स्वातंत्र्याचा

उत्सव साजरा करीत असतांना काही लोकांनाच निमंत्रण नव्हतं. त्यांना जाणूनबुजून विसरलं होतं येथील प्रशासन. ज्यांनी याच देशासाठी आपल्या प्राणांची बाजी लावली होती.

स्वातंत्र्याचा उत्सव साजरा झाला आणि त्यानंतर प्रश्न उठला निर्वासीतांचा. कारण दोन देश निर्माण झाले होते. जे दोन देश धर्माच्या आधारावर निर्माण झाले होते. अर्थात हिंदुस्थानचे दोन तुकडेच केले होते. एक देश होता पाकिस्तान तर दुसरा देश होता भारत.

हिंदूस्थान हा भारत पाकिस्तान या दोघांचाही भाग. भारत पाकिस्तान बनण्यापुर्वी येथील जनता ही हिंदूस्थानात निरनिराळया कानाकोपऱ्यात राहायची. ज्यात हिंदूही होते तसेच मुस्लिमही. या ठिकाणी पाकिस्तान देश बनविण्यात काही मुस्लिम नेत्यांची मागणी होती. परंतु त्यात तमाम हिंदूस्थानात राहणाऱ्या लोकांचे मत विचारात घेतले गेले नव्हते. ज्यात मुस्लिमांचाही समावेश होता. तसेच काही भागात राहणारे हिंदूही होते. असे हिंदू की जे भारत पाकिस्तान बनल्यावर पाकिस्तानातील कानाकोपऱ्यात राहात होते. तसेच असे मुस्लिम की जे भारत बनल्यावर भारतातील एका कोपऱ्यात राहात होते. ज्यांना भारत पाकिस्तानच्या सीमारेषाही माहित नव्हत्या. शिवाय त्यापैकी काही मुस्लिम लोकांना भारतात राहायचे होते तर काही मुस्लिम लोकांना पाकिस्तानात जायचे होते. तसंच काही हिंदू लोकांना भारतात यायचे होते तर काही हिंदू लोकांना पाकिस्तानातच राहायचे होते. त्यातच आव्हान सुरु होतं की ज्यांना ज्यांना भारतातून पाकिस्तानात जायचे असेल त्यांनी जावं व ज्यांना राहायचे असेल त्यांनी राहावं.

नेत्यांची मागणी. आम्हाला पाकिस्तान हवाच. ते खुळ त्यांच्या मनात कोणी भरलं? का भरल्या गेलं? ते खुळ फायद्याचं होतं की नुकसानदायक. यावर कोणीच विचार केला नाही. फक्त खुळ समोर आणले व त्यातून भारत पाकिस्तानची निर्मिती झाली.

ते खुळ. त्यालाही एक इतिहास आहे. म्हणतात की भारतात आलेले इंग्रज. त्यांनी या देशावर राज्य करण्यासाठी फोडा व झोडा या पद्धतीचा अवलंब केला. ते कधी हिंदूंच्या मनात मुस्लिमांविषयी आकस शिरवीत. जेणेकरुन वातावरण चिघळायला हवं. तसंच मत मुस्लिमांच्याही मनात टाकत असत. सन १८५७ चा उठाव याच विचारातून झाला. परंतु या उठावाच्या वेळेस हिंदू मुस्लीम भांडले नाहीत. ते एकत्र येवून लढलेत. फरक एवढाच की ते तुकड्यातुकड्यानं लढलेत. म्हणूनच पराभव झाला. त्यावेळेस इंग्रजांनी ओळखलं की जर हिंदू मुस्लीम एकत्र राहिले तर आपली या देशात डाळ शिजणार नाही. म्हणूनच त्यांनी लार्ड कर्झनच्या नेतृत्वात पुढे सन १९०५ मध्ये बंगालची फाळणी केली व धर्मांधतेला पहिला फाटा फोडला. त्यातच इंग्रजांनी हिंदूंची कमजोरी ओळखत मुस्लिमांना जास्तीचे अधिकार देणे सुरु केले. ज्यातून हिंदूंमध्ये मुस्लिमांबद्दल द्वेष निर्माण होईल. तसंच काही मुस्लीम नेत्यांना हाताशी घेवून त्यांच्यात हिंदूंविषयी दुहीचे बीज पेरले. बीज हेच की त्यांच्यावर हिंदू अत्याचार करतात. यातूनच मुस्लीम कवी इकबालनं मुस्लीम लीग संमेलनात सन १९३० मध्ये स्वतंत्र पाकिस्तानची मागणी केली. त्यानंतर याच मागणीला सन १९३५ मध्ये दुजोरा मिळाला.

मुस्लीम लीग मुस्लिमांची. त्यातच पाकिस्तानची मागणीही मुस्लिमांची. मुस्लिमांसाठी तो खास स्वतंत्र्य देश. त्यावर काही मुस्लीम लोकं खुश होते तर काही

नाखूश होते. परंतु स्वतंत्र्य पाकिस्तान कवी इकबाल यांना का हवा होता? त्यात षडयंत्र कोणाचं? ही गंभीर बाब त्या काळात कोणीही विचारात घेतली नाही. शिवाय आजही ती बाब आपल्याला कळलेली नाही.

ती इकबालनं जी स्वतंत्र्य पाकिस्तानची मागणी केली होती. त्यात इंग्रजांचाच हात असेल. परंतु एक विचार केल्यास तो इंग्रजांचा त्यावेळेसचा हेतू नसेल. परंतु नंतर इंग्रजांनी त्यांच्या स्वतंत्र्य पाकिस्तानची मागणी ताबडतोब मान्य केली. ज्यात दोन हेतू होते. पहिला म्हणजे आपल्याला मुस्लिमांनी चांगलं म्हणावं. तसाच दुसरा हेतू म्हणजे तमाम भारतीयांना मुस्लिमांपासून छुटकारा मिळावा. कारण त्यांनी बऱ्याच वर्षांपासून पाहिलं होतं. हिंदू मुस्लीम आपापसात लढत होते व एकमेकांच्या धार्मिक भावना तर दुखवत होतेच. शिवाय एकमेकांचे मुंडके छाटायलाही मागेपुढे पाहायचे नाहीत.

मुस्लिमांची जोर धरणारी पाकिस्तान मागणी. त्याला सहमती देत इंग्रजांनी केलेले अखंड हिंदूस्थानचे तुकडे. त्यातच महात्मा गांधींना वाटत असलेलं देशप्रेम. त्यांना अखंड हिंदूस्थानचे तुकडे झालेले चालत नव्हते. कारण काही काही मुस्लीम नेत्यांनी त्यांच्याशी बोलणी केली असेल की आम्ही भारत सोडून जात नाही. आम्हाला हाकलू नये. त्यानंतर महात्मा गांधी चक्कं उपोषणाला बसले. परंतु त्यांच्या उपोषणानं देशातील काही लोकांच्या भावना थोडं ना बदलणार! शेवटी काही हिंदू लोकांना वाटत होतं की भारतात राहणाऱ्या मुस्लिमांनी पाकिस्तानातच जावून राहायला हवं. तसंच काहींना वाटत होतं त्यांनी इथंच राहावं. ते आपले मित्र आहेत. तसंच पाकिस्तानातील काही मुस्लीम लोकांना वाटत होतं की येथे राहणाऱ्या तमाम हिंदू लोकांनी भारतात जावं. तर काहींना ते तिथंच राहावं असं वाटत होतं. हाच वाद

होता व यावरुनच दंगे सुरु झाले. त्यातच काही लोकांनी आपलीच माणसं कापली. ज्यातून भडका उडाला व धार्मिक दंगली सुरु झाल्या. त्याचा परिणाम हा झाला की तद्नंतरच्या काळात निर्वासीतांचा प्रश्न सुटला नाही. ज्यांना जिथे जायचे होते. ते तिथेच राहिले. त्यांची इच्छा पुर्ती झाली नाही. मात्र तो इतिहास बनला. रक्ताळलेला इतिहास. धार्मिक दंगलीचा इतिहास. जो त्यांचे त्यांचे पुर्वज आपल्या आपल्या पिढ्यांना आज सांगत होते व त्यावरुनच आज भारत जरी स्वतंत्र्य झाला असला तरी आजही हिंदू मुस्लीम वाद होत होते. काही काही लोकं स्वतःच स्वतःच्याच धर्मातील माणसांवर, बिरादरीवर गोळ्या चालवत होते व त्याला धार्मिक रंग देवून दुसऱ्या धर्मातील लोकांची नावं पुढं करत होते. त्यातच धर्मांना बदनामही करत होते.

प्रत्यक्ष फाळणीची प्रक्रिया "लार्ड मांउटबॅटन योजनेअंतर्गत" पार पडली. ब्रिटिश सरकारने नेमलेल्या सिरिल रेडक्लिफ या अधिकाऱ्याने प्रत्यक्ष सरहद्द निश्चित केली. १८ जुलै १९४७ रोजी ब्रिटिश संसदेत भारताच्या स्वातंत्र्याचा कायदा मंजूर झाला. यात भारतातील ५६५ संस्थानांना हवा तो पर्याय निवडण्याची मुभा देण्यात आली. भारत पाकिस्तानचा जन्म झाला. भारताला स्वातंत्र्य तर मिळालंच. ज्यातून हिंदूसाठी भारत व मुस्लिमांसाठी पाकिस्तान निर्माण केल्या गेला. परंतु हे जरी खरं असलं तरी तमाम भारतात त्यावेळेपासून हिंदूसोबत मुस्लीम राहात होते. आजही राहतात. तसेच पाकिस्तानमध्ये त्यावेळपासून हिंदू राहात होते, आजही राहतात. ज्यांना ज्यांना ज्या ज्या ठिकाणी राहायचे होते. ते राहात आहेत आजही. याचाच अर्थ असा की आजही भारतात तसंच पाकिस्तानात विविध धर्माचे लोकं आहेत. जे त्यावेळेस अखंड हिंदुस्थानात होते. मग भारत आणि पाकिस्तान का निर्माण केला? यावर आता उत्तर सापडत नाही. परंतु हाच विषय व विचार मनात ठेवून कधीकधी

आजही बॉम्बस्फोट होतात काहीकाही ठिकाणी. कधी आपलीच मंडळी बॉम्बस्फोट करुन दुसऱ्यांना बदनाम करतात तर कधी दुसऱ्या धर्माची मंडळी बॉम्बस्फोट करतात. ज्यात निरपराध लोकांचा बळी जात असतो.

आबेद लहान होता. तेव्हा स्वातंत्र्य म्हणजे काय? हे त्याला समजत नव्हतं. ना निर्वासीतही समजत होते. परंतु त्याची झळ जेव्हा त्याला पोहोचली. जेव्हा तो मोठा झाला होता. तेव्हा स्वातंत्र्य म्हणजे काय? हे नक्कीच त्याला समजायला वेळ लागली नाही. मात्र या स्वातंत्र्यानं पुढं माणुसकी सोडली होती व हिंसाचार सुरु झाला होता. आपलीच माणसं आपल्याच माणसांचा गळा कापू लागली होती.

शर्मिला ते सगळं पाहात होती. ती त्या सर्व गोष्टीचं निरीक्षण करीत होती. ती भारतातच होती. तिला वाटत होतं की, झाली गोष्ट झाली. काही चुकाही झाल्यात. तसं पाहिल्यास भारताला वा पाकिस्तानला स्वातंत्र्य मिळणं अतिशय महत्वाचं होतं. परंतु त्यातून भारत पाकिस्तान वाद उत्पन्न होणं वा हिंदू मुस्लीम तेढ निर्माण होणं तेवढं महत्वाचं नव्हतं. जो वाद आज विनाकारण उत्पन्न होत आहे. तसं पाहिल्यास चुकांपासून शिकणं हा निसर्ग नियम आहे. हीच वस्तुस्थितीही आहे आणि हीच गोष्ट पुर्वीपासून चालतही आलेली आहे. तेव्हा झालेल्या त्या सर्व आपल्या चुका सुधारून आपण सर्व हिंदू मुस्लीम लोकं, तसेच इतरही धर्माचे लोकं एकत्रीत राहूया. पाकिस्तानचं जावू द्या. आपण आपल्या भारताचा विचार करुया. आपला भारत बलशाली बनवूया. तसंच त्याला सुजलाम सुफलाम बनवूया. जेणेकरुन येणाऱ्या पिढीतील प्रत्येक भारतीय माणसाला गर्व वाटेल व त्याची छाती वीतभर फुगेल. जर आपण तसे वागलो तरच देश जागतिक महासत्ता बनेल. आपल्याला आपल्या देशाला जागतिक महासत्ता बनवता येईल. नाहीतर पुन्हा एकदा या भारताचे तुकडे

होवून पुन्हा दोन नवीन देश निर्माण होतील. ज्यात पुन्हा एकदा निर्वासीतांचा प्रश्न उद्भवेल. मग धार्मिक दंगे, कत्तली, हिंसाचार, जाळपोळ होईल. ज्यातून विनाकारण निष्पापांचे मुदडे पडतील. मग जागतिक महासत्ता जाईल खड्ड्यात. एरवी देश सुजलाम सुफलामही बनणार नाही. अन् बलशालीही बनणार नाही. म्हणूनच मिळालेलं स्वातंत्र्य अतिशय मेहनतीनं व बलिदानानं मिळालेलं आहे. ते टिकवूया. तसंच अबाधीत ठेवूया. एकमेकांशी न भांडता, न वाद करता. गुण्यागोविंदाने आणि तेवढ्याच एकजुटीने.

शर्मिलाचा तो विचार. त्या विचारात काहीसं तथ्य होतं. कारण ते विचार भारताला उज्ज्वल बनविण्याच्या हेतुनं सकारात्मक असे विचार होते.

भारत पाकिस्तान वाद होतच होता. हिंसाचारही होतच होता. परंतु निर्वासीतांचा प्रश्न मिटला होता. आता कायमस्वरुपानं मुस्लीम व हिंदू समुदाय आपापल्या देशात राहू लागले होते. मात्र शर्मिलाला आजही आठवत होता आबेद. कधी कधी त्याची आठवण आलीच तर जीव कासावीसही व्हायचा. परंतु त्याच आठवणीवर फुंकर टाकत ती पुढं चालायची. मात्र त्या आठवणीनं आता ती सतत निराश होत असे. ती आठवण काही केल्या पुसली जात नव्हती. अशातच तिचं वय ढळून जावू लागलं होतं.

वय उतरुन जावू लागलं होतं. तशी तिच्या विवाहाची काळजी तिच्या मायबापाला होत होती. त्यामुळंच तिच्यासाठी स्थळ पाहणे सुरु झाले होते. अशातच एक स्थळ आलं व शर्मिलानं आपला विवाह करुन टाकला. ज्यात ती आपल्या

स्वतःला हरवून गेली होती. तिला पती एवढा चांगला मिळाला होता की तो तिच्यावर बराच प्रेम करु लागला होता. तिला कोणत्याच स्वरुपाची उणीव भासू देत नव्हता.

*************

भारत हा आधीपासूनच अतिशय सुजलाम सुफलाम देश आहे. या देशाचाही अतिभव्य असा इतिहास आहे. तो इतिहास समृद्ध आहे. शिवाय या देशात असे असे वीरपुरुष जन्माला आले की ज्याचा आपल्याला गर्व वाटतोय.

भारताला स्वातंत्र्य १५ ऑगस्ट १९४७ ला मिळालं. प्रचंड प्रमाणात असलेल्या इंग्रजांच्या दहशतीतून भारत स्वातंत्र्य झाला. त्यासाठी कित्येक लोकांना बलिदान द्यावे लागले. ज्यात केवळ हिंदूच नव्हते तर तमाम मुस्लीम व शिखही होते. ज्यांनी आपल्या प्राणांची बाजी लावली होती. आज ते नाहीत, परंतु त्यांच्या आठवणी आजही तेवत असतात आपल्या प्रत्येक भारतीय माणसांच्या मनामध्ये.

भारत स्वतंत्र झाला, तेव्हा काही प्रश्न निर्माण झाले होते. ज्यात पहिला प्रश्न होता. तो म्हणजे निर्वासीतांचा. तो प्रश्न सोडविणे भाग होते. कारण असे असे काही राज्य होते की त्या राज्यातील काही लोकांना पाकिस्तान हवाच होता तर काही लोकांना तेवढ्याच प्रमाणात भारतही. शिवाय काही राजे असेही होते की तेथील राजांना पाकिस्तान आवडत होता आणि जनतेला भारत. अशातच सरदार वल्लभभाई पटेलच्या नेतृत्वात बऱ्याच राज्यांचे प्रश्न सोडवले गेले आणि संबधीत सर्व राज्य भारत आणि पाकिस्तानात विलीन करण्यात आले. भारत स्वतंत्र्य

झाल्यावर दुसरा प्रश्न निर्माण झाला. तो म्हणजे संविधानाचा. भारत स्वतंत्र्य तर झाला होता. परंतु येथील कारभार चालवायचा कसा? कोणत्या यंत्रणेनुसार कारभार चालवायचा. त्यासाठी काही नियमावली लिखीत स्वरुपात हवी होती. तो मुद्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या नेतृत्वात मसुदा समितीनं सोडवला. तिसरा प्रश्न होता, अन्न पिकवणे व त्यात वाढ करणे. जर अन्नच पिकलं नाही तर आपण आपल्या देशातील तमाम भारतीयांना खायला काय घालणार? हाही एक कळीचा मुद्दा होता. कारण इंग्रज या देशातून जेव्हा स्वातंत्र्य देवून गेले. तेव्हा जातांना त्यांनी या देशात काहीच असं शिल्लक ठेवलं नव्हतं. सर्व बाबतीत भारताला लुटलूट लुटलं होतं. त्यामुळं तोही एक प्रश्नच होता व तो प्रश्न सोडवतांना पंडीत नेहरुंनी तमाम पंचवार्षिक योजना राबववल्या व सिंचनाखाली जास्तीत जास्त क्षेत्र आणलं. व्यतिरीक्त भारताची उच्चकोटीनं प्रगती केली. चौथा प्रश्न होता शिक्षण. गावागावात शिक्षणाच्या सोयी पुरविणे. कारण शिक्षण जर नसेल, तर कोणीही कोणाला मुर्ख बनवू शकतं. हे सरकारचं म्हणणं होतं. त्यातच भारतीय नेत्यांना वाटत होतं की माझ्या देशातील कोणत्याही व्यक्तीला, तो कुठेही गेलेला असतांना कोणीही मुर्ख बनवायला नको. मग काय, तीच बाब हेरुन सरकारनं सरकारी शाळा ह्या गावागावात काढल्या व सर्वांच्या प्राथमिक शिक्षणाच्या सोयी मोफत केल्या गेल्या. पाचवा प्रश्न निर्माण झाला होता रस्त्याचा. सरकारनं पाहिलं की दळणवळण करायला रस्ते नाहीत आणि दळणवळण जर केलं गेलं नाही तर एका ठिकाणचा माल दुसऱ्या ठिकाणी जाईल कसा? याच प्रश्नातून रस्त्याची निर्मीती झाली व दळणवळणाचा प्रसार झाला. त्यातच सरकारनं पाहिलं की आपण रस्ते बनवले. परंतु त्या रस्त्यावर पुल. पावसाळ्यात पाऊस पडायचा. तेव्हा नद्या तुडूंब भरलेल्या असायच्या. त्यावेळेस वाहतूक

खोळंबायची. कारण जायला जागाच नसायची. सरकारनं विचार केला की जर नदीवर पुल नसेल आणि दोन दोन दिवस रस्त्यावरील वाहतूक खोळंबळत असेल तर त्या साधनात असणारा माल खराब होवून फेकला जाईल. अशानं अतोनात नुकसान होईल. यातूनच पुलाची कल्पना आली व पुलं बांधल्या गेलीत. पुढं सरकारनं पाहिलं की मोठमोठे पुलं देशात आहेत. परंतु छोट्या पुलाचं काय? छोटे पूल जर नसतील तर गावातील माल शहरात येणार कसा? शिवाय मुलं गावातील ओढ्याला पाणी असल्यानं शाळेत जात नाहीत. शिक्षण बुडतं. त्यावर उपाय म्हणून सरकारनं गावागावात लहान लहान रस्ते निर्माण केले. त्यानंतर विचार केला उद्योगाचा. देशात उद्योग नसतील तर आत्मनिर्भरता येईल कशी? लोकांना रोजगार मिळेल कसा? याच दृष्टीकोनातून विचार करुन सरकारनं उद्योगांची व कारखान्यांची निर्मीती केली. नंतर सरकारनं पाहिलं की आता देश विकासाच्या क्षेत्रात आघाडीवर गेला. परंतु हे सर्व करीत असतांना देशात वीज जर नसेल, तर उद्योगधंदे चालतील कसे? कारण उद्योगधंदे हे विजेवर अवलंबून असतात. मग सरकारनं वीज निर्माण करण्याला प्राधान्य दिलं. त्यानंतर सरकारला वाटलं की जनतेचं आरोग्यही बघावं. जर जनतेचं आरोग्य चांगलं असेल तरच ते कारखान्यात काम करु शकतील. त्यानंतर कारखान्यात काम करणाऱ्या मजबूत व सशक्त कामगाराची गरज पुर्ण करण्यासाठी सरकारनं मोठमोठी रुग्णालये उघडली. त्यानंतर सरकारला वाटलं की जे आपण रुग्णालय उघडलं आहे. त्या रुग्णालयात रोगी जास्त आहेत. ते का येतात? या कारणांचा शोध घेतल्या गेला व कळलं की देशात पिण्यासाठी स्वच्छ पाणी मिळत नाही. तसेच सर्व आजार हे दुषीत पाणी प्यायल्यानं होत आहेत. त्यामुळंच तसा विचार करीत असतांना सरकारनं गावागावात व शहरा शहरात नळलाईन पुरवली.

त्यातच पाण्याचाही प्रश्न सोडवला. त्यानंतर सरकारनं पाहिलं की आपण रस्ते बनवले. परंतु ते रस्ते लहान पडतात. त्यामुळं अपघात होतो. मग रस्ते मोठे केले. तरीही अपघात होतच होते व त्यात लाखो रुपयाचं नुकसान होत होतं. ते पाहून सरकारनं मोठ्या रस्त्यावर रस्ते दुभाजक लावले. असे बरेच प्रश्न होते. या सर्व गोष्टी अल्पावधीतच भारतानं पुर्ण केल्या. परंतु कोणत्याच भारतीयांना त्यांनी उपासात ठेवलं नाही वा कोणत्याच भारतीयांची उपासमार होवू दिली नाही.

आज आम्हाला भारताचं समृद्ध असं रुप दिसत आहे. देश सुजलाम सुफलाम दिसत आहे. सगळीकडं रस्ते चकाचक दिसत आहेत. गावागावात रस्ते पोहोचले आहेत व ते पक्क्या स्वरुपाचे दिसत आहेत. मोठ्या तसेच छोट्या नद्यांवर पुल दिसत आहेत. गावागावात वीज पोहोचलेली दिसत आहे. गावागावात शाळा आणि शिक्षण, शिवाय आरोग्याच्या सुविधा पोहोचलेल्या दिसत आहेत. सिंचनाच्या सोयी दिसत आहे. पिण्याच्या पाण्याच्या सोयी आज गावागावातही दिसत आहेत. उद्योगही निर्माण झाले आहे. तसेच काही मोठ्या शहरात मोठमोठे सरकारी रुग्णालये देखील.

शिक्षणाच्या सुविधाही गावागावात पोहोचल्या आहेत. नदीवर भव्यदिव्य पुलाचे निर्माण केले गेले आहेत. विज्ञानाच्या बाबतीतही देश आघाडीवर आहे. आज देश चंद्रावर पोहोचलेला आहे. हेच नाही तर देशानं कित्येक अणूबाँब बनवले आहेत आणि कितीतरी प्रमाणात अणूबाँब बनवले आहे. आज देश महासत्ता बनण्यास तयार आहे. त्याचं कारण म्हणजे गतकाळातील नेत्यांनी घेतलेली मेहनत. ती मेहनत एवढ्या प्रमाणात घेतली आहे की विचारता सोय नाही. तसे नेते आज दिसत नाहीत. त्यांची वानवा जाणवते. मात्र असं निश्चीतपणानं म्हणता येईल की

आजच्या नेत्यांनीही त्यांच्यासारखंच बनण्याचा प्रयत्न करावा. त्यांच्यावर ताशेरे न ओढता. जेणेकरुन देशाचा अतिशय उच्च कोटीचा विकास होवू शकेल. गतकाळात असेही काही राजकारणी होवून गेलेत की ज्यांनी केवळ आणि केवळ आपल्या देशासाठीच काम केले. जोही उत्पन्नाचा पैसा यायचा. त्या पैशानं आपलं घर भरलं नाही, तर त्या पैशातून आपल्या देशाचा विकास केला. म्हणूनच ही भरभराट दिसते आहे. मात्र काही मध्यंतरीच्या काळात काही नेत्यांनी भ्रष्टाचार करीत मंत्री बनल्यावर देशाचाच पैसा खाल्ला नव्हे तर जनतेचा पैसा खाल्ला. आपल्या परीवारांना सशक्त बनविण्यासाठी. त्यांनी भ्रष्टाचार केला व नेत्यांच्या पुर्वी असलेल्या स्वच्छ प्रतिमेवर कलंक लावला. खरं तर नेते बनल्यावर अशा प्रकारचा देशातील पैसा त्या नेत्यांनी खायला नको होता.

आज भारत स्वतंत्र्य आहे व या स्वतंत्र्य भारतातील आजचे काही नेते बरळतात की गतकाळातील बऱ्याच नेत्यांनी भ्रष्टाचार केला, पैसा खाल्ला. ठीक आहे. भ्रष्टाचार केला, पैसा खाल्ला. परंतु तो पैसा कोणी खाल्ला? असा प्रश्न उपस्थीत झाल्यास एक प्रश्न हाही निर्माण होतो की ज्या काळात भारताला स्वातंत्र्य मिळालं, त्यावेळेस देशाजवळ किती प्रमाणात पैसा होता? शिवाय असंही म्हटलं जातं की कालपर्यंत असा पैसा खात असतांना देशाचा विकासच झाला नाही. मग देशाचा विकासच झाला नाही तर आज जे गावं न् गाव रस्त्यानं जोडलेली दिसतात, ती कोणी जोडली? आज गावागावात शाळा दिसतात, त्या कोणी निर्माण केल्या? आज गावागावात सिंचनाचे प्रकल्प दिसतात, ते कोणी निर्माण केले? तसेच काल अवकाशात गेलेला आर्यभट्ट कोणी पाठवला? गावागावात वीज कशी पोहोचली? खरं तर भारत स्वतंत्र्य झाला, तेव्हा आपल्या देशाची हालत खस्ता होती. सारेच प्रश्न

आ वासून उभे होते आपल्यासमोर. परंतु तत्कालीन नेत्यांनी एवढी मेहनत केली भारताला उभारणी देण्यासाठी की त्याची कल्पना आपण करु शकत नाही. शिवाय आपल्या भारतानं विकास करु नये म्हणून आपल्याच उरावर बसलेला पाकिस्तान चीनच्या माध्यमातून आपल्याला नेस्तनाबूत करु पाहात होता. परंतु त्यांनाही मात देत देशानं त्यांनाही चूप बसवलंच होतं. म्हणून देशाचे नेते त्याकाळचे कोणतेही का असेना, त्यांच्यावर ताशेरे ओढणे बरे नाही. असे ताशेरे ओढण्यापेक्षा आपण काय करतो याकडे प्रत्येकानं लक्ष द्यावं. आपण त्यांच्या तोडीचं काम आधी करावं. मगच बोलावं. कारण विकास झालेला आहे आणि तोही भरपूरच झालेला आहे. शिवाय विकास झालेला असण्याची बाब सत्य आहे. त्यात किंचीतही असत्यता नाही.

भारत आज एक सुजलाम सुफलाम देश बनला होता. त्यातच भारतात राहणारी शर्मिला आपल्या संसारात रममाण झाली होती. तिचा पती तिला चांगलंच वागवत होता. त्यातच कोणत्याही गोष्टीची तिला कमी पडत नसे.

भारतात आजमितीस चांगल्या सुधारणा झाल्या होत्या. चांगले रस्ते बनले होते. शिक्षणाच्या सोयी झाल्या होत्या. उद्योगधंदे निघाले होते. रोजगाराचा प्रश्न सुटला होता. नदीवर पुल बनले होते. गावागावात वीज पोहोचली होती.

शेतीसाठी सिंचनाच्या सोयी झाल्या होत्या. त्यातच शेती सुधारली होती. पिण्याच्या पाण्याच्या सोयी झाल्या होत्या. शिवाय आता शेती चांगली पीकत होती. त्यातच कोणत्याही नागरीकास कोणत्याही कामासाठी अडकावं लागत नव्हतं. मात्र पाकिस्तानात तशा सोयी नव्हत्या. मुख्य दोन चार रस्ते जर सोडले तर बाकी सर्वच रस्ते बेताल होते. त्यावर साधं डांबरीकरण नव्हतं. महिलांना तर शिक्षणाच्या संधी

नव्हत्या. त्यांना बुरख्यात राहावं लागत होतं. त्यातच त्यांना मुलं पैदा करण्याची मशीन समजलं जात होतं. शिक्षण होतं. परंतु त्या शिक्षणातही भेदभाव होताच. मुलं उच्च शिक्षण शिकू शकत होते. मात्र मुलींना उच्च शिक्षणाची बंदी होती. शिवाय काही काही घरात महिलांना नोकरी करण्याचा अधिकार नव्हता. तशी बरीचशी मंडळी शिक्षणापासून वंचीतच होती.

उद्योगाबाबत सांगायचं झाल्यास उद्योगधंदे कमी होते. त्यातच बेरोजगारी जास्त होती. उपासमार सतत होत असे. तसेच बरेचसे कुटूंब उपासमारीतच जगत होते. ना नद्यांवर पुल होते. ना बरोबर दळणवळणाच्या सोयी होत्या. शिवाय जर एखाद्या व्यक्तीस काम पडल्यास त्याची कामं नीट होत नव्हती. त्याला सतत चकरा माराव्या लागत असत.

आबेद आज पाकिस्तानात स्थिरावला होता. त्याला शर्मिलाची आजही आठवण येत होती. तिच्यावर त्याचा जीव जडला होता. परंतु आता थोडी समस्या होती. ती समस्या म्हणजे त्याचं तिला भेटणं. कधीकधी त्याला तिची आठवण आली की त्याचाही जीव कासावीस व्हायचा. कधीकधी तिला केव्हा भेटतो. असंही होवून जायचं.

आबेदला आठवत होतं, ते तिच्यासोबत समुद्रकिनारी वाळूत फिरणं. त्यातच आठवत होता तो प्रसंग. ज्यावेळेस त्यांनी आपलं नाव समुद्राच्या वाळूत कोरलं होतं. जे समुद्राच्या लाटेनं मिटून गेले होतं आणि तोही एक प्रसंग आठवत होता. ज्यावेळेस तिनं आपल्या हाताची नस कापली होती, त्यानं तिच्यासोबत राहावं म्हणून. शिवाय तेही आठवत होतं की तिला दिलेलं भेटण्याचं आश्वासन. तिचा विचार होता, त्याला

भेटण्याचा आणि त्यानं तिला दुसऱ्या दिवशी भेटण्याचं आश्वासन दिलं होतं. परंतु तो दुसऱ्या दिवशी तिला भेटण्यासाठी थांबलाच नाही. तो तर पाकिस्तानात आला होता. कदाचीत ती जीवंत असेल का? त्याला आज तिच्या बाबतीतील तो प्रश्न पडला होता.

आबेदला जशी तिची आठवण येत होती. तशीच त्याची पाकिस्तानात कोणती कामंही लवकर होत नव्हती. त्याला त्या कामात प्रशासनाची दिरंगाई दिसून पडत होती. अशातच भारताची स्थिती त्याला माहीत पडत होती. भारत किती प्रमाणात संपन्न झाला. किती प्रमाणात नाही. या साऱ्या गोष्टी त्याला माहीत पडल्या होत्या. त्यातच त्याला तो राहात असलेल्या पाकिस्तानातील हाल माहीत होते. ते पाहता त्यावेळेस वाटत होतं की जर आपण पाकिस्तानात येण्याऐवजी भारतातच राहिलो असतो तर बरे झाले असते.

भारतात यायची ओढ त्याच्या मनात निर्माण झाली होती. त्यातच शर्मिलाला केव्हा केव्हा भेटतो आणि केव्हा केव्हा नाही, असंही होवून गेलं होतं. भारतातही आपल्यासारखे मुस्लीम आहेत. ज्यांची स्थिती उत्तम आहे याचीही जाणीव त्याला झाली होती. अशातच तो विचार करु लागला होता भारतात येण्याचा. त्यातच तो कागदपत्र बनवू पाहात होता. कारण त्याला भारतात यायचे होते.

# धर्मयोगी भाग तीन

आबेद आज थोडा वयस्क झाला होता. तो विवाहयोग्य झाला होता. त्याचे आईवडील तिथं जाताच मरण पावले होते. परीवार तसा वाचला नव्हताच.

आबेद वयानं वाढला होता. तसं पाहिल्यास त्याचं विवाहयोग्य वय झालं होतं. परंतु त्याला कोणतीच मुलगी आवडत नव्हती. सारखं वाटत होतं की शर्मिला भेटावी व आपल्याला तिच्याशी विवाह करता यावा. त्यातच त्याला आठवत होती तिची जखम. तिचं हाताची नस कापणं. शिवाय आपणच तिचा विश्वासघात करुन तिला धोका दिल्याचंही जाणवत होतं.

आबेदला विचार येत होता. विचार येत होता तिला भेटण्याचा. परंतु भेटावं कसं. कारण त्याचेजवळ पैसा नव्हता. त्याचं कारण होतं, हाताशी काम नसणं. तसं त्याला त्याचा भुतकाळ आठवत होता. तो भुतकाळ की ज्या भुतकाळात पाकिस्तान निर्माण होत होता आणि आबेदला आपण मुस्लीम असल्यानं आपल्यासाठी पाकिस्तान एक चांगला देश ठरेल असं वाटत होतं. शिवाय धर्मासाठीही त्यानं ते पाऊल उचललं होतं. परंतु आता असं वाटायला लागलं होतं की आपला तो विचार रास्त नव्हता. कारण त्याचे पाकिस्तानमध्ये हालहाल होत होते. ज्याचं कारण होतं तो मुस्लीम असला तरी त्याची बिरादरी. त्याची बिरादरी अहमदी असणं.

आबेद अहमदी परिवारातील होता. तो मुस्लीम नक्कीच होता. परंतु अहमदी बिरादरीतील असल्यानं त्यांच्या बिरादरीला मुस्लीम धर्मातील उच्च जातीत स्थान नव्हतेच. त्यातच त्याच्या बिरादरीला पाकिस्तानमध्ये वागणूक अतिशय तुच्छ स्वरुपाची मिळायची. तो मुस्लीम समुदाय आबेदला मुस्लीमच मानत नव्हता.

अहमदी समाज ही मुस्लिमातील एक बिरादरी. ते एक धार्मिक आंदोलन होतं. त्या आंदोलनाची सुरुवात गुलाम अहमदच्या जीवनापासून व त्याच्या शिक्षणापासून झाली असे म्हटले जाते. मिर्झा गुलाम अहमदचा काळ सन १८३५ ते १९०८ हा होय. अहमदी समुदाय हे गुलाम अहमदला मोहम्मद पैंगबरानंतरचाही दूत मानतात. जसे मोहम्मद पैगंबर अल्लाचे दूत तसेच मिर्झा गुलाम अहमद देखील अल्लाचे दूतच.

अहमदी समुदायाला मुस्लीम लोकं काफिर मानतात. मुस्लीम मानत नाहीत. मात्र अहमदी समुदाय स्वतःला मुस्लीम मानतात. परंतु समस्त मुस्लीम समुदाय त्यांना मुस्लीम समजत नाही, त्याचं कारण आहे. त्यांच्या परंपरा, रितीरिवाज व विचार. ते विचार मोहम्मद पैगंबराला दूत मानतात. त्याबरोबर इतर सर्व थोरांनाही दूतच मानतात. मात्र मुस्लीम समुदाय केवळ मोहम्मद पैगंबरांनाच अल्लाचा दूत मानतात. ते इतरांना दूत मानत नाहीत. हाच फरक आहे अहमदी समुदाय आणि तमाम मुस्लीम समुदायात. मुस्लीमातील बाकी सर्व समुदाय मोहम्मद पैगंबराला शेवटचा पैगंबर मानतात. परंतु हा अहमदी समुदाय तसं मानायला तयार नसतो. तो असे मानतो की मोहम्मद पैगंबरानंतरही या पृथ्वीतलावर अनेक पैगंबर झाले. त्यातच मुस्लीम म्हटलं की दाढी, टोपी, नमाज, कुराण मानणे, अल्लाचा जाप करणे, रहनसहन या सर्व गोष्टी येतात. मात्र यापैकी बऱ्याच गोष्टी अहमदी समुदाय पाळत

असले तरी त्यापैकी ज्या गोष्टी ते पाळतात. त्यात बराच फरक आहे. शिवाय तो फरक बारीक निरीक्षण केल्यास निदर्शनास येतो. जसं हिंदू समुदायात एक इश्वर व अनेक इश्वर मानणारे असतात. तसंच मुस्लिमांमधील असलेल्या एकच दूत मोहम्मद पैगंबर नावाच्या एकेश्वरवादाला हा समाज मानत नसल्यानं सबंधीत मुस्लीम समाजच त्यांना मुस्लीम म्हणून स्विकारत नाही. त्या समुदायांच्या मतानुसार मोहम्मद पैगंबर एकच होवू शकत नाही. तो नेहमीच अवतार घेतो असंही हा समुदाय मानतो. त्यातच हा समुदाय असेही म्हणतो की पैगंबरी परंपरा ही थांबलेली नाही. ती कालानुरूप जन्म घेत असते. निवास करीत असते व परीवर्तनही करीत असते. परंतु कट्टर मुस्लीम असणारे लोकं हे सर्व मानत नाहीत.

अहमदी समुदायाच्या या सर्व गैर मुस्लीम वागणुकीमुळे जरी अहमदी समुदाय स्वतःला मुस्लीम समजत असला तरी इतर मुस्लीम समुदाय त्यांना मानाचं स्थान देत नाहीत.

अहमदी समुदयाबाबत सविस्तर सांगायचं झाल्यास गुरुदासपूर येथील कादियान नामक कस्ब्यात २३ मार्च १८८९ मध्ये एक आंदोलन झालं होतं. ज्यात एका अहमदी मुस्लीम व्यक्तीनं मसीहा पुन्हा येईल अशी घोषणा केली. त्यानंतर मिर्झा गुलाम अहमदनं त्याबाबत आंदोलन सुरु केलं. त्यानंतर त्याच मिर्झा गुलाम अहमदनं स्वतःला सन १८९१ मध्ये मसीहा घोषीत केलं. परंतु हे जरी खरं असलं तरी या समुदायाच्या प्रथा, परंपरा, रहनसहन यामध्ये बराच फरक असल्यानं की काय, सन १९७४ मध्ये पाकिस्तान सरकारनं त्यांना गैरमुस्लीम करार दिला व त्याची नोंद पाकिस्तानच्या संविधानात घेतली.

आबेद पाकिस्तानात राहात होता. परंतु तो अहमदी असल्यानं ज्याप्रमाणे त्याला मानसन्मान मिळत नव्हता. त्याला कामधंदेही मिळत नव्हते पाकिस्तानात. ज्यामुळं तो गरीब झाला होता. ज्यातून एक लहानशी झोपडी बांधल्या गेली होती.

तो पाकिस्तानात असतांना भारताविषयीच्या गोष्टी त्याचेपर्यंत जात होत्या. ज्या गोष्टीमध्ये येथील तमाम मुस्लिमांच्या अधिवासाबद्दल त्याला माहीती मिळत असे. भारतात अधिवास करीत असलेला तो मुस्लीम समुदाय आज विकासाच्या क्षेत्रात आघाडीवर गेला होता. त्यांनी कितीतरी मोठमोठी घरे बांधली होती. शिवाय देशात त्यातील काही मुस्लीम मंडळी अधिकारक्षेत्रात मोठ्या हुद्यावर होती. काही तर आमदार, खासदार असून राजकारणात सक्रिय सहभागी होती. शिवाय त्यांना सर्वच क्षेत्रात प्राधान्य देण्यात आलं होतं.

आबेदच्या कानावर जेव्हा या वार्ता यायच्या. तेव्हा त्याला भारताबद्दल प्रेम निर्माण होत होतं व वाटत होतं की आपणही भारतात जावं व भारतातच अधिवास करावा. तोही कायमचाच. तसा तो विचार करीत होता.

विचार करता करता त्याला आठवलं की आपल्याला भारतात जर जायचं असेल तर त्याचा व्हिसा बनवावा लागेल. त्याशिवाय आपल्याला भारतात प्रवेश मिळणार नाही.

विचारांचा अवकाश. लागलीच आबेदनं पासपोर्ट बनवायला सुरुवात केली. कारण त्याला ताबडतोब भारतात यायचे होते. परंतु कसे येणार. व्हिसा बनेल तेव्हा ना.

तो व्हिसा. त्या व्हिस्यासाठी त्याला फारच धावपकड करावी लागली. शिवाय तेवढं करुनही पैसे लागतच होते आणि आबेदजवळ पैसे नव्हतेच. त्यातच कागदपत्र तयार करतांना कारण विचारल्या जात होतं. कारण काय द्यायचं? ह्याही प्रश्नांचं उत्तर त्याच्याकडे नव्हतं.

ती व्हिसासाठी होत असलेली धावपळ. ती परवडणारी नव्हती. त्यातच अधिकृतरित्या लागणारी कागदपत्रं. तिही त्याचेजवळ नव्हतीच. शिवाय त्या कागदपत्रासाठी लागणारा वेळ आणि पैसा तेवढाच खर्ची पडत होता. परंतु व्हिसा बनत होता. दरवेळेस काही ना काही कारण सांगून त्याला परत पाठवलं जात असे.

व्हिसा बनत नव्हता. मेहनत केली तरी. तसंच त्या प्रक्रियेला पैसेही लागणार होते. शिवाय अधिकृतरित्या भारतात गेल्यावर त्याला परतावंच लागणार होतं व्हिसा संपल्यावर. परंतु त्याला भारतात आल्यावर परतायचं नव्हतंच. त्यामुळंच की काय, त्यानं आता ठरवलं, आपण पैसा असा अधिकृत व्हिसा बनविण्यासाठी खर्च करु नये. तर आपण त्या पैशानं अनधिकृतरित्या भारतात जावं. जेणेकरुन त्या पैशातून भारतात जाता येईल आणि परत जायलाही कोणी काही म्हणणार नाही.

आबेदच्या मनात भारतात परतण्याचा निर्माण झालेला विचार. त्यातच अनधिकृतपणानं भारतात येण्याचा विचार त्याला काही स्वस्थ बसू देत नव्हता. भारताची झालेली प्रगती आणि विकास त्याला आता अगदी जवळून पाहायचा होता. त्यातच त्या प्रेमिकेला भेटायचं होतं. जिनं त्याचेसाठी आपल्या हाताची नस कापली होती.

आबेदच्या मनात भारतात परतण्याची निर्माण झालेली आसक्ती. त्यातच त्याला आता राहावलं जात नव्हतं. केव्हा केव्हा भारतात जातो आणि केव्हा केव्हा नाही असं त्याला होवून जात होतं. त्यातच त्यानं एके दिवशी बार्डरशी संबंधीत असलेल्या एका दलालाशी संपर्क साधला. त्याला आपली इच्छा सांगीतली. त्यातच त्यानं आपलं प्रेमही सांगीतलं. सांगीतलं की त्याची प्रेमिका भारतात असून तिनं त्याचेसाठी एकदा हाताची नस कापली होती. परंतु आपण धर्मासाठी व आपण मुस्लीम असल्यानं पाकिस्तानात आलो. परंतु आता एकच इच्छा आहे की तिला एकदा तरी भेटावं. मग पाकिस्तानात यावं. त्यानंतर कायम स्वरुपानं पाकिस्तानात राहावं.

आबेदची इच्छा. त्या इच्छेविरुद्ध दलालांनी दया दाखवली. तसं ते त्यांचं कामच होतं व ते काम ते पैशासाठी नेहमीच करीत असत. आजपर्यंत त्या दलालांनी कित्येक आतंकवाद्यांना भारतात सोडले होते. तेही पैसे घेवून. ज्यातून काही आतंकवादी आजही भारतात मोकाट फिरत होते तर काही तुरुंगात होते.

दलालांनी आबेदकडून पैसे घेतले व त्यांनी त्याला भारतात सोडण्याची जबाबदारी घेतली. लागलीच त्यांनी त्याला भारतात सोडले व सांगीतलं की येथून जबाबदारी आपली. आपण जर या देशात पोलिसांच्या हाती लागले तर आपल्याला तुरुंगातही टाकलं जाईल कायम स्वरुपानं. तेव्हा आपण या भारतात सावधगिरीनं पाऊल टाकावं.

आबेद भारतात आला होता. तो जंगलातून एकटाच वाट काढत चालला होता. तो रात्रंदिवस वाट चालू लागला होता.

आबेद जेथून निघाला, ते भयंकर मोठं जंगल होतं. ज्या जंगलात वाघ, सिंहाच्या डरकाळी नेहमीच ऐकायला येत होत्या. भारतात येतांना ना त्याच्याजवळ पुरेसं अन्न होतं. ना पाणी. त्यातच पुरेसा पैसाही नव्हता की एखाद्या हॉटेलात काही घेवून खावू शकेल. जो काही पैसा होता, तो पैसा त्यानं संपुर्णतः दलालांना देवून टाकला होता. शिवाय रस्ता जंगलाचाच होता व त्या रस्त्यावर दूरदूरपर्यंत कोणतंच हॉटेल दिसत नव्हतं.

ते भयाण जंगल. त्या जंगलातून वाट काढत असतांना त्याला आतापर्यंत कित्येक साप दिसले होते. काही अजस्र होते तर काही लहान लहान. मात्र त्याची भीती नाहीशी झाली होती. अशातच आता त्याच्यासमोर एक वाघ आला होता.

तो वाघ आबेदच्या पुढ्यात होता आणि आबेद समोर. तसा तो वाघ त्याच्यावर गुर्रावत होता आणि आबेद मौन बाळगून चुपचाप एका जागेवर उभा होता. तो वाघ डरकाळी फोडत होता आणि आबेदकडे पाहात होता. त्याच डरकाळीबरोबर तो वाघ आपला एक पाय आपटत होता आणि शेपूटही आपटत होता. परंतु तरीही आबेदनं कोणतीच हालचाल आपल्या शरीराची केली नाही.

काही वेळ असाच लपंडावात गेला. वाघ आबेदकडे पाहात होता एकटक आणि आबेदही वाघाकडे एकटकच पाहात होता. दोघांच्याही नजरा एकमेकांशी भिडल्या होत्या. तसं पाहिल्यास आबेदचीही घाबरगुंडी उडाली होती वाघ पाहून. परंतु आता आपला जीव जाणारच. जरी थांबलो तरी आणि पळालो तरीही. असा विचार करुन तो थांबला होता व टकमक त्या वाघाच्या नजरेला नजर भिडवून तो पाहात होता. त्याचेजागी दुसरा जर कोणी व्यक्ती असता तर तो पळूनच गेला असता.

थोड्याच वेळाचा अवकाश. वाघानं त्याचा नाद सोडला व तो माघारी फिरुन निघून गेला. मात्र वाघ निघून जाताच वाचलो रे बाबा म्हणत आबेदनं सुटकेचा श्वास सोडला होता.

वाघ निघून जाताच पुन्हा आबेद रस्ता चालू लागला होता. त्याला वाटच दिसत नव्हती. अशातच काही दिवस तो चालत होता. त्याला भूकही लागत होती. परंतु त्या भयाण जंगलात खायला त्याचेजवळ काहीच नसल्यानं त्याला काही दिवस झाडाची पानं खावूनच काढावे लागले व पाण्याची तहान भागवतांना डबकंच शोधावं लागलं. तसा त्याच्या मनात विचार आला. हाच का तो भारत. ज्याची कल्पना आपण केली होती. केवळ टेकड्या आणि जंगलच जंगल. माणसांचा पत्ता नाही. परंतु हाच का तो भारत? आपण असं म्हणूच नये. कारण आपणही याच भारताचे रहिवाशी आहोत आणि रहिवाशी होणारही आहोत. शिवाय आताच या भारतातील वाघांनी परीचय दिलाय की ते शत्रूलाही अगदी सहजपणे माफ करुन टाकतात आणि तिकडं पाकिस्तानात लबाड लांडगेही माणसाला खावून फस्त करतात. हाच फरक पाकिस्तान आणि भारतात. म्हणूनच भारत सुजलाम सुफलाम आहे अन् पाकिस्तान खायला मौताज आहे. हेच त्या वाघानं दाखवलंय. या भारतात हिरवाई आहे. जी माझ्याजवळ अन्न नसून मला जगवत आहे. मी आता झाडाचीच पानं खावून जगत आहे. शिवाय पाण्याचीही काही कमी नाही. पाणीही मला मुबलक मिळत आहे. नाहीतर आमचा पाकिस्तान. तिथं तर संपुर्ण प्रदेशात वाळूच वाळू आणि विस्तीर्ण टेकड्या. पशुंनाही तिथं चारा नाही. माणसाचं सोडा. साधी माणूसकीही नाही तिथं. माणसाला माणूस समजत नाही. स्रियांना तर तिथं पायातील चप्पलच समजतात. सतत बुरख्यात आणि शिक्षणाचा सुवास त्यांच्या आयुष्यात

नसतो. त्यांना तो गंधही मिळत नाही. काही तर शिकलेल्या असूनही बुरख्यातीलच जगणं पसंत करतात. शिवाय लोकसंख्या वाढवीत असतात. विकासाला कितीतरी दूर ठेवतात त्या स्त्रिया. येथील महिलाही खुश. तिला तर इथं लक्ष्मीच समजतात.

आबेदची खंत. आबेद विचार करीत चालला होता. तोच त्याला काहीतरी आवाज आला. त्यातच त्यानं लपून पाहिलं. लपून पाहिलं की काही सैनिक तिथं उभे असून त्यांना आपण चुकवू शकत नाही. कितीही लपलो तरी. त्यातच शंका घेवून ते मला पकडतील.

आबेद विचारच करीत होता. तोच त्याला आठवलं. दलालानं म्हटलं होतं. इथून भारत लागतोय. तेव्हा तू आपलं संरक्षण स्वतःच करायचं. तू जर त्या देशात पोलिसांच्या हाती लागलाच तर तुला तुरुंगातही टाकलं जाईल कायम स्वरुपानं. तेव्हा त्या भारतात तू सावधगिरीनं पाऊल टाकावं.

आबेद आतापर्यंत सावधगिरीनंच पाऊल टाकत होता. परंतु तो तरी किती सावध असणार. शिवाय त्यानं विचार केलाच की आपण कितीही लपून बसलो तरी आपण पोलिसांना सापडणारच. अन् पळण्याचा प्रयत्न केलाच तर ते आपल्याला गोळ्या घालून ठार करणार. यापेक्षा आत्मसमर्पण करायला हवं. असा विचार करीत तो त्या लपलेल्या जाग्यावरुन निघाला. तोच त्या एका सैनिकाचं लक्ष त्याचेवर गेलं. तो म्हणाला,

"आहे तिथंच थांब. हात वर कर. नाहीतर गोळ्या घालीन."

ते त्या सैनिकाचे शब्द. ते शब्द त्याच्या स्मृतीपटलाला चिरुन गेले. परंतु तो चालतच राहिला. त्यानं ते शब्द ऐकले होते. परंतु ते न ऐकल्याचा त्यानं बहाना केला

होता. आता मरण तर आलंच आहे. जर नशिबात मरण असेल तर ते कोणीच रोखू शकत नाही. असे समजून चालत होता तो. त्यातच दुसरा एक सैनिक पुन्हा म्हणाला,

"सुनाई नही देता क्या? गोळी से उडा दुँगा।"

आबेदनं तेही बोलणं ऐकलं नाही. ऐकलं परंतु ऐकल्याचा प्रतिसाद दिला नाही. तोच तिसरा सैनिक म्हणाला,

"उडा दो सालों को, कहॉ कहॉ से आते है। तकलीफ देने।"

ते त्याचं बोलणं. तोच एक सैनिक म्हणाला,

"नाही. ही माणुसकी नाही. त्याच्याजवळ काहीच दिसत नाही. तो गुंगा दिसतोय. आपण शहानिशा करुया."

"परंतु कसे करणार? तो जर शत्रू निघालाच तर आपल्यावर हमला करणार नाही काय? एक दोघांना विनाकारण मारुन टाकेन."

"असं कसं मारणार. मग आपण सैनिक कसले की त्याच्या मारण्यानं मरु आणि जर नशिबात त्याच्या हातानं मरणं असेलच तर आपण कितीही लपून बसलो तरी मरणारच. आपण जावूच त्याच्याकडे."

सैनिकांचं ते आपापसातील बोलणं. तसा विचार करुन संबंधीत सैनिक त्याच्याकडं गेले. तसं आबेदनं घाबरण्याचं सोंग केलं. त्यानंतर त्यानं त्या सैनिकांना पाहताच त्यांनी त्याला विचारलं,

"कुठून आलाय?"

आबेद हात जोडूनच होता. त्यानं उत्तर दिलं नाही. त्यानंतर त्या सैनिकांनी त्याच्या शरीराची तपासणी केली. काहीच आढळलं नाही. तसं त्याला त्या सैनिकांनी एक वेडा समजून सोडून दिलं. परंतु त्याच सैनिकातील एकजण म्हणाला,

"आपण याला सोडू नये. आपण आपल्या मुखियाला काय उत्तर देणार. जर विचारलं तर....... याला घेवून जावं मुखियाकडे. तेच याचा काय तो फैसला करतील."

त्या सैनिकांचं ते बोलणं. ते बोलणं पाहून सर्व सैनिकांनी त्याला पकडलं व आपल्या मुखियाकडे नेलं. मुखियानंही त्याची कडक तपासणी केली आणि त्याला पोलिसांच्या हवाली केले. त्यानंतर न्यायालयात. न्यायालयानंही त्याला तुरुंगाचा रस्ता दाखवला. परंतु त्यानं तो गुंगाच असल्याचं नाटक केल्यानं व त्याच्याजवळ काहीच सापडलं नसल्यानं त्याच्या बाबतीतील संपुर्ण रेकॉर्ड तुरुंगधिकाऱ्यानं न्यायालयासमक्ष सादर केला व त्याची संपुर्ण तपासणी झाल्यानंतर व शहानिशा झाल्यानंतर त्याला बा इज्जत सोडून देण्यात आले.

आबेद आता तुरुंगातून बाहेर आला होता. त्याला सुटायला जास्त वेळ लागला नाही. तो बाहेर येताच त्याला पैशाचा प्रश्न पडला. तसं पाहिल्यास दोनचार तुरुंगातून कमविलेले पैसे त्याचेजवळ होते. परंतु तेवढ्या पैशानं कोकणपर्यंत जाणं शक्य नव्हतं. कोकणाचा रस्ता फार लांब होता. गाड्या होत्या. परंतु गाड्यालाही भाडं लागणार होतं. तसा त्यानं विचार केला. आपण गाठीला पैसे कमवायचे. असा विचार करीत त्यानं काहीतरी करावं या उद्देशानं खानावळीत नोकरी धरली. आता त्या खानावळीत त्याला जेवणही भरपेट मिळत होतं. शिवाय खर्चाला काही पैसेही.

मात्र राहायला छत मिळालं नव्हतं. त्यातच राहायची सोय म्हणून त्यानं उड्डाण पुलाखालची जागा पकडली. त्यातच तो कधीकधी फुटपाथवर झोपत असे तर कधी बस्टॉपवरही झोपायचा.

दिवसामागून दिवस जात होते. तशी तशी त्याला शर्मिलाची आठवण येवू लागली होती. कधीकधी पावसाळा यायचा. मुसळधार पाऊस कोसळायचा. मग आठवण यायची कोकणातील त्यांच्या त्या तरुणपणातील. त्या बारमाही नद्या पावसाळ्यात तुडूंब फुगून गेलेल्या असायच्या. त्यातच त्या सागरास मिळायच्या व सागरही फुगून जायचा. अशावेळेस सागरात जायची मनाई राहायची. परंतु ते दोघंही सागरात जात असत. त्याच्या किनाऱ्यावर बसत असत. गप्पागोष्टीही करीत असत. समुद्राच्या किनाऱ्यावरील वाळूत नावंही लिहीत असत आपलं. तसं तरुणपण आठवताच अलगद हळूच बालपण आठवायचं. आठवायची ती शाळेला झालेली सुट्टी. अशावेळेस शाळेला सुट्टी झालेली. रस्त्यावर पाणी गोळा झालेलं आणि त्याच पाण्यातून शर्मिला आणि त्याचा धावण्याचा प्रवास. दोघंही त्या पावसात एकमेकांचा हात पकडून धावत धावत घरी जात असत. तसं शर्मिलाचं घर त्याच्या घराच्या शेजारीच होतं.

आबेदला तरुणपण जेव्हा आठवायचं. तेव्हा जीव कासावीस व्हायचा. तिला केव्हा भेटतो आणि केव्हा नाही असं होवून जायचं. तसा तो जवळ गोळा झालेले पैसे मोजायचा. परंतु ते पैसे पुरेसे नसायचे. मग कोकणात येण्यावर विरजण पडायचं. त्यातच शर्मिला आता असेल का? तिचा विवाह कदाचीत झालेला असेल, असंही त्याला वाटायचं.

आज तब्बल त्या खानावळीत एक वर्ष झाला होता. त्यातच त्या खानावळीत असतांना त्याचं जेवण भागलं होतं. कशाचीही कमी झाली नव्हती. गाठीला चार पैसे गोळा झाले होते. ती खानावळ सोडाविशी वाटत नव्हती त्याला. परंतु प्रेम. ते अमर प्रेम होतं. लागलीच त्यानं मालकाला म्हटलं,

"मला काही दिवस सुटी हवी आहे. मी माझ्या गावी कोकणात जावून येतो."

मालकानं त्याचं ऐकलं. मालक तसा दयाळू होता. त्यानं त्याला पैसे दिले. काही पैसे त्याचा स्वभाव पाहून त्यानं पुन्हा परत यावं म्हणून अडकवून ठेवले व म्हटलं,

"लवकर येण्याचा प्रयत्न कर बर."

आबेदनं मालकाच्या हातून पैसे घेतले व मानेनच होकार देत तो निघाला. वाटेत त्याच्या अनंत विचार होते.

***********************

दरमजल प्रवास करुन आबेद विचारत विचारत कोकणात आला होता. त्याला आता त्याचं गावंही स्पष्टपणे आठवत नव्हतं. मात्र कोकणात येताच साऱ्या आठवणी ताज्या झाल्या होत्या. तो प्रत्यक्ष आपल्या गावी आला होता. त्याला तो गावचा समुद्र दिसायला लागला होता.

आबेद गावी आला आणि बसमधून उतरला. तसं त्यानं त्या गावची माती आपल्या मस्तकाला लावली. तसं त्याला रडू कोसळलं. जणू ती आई. त्या आईला

सोडून तो पाकिस्तानात गेला होता. त्यामुळंच रडू येणं साहजीकच होतं. त्यानंतर त्याला दिसला तो समुद्र. तो समुद्र दिसताच तो कापलेला हात आठवायला लागला होता. शर्मिलानं त्याच्या प्रेमासाठी आपल्या हाताची नस कापली होती. तसंच त्या वाळूवर आपलं आणि शर्मिलाचं नाव कोरणंही आठवत होतं. त्यातच ते बालपण आठवत होतं. शर्मिलाबरोबर पती पत्नी म्हणून खेळल्या जाणारा खेळही त्याला आठवू लागला होता. त्यातच आठवू लागलं होतं त्याचं ते घर.

आज त्या समुद्राची दशा पालटली होती. तो जुना त्याच्या काळातील समुद्र राहिला नव्हता. त्याचं रुपडं पुर्णतः पालटून गेलं होतं. त्या समुद्रात आता बीच तयार झाले होते आणि कित्येक पर्यटक मंडळी आज त्या समुद्रावर येवू लागली होती. ज्या पर्यटकांना गावची मंडळी खानावळ उघडून जेवन पुरवून दोन पैसे कमवीत होती.

आबेद जसा गावात गेला. तसं त्याचं घर आठवायला लागलं. घर आठवताच तो आपलं घर न्याहाळायला गेला. परंतु तिथं घर नव्हतं. ती जागा ओसाड पडली होती. भिंती गहाळ झाल्या होत्या. मात्र जागा अजुनही शाबूत होती.

गावाचं परीवर्तन झालं होतं. कालची मुरमाड जागा जावून आज त्याच गावात सिमेंटचे रस्ते बनले होते. शिवाय गावात मोठमोठ्या टोलेजंग इमारती उभ्या राहिल्या होत्या.

सडका रुंद झाल्या होत्या. इमारती सिमेंटच्या होत्या. गावात वीजही पोहोचली होती. आबेदला आठवत होती बालपणातील परिस्थिती. गावात गावकऱ्यांचं झोपडंच असायचं. त्या झोपड्यात छतावर नारळाच्या झावळ्या लावलेल्या असायच्या. आजुबाजूच्या भिंतीही नारळाच्याच झावळयाच्या

असायच्या. त्या झावळयावर मुरमाड मातीची परत ओली करुन लावलेली असायची. परंतु आता त्याच भिंतीनं जागा बदलवली होती आणि आता त्या भिंती सिमेंटच्या झाल्या होत्या. शिवाय गावातील मध्यभागी असलेलं वडाचं झाड आता नष्ट झालं होतं. ती पारही नष्ट झाली होती. त्या ठिकाणी आता शिवाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा बसवल्या गेला होता. त्यामुळं पुर्वी ज्या पारावर वडाच्या झाडाखाली बसून पंचायत भरवली जायची व न्यायनिवाडा केला जायचा. तो न्यायनिवाडा आणि पंचायत बंद झाली होती. आज गावातील प्रत्येक घरात खानावळीचे कमरे बनवले गेले होते. शिवाय ज्या इमारती उभ्या राहिल्या होत्या. त्या इमारतीत पर्यटक मंडळी निवासानं राहात होती.

आबेदला आठवत होतं ते वडाचं झाड. ते झाड गावाच्या मधोमध होतं. शिवाय त्या वडाखाली पारावर केवळ न्यायनिवाडाच होत नसे तर त्या झाडावर काही पक्षांची घरटी होती. ज्या घरट्यात वेगवेगळे पक्षी येवून निवास करीत असत. आज मात्र ते दिसत नव्हतं.

काल गावात शेतीत झाडं होती. हापूस आंबा, काजू, सुपारी. रोजच गावातील हा माल खाचरावर मोठ्या शहरात नेल्या जात होता. तो माल कमी असायचा. परंतु आता त्या मालात वाढ झाली होती व आता तो माल दळणवळणाच्या साधनानं बाहेर शहरात बाजारात जात होता.

आबेदनं गावात प्रवेश करताच तो आपल्या घराच्या निशाणीवर पोहोचला. तो न्याहाळतच होता आपलं घर. तोच त्याच्यावर इमरानचं लक्ष पडलं. त्यानं त्याला ओळखलं व त्याला आश्चर्य वाटलं. कदाचीत हा आबेद तर नसावा. परंतु आबेद

येईलच कसा? तो तर पाकिस्तानात गेला आहे. तेथील रहिवाशी बनला आहे तो. परंतु होवू शकते तो आबेदच असावा. विचारुन शहानिशा केलेली बरी.

इमरानचं आश्चर्य. त्यातच तो आपली शंका काढण्यासाठी आबेदजवळ आला. तोच आबेदनं त्याला ओळखलं. इमरान आता थोडा लठ्ठ झाला होता तर आबेद थोडासा बारीक सडपातळच होता. चेहऱ्यावर थोडासा फरक जाणवत होता. परंतु चेहरा पुर्णतः बदलला नव्हताच.

आबेदनं त्याला ओळखलं. तोच इमरान बोलायच्या आत आबेदच म्हणाला,

"तू इमरान आहेस ना."

"होय."

"कसा आहेस?"

"ठीक आहे. मजेत आहे."

"भारत तुमच्यासाठी कसा आहे?"

"ठीक आणि ठीकच म्हणावं लागेल. कारण ज्याची खावी माती. त्याला चांगलंच म्हणावं लागेल ना?"

"म्हणजे?"

"अरे, इथं आम्ही आमच्या मनाचे राजे आहोत. प्रत्येकाला स्वातंत्र्य आहे व स्वातंत्र्याचा आम्ही पुरेपूर फायदा घेतोय. इथं आम्हाला विशेष असं आरक्षणही आहे. तसंच सर्वच समाजाला आमचा भारत देश सन्मानानं वागवत असतो. अतिथींना तर अगदी देवासारखं पुजतात इथं. शिवाय हा अमूक धर्माचा आणि तो

अमूक धर्माचा असा धर्मभेद नाही इथं. तसंच कोणत्याही शासकीय कार्यालयात जा. आमची कामं पटापट होतात. आम्ही मुस्लीम असलो तरी आज येथील हिंदू आम्हाला मुस्लीम समजत नाही. भाईचारा आहे इथं. इथं संकटसमयीही मुस्लीम हिंदूंना व हिंदू मुस्लिमांना मदत करतात. एकमेक एकमेकांच्या समारंभात जातात. मोठ्या उत्साहानं एकमेकांचे सण साजरे करतात. आम्ही त्यांच्या गणपती उत्सवाला जातो, तसेच इतरही सणात आणि तेही आमच्या रमजानला आवर्जून हिरीरीनं हजेरी लावतात. ते आम्हाला प्रसाद देतात. तो प्रसाद आम्ही आवडीनं ग्रहण करतो आणि आम्ही त्यांना प्रसाद देतो, तो प्रसाद ते आवडीनं ग्रहण करतात. आम्हाला आज इथं राहण्याचं कधीच दुःख जाणवलं नाही. उलट आनंदच वाटला."

"छान आहे येथील वातावरण. नाही तर आमच्याकडे?"

"काय आमच्याकडे. तिकडं अशी परिस्थिती नाही का?"

"नाही."

"आणि तू आबेद आहेस ना?"

"होय, मी आबेदच."

"परंतु तू पाकिस्तानात गेला होता ना?"

"होय."

"मग परत कसा आलाय?"

"आठवण. आठवण आलीय गावची अन् तुमचीही."

"हो का?"

"आणि तू कसा आहेस? काही चिंता आहे का? बराच बारीक झालाय तू? खात पीत नाही का रे? अन् मगाशी तू म्हणाला की आमच्याकडं अशी परिस्थिती नाही. याचा अर्थ काय रे?"

इमरान बोलून गेला खरा. परंतु तो आपली आपबीती कशी सांगणार. पाकिस्तानात झालेली गळचेपी. आठवणीसाठी आणि शर्मिलाच्या भेटीसाठी आसुसलेला तो. त्यातच व्हिसा बनविण्यासाठी मारलेले चक्कर. त्यात झालेली धावपळ. भारतात आल्यावर आठ दिवस झाडपाला खावून काढलेले. ते तुरुंगातील वातावरण. त्यात कापलेला कारावास. सारं काही विलक्षण होतं. शिवाय एक वर्ष जो खानावळीत काढला, त्यात झोपण्याची सोय नसल्यानं राहायला मिळालेलं फुटपाथ. कधी उड्डाणपूल तर कधी बस्टॉप. त्यात पुरेशी न झालेली झोप. तेही विलक्षणच होतं. मग तो बारीक नाही होणार तर काय? परंतु ते चित्रविचित्र असल्यानं सांगायला लाज वाटत होती. त्यातच वेळ मारुन नेत तो म्हणाला,

"अगदी तसंच समज. खायला मिळत नसेलच या तुझ्या मित्राला."

"मला सांग, वहिनी स्वयंपाक बनवून चारत नाही का रे? की लग्नच नाही केलं तू?"

"अरे लग्न केलंच नाही मी. मग वहिणी कुठून येणार? बरं एक विचारु का?"

"शर्मिला कशी आहे रे?"

"का रे, का विचारतोस शर्मिलाबद्दल? कदाचीत तुझं लपडं तर नव्हतं तिच्यासोबत. तशी गावात एक अफवा पसरलीच होती की कोणीतरी तिला धोका दिल्यानं तिनं हाताची नस कापली होती म्हणून. कदाचीत तो तूच तर नाही ना?"

"नाही रे. मी कशाला असेल आणि मी पळून गेलो नाही रे. माझ्या अब्बूंनी नेलं मला पाकिस्तानात. माझा सर्व परीवार पाकिस्तानात गेला. मग मी तरी कसा राहू इथं. शिवाय मला तरी त्या वयात काय समजत होतं म्हणून सांगू. चल म्हणलं अब्बानं. मग जावंच लागलं. परंतु शर्मिलाचं लांच्छन माझ्यावर लावू नकोस?"

"अरे, मी गंमत केलीय. तसं गिसं काही नाही. अरे तिच्या हाताची नस कापली म्हणे एका हिंदू जथ्यानं. त्याचा मुखिया म्हणत होता म्हणे की अशी एकटी तिकटी फिरत नको जावूस. वातावरण खराब आहे. तशी त्यावेळची परिस्थिती चित्रविचित्र अशीच होती ना. तिनं घाबरुन घरातून पडू नये बाहेर. म्हणूनच कापली असेल मुखियानं नस. असे सर्वजण म्हणत होते. ज्यातून तिचा हात कापल्या गेला. ती तशीच सांगत होती सर्वांना."

"आता ती कुठे आहे? तिचा विवाह झाला का?"

"विवाहही झाला शर्मिलाचा आणि ती सुखी आहे आपल्या संसारात."

"हो का? कुठं दिली तिला?"

"शेजारच्याच गावात आहे."

"मग जावं लागेल भेटायला."

"कशाला? कदाचीत तू प्रेम करीत होतास की काय तिच्यासोबत?"

तो इमरानचा शब्द. तो शब्द ऐकताच तो चूप बसला. तसा इमरानच म्हणाला,

"काय, खरं आहे का हे?"

"होय, माझं प्रेमच होतं तिच्यावर. विवाह करण्याचीही इच्छा होतीच माझी. परंतु काय करु? माझ्या अब्बाचं ऐकावं लागलं मला. माझ्या अब्बानंच नेलं मला. मला त्या वयात कळत नसल्यानं हे सारं घडलं. परंतु मी ती चूक सुधारण्यासाठीच आलो होतो. माहीत आहे, तू मगाशी म्हटलं ते अगदी खरं आहे. तिनं माझ्याच रागावरुन नस कापली होती हाताची. म्हणत होती की तू पाकिस्तानात जावू नकोस. परंतु मी तिचं ते ऐकलं नाही. ते न ऐकल्यानंतर तिनं आपल्याच हाताची माझ्यासाठी नस कापली होती. तरीही मला जावंच लागलं. माझ्या अब्बूसाठी आणि आपल्या त्या धर्मासाठी. ज्याला आपण महान समजतो."

"हो काय? ठीक आहे. परंतु हे मला सांगीतलं तर सांगीतलं. इतरांना सांगू नकोस की तुझ्यामुळं तिनं आपल्या हाताची नस कापली होती म्हणून. आता सर्वांचाच माहीत आहे की ती नस हिंदू जत्थ्यानं कापली म्हणून. तेही तिला घाबरविण्यासाठी. आता एक लक्षात ठेव. आता तू तिला विसर. तिनं विवाह केलाय. तिचा पतीही चांगला आहे. तिच्यावर प्रेम करतोय तो निरतिशय. शिवाय हा भारत आहे आणि त्यातच ती हिंदू आहे. आपली मुसलमान नाही की ज्या धर्मात अनेक पत्नी करण्याची सोय आहे. विरोध नाही. त्यांच्या धर्मात एकच पती केला जातो. पत्नीही एकच पती मानते. त्याच्यासाठी जीव ओवाळून टाकते. हवं तर तू इथून जावू शकतोस."

"नाही. मला तिच्याशी एकदा तरी भेटायचं आहे. बोलायचं आहे. एक शेवटचं बोलायचं आहे. मग मी तिच्या जीवनात कधी डोकावणार नाही. कायमचा निघून जाईल तिच्या जीवनातून. बराच लांब. एवढा लांब की पुन्हा परत कधीच येणार नाही. बोल, तू माझी भेट घालून देशील? प्लीज. एका मित्रत्वाखातीर."

इमरान ते सर्व ऐकत होता. जी एक कठीण बाब होती. परंतु आबेद एका मित्रत्वाखातीर म्हणत होता. शिवाय तो एकच आणि शेवटची भेट घेवू पाहात होता. त्यानंतर तो परत जाणार होता. तसा तो विचार करीत होता. आबेद शेवटची तर भेट म्हणतोय. त्यानंतर तो जाणार आहे म्हणतोय. बराच लांब जाणार आहे म्हणतोय. काय हरकत आहे एक भेट करुन द्यायला. ती म्हणेल तर घडवून आणू भेट. बिचारा परेशानच आहे तिच्या विना.

इमरानचा तो विचार. तसा तो म्हणाला,

"ठीक आहे, मी तुझी एक भेट घडवून आणील शर्मिलाशी. आता तर झालं. परंतु एक वचन तुला द्यावं लागेल."

"कोणतं?"

"तिला भेटल्यावर तुला निघून जावं लागेल इथून. पुन्हा कधीच परत न येण्यासाठी. ठरलं का?"

"होय ठरलं." आबेद म्हणाला. त्यानंतर इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. तसा इमरान म्हणाला,

"आणि तू मगाशी म्हणाला होता की आमच्याकडे भारतासारखी परिस्थिती नाही. मग कशी आहे परिस्थिती?"

"अरे ते तर विचारुच नको. आमच्याकडे पुरेशा तुमच्या भारतात आहेत तशा सुविधा नाहीत. सरकारी कार्यालये आहेत. परंतु तेही नावाचेच. तिथं साध्या साध्या कागदाला जास्तीत जास्त विलंब लागतो. शिवाय कोणतंही काम कोणत्याही कार्यालयात लवकर होत नाहीत. साधा व्हिसा बनवायचा असला तरी वेळ लागतो.

अन् एक सत्य सांगायची बाब म्हणजे आमच्या अहमदी जातीला तर ते मुसलमानच समजत नाहीत. किती अत्याचार करतात ते आमच्यावर. ते मी तर सांगूच नये तुला. आमच्या पाकिस्तानात वाळवंट आहे. पुरेसे उद्योगधंदे नाहीत. पुरेसे कामधंदेही नाहीत. बेरोजगारी भरपूर आहे. त्यातच उपासमारी भरपूर. शिक्षण आहे, परंतु लोकं जास्त शिकत नाहीत. महिलांना तर जास्त शिकण्याची संधीच नाही. तुमच्याकडं महिलांना हिंदू धर्मातील लक्ष्मीचं अवतार तरी मानतात. अन् आमच्याकडं पायातील चप्पल. तशीच वागणूक मिळत असते आमच्याकडे महिलांना. शिवाय ते बुरख्यातीलच जीवन आणि मुलं पैदा करण्याची मशीन. खाणारी तोंड जास्त, त्यामानानं रोजगार नाहीच. मुलांना अल्लाची देणच मानतात. पैदाच करा. त्यावर नियंत्रणच नाही. कुटूंब नियोजन म्हणजे अल्लाच्या कामात अडथळा. असंच मानतात तिकडं. शिवाय सडका नाहीत बरोबर. इथं तर सिमेंटचे रस्ते आहेत. महामार्गही सिमेंटचे आणि गावागावातूनही आता सिमेंटचेच रस्ते दिसायला लागले आहेत. एकंदरीत सांगायचं झाल्यास तुमचा भारत बदललेला आहे बराच आणि आमचा पाकिस्तान अजुनही बदलाच्या कोसो दूर आहे. बरं झालं राजा, तू पाकिस्तानात नाही आला. तू सुखी आहेस इकडे. तिकडे तर सारेच मुसलमान दुःखी आहेत. हिंदूंना तर बोलायची उजागीरीच नाही. ते गुमान असतात बिचारे."

ते बोलतच होते. तेवढ्यात इमरानची पत्नी तिथं हजर झाली होती. ती त्याला शोधायला आली होती. तिनं पाहिलं की आपला पती कोण्या एका व्यक्तीसोबत बोलत आहे. ते पाहून तिनं विचारलं,

"कोणाशी बोलताय? कोण आहेत हे?"

"हा माझा मित्र आबेद. हा याच गावचा. सध्या पाकिस्तानात राहतोय. भेटायला आला होता तो आपल्याला."

ती इमरानची पत्नी होती. तिचं नाव रुबिना होतं. रुबिनानं ते ऐकलं. तसा तिनं सलाम केला व ती आपल्या पतीला म्हणाली,

"यांच्याशी इथंच बोलत बसाल की घराकडे आणाल. तसंही त्यांचं इथं कोणीच नसणार. त्यामुळं ते आपले पाहूणेच ना. त्यांना म्हणा, घराकडे चला म्हणून." रुबिनानं म्हटलेले शब्द. ते शब्द ऐकताच इमरान आबेदला म्हणाला,

"चल, आपण जावूया आपल्या घरी व निवांत गोष्टी करुया."

आबेदला इमराननं तसं म्हणताच तो इमरानसोबत त्याच्या घरी जायला तयार झाला. थोड्याच वेळात आबेद इमरानच्या घरी दाखल झाला. त्यानंतर त्यांच्या गोष्टी सुरु झाल्या होत्या व रुबिना स्वयंपाक करण्यासाठी स्वयंपाकघरात निघून गेली होती.

************************

शर्मिलाचा विवाह झाला होता शेजारच्याच गावी. तिचा पती फारच चांगला होता. कधीकधी ती काही कामानिमित्त आपल्या गावी येत असे व आईवडीलांची भेट घेवून सासरी रवाना होत असे. आजही तिचे मायबाप जीवंत होते. तसं पाहिल्यास ते आता म्हातारे झाले होते.

शर्मिलाला मुलंबाळं नव्हती. मुलाबाळासाठी ती तडपत होती. तिनं त्यासाठी बरंच औषधपाणी घेतलं होतं. परंतु तिला अद्यापही मुलंबाळं झाली नव्हती. तेवढं एक दुःख तिला होती. बाकी ती आपल्या संसारात खुश होती.

शर्मिला जेव्हा गावात यायची. तेव्हा ती संबंध गावकऱ्यांचीच भेट घ्यायची. तसं गाव लहानच होतं त्यावेळेस. आज थोडंसं वाढलं होतं. गावात नवीन लोकं राहायला आले होते. रोजगार संबंधानं. पर्यटकांची समुद्रभेटीसाठी रेलचेल असल्यानं व त्यांचं आगतसत्कार करतांना पुरेसे पैसे मिळत असल्यानं तसंच मासे विपुल प्रमाणात समुद्रात सापडत असल्यानं लोकांच्या रोजगाराला इथं काहीच कमी नव्हतं. म्हणूनच लोकं वाढले होते. परंतु तरीही ती जुन्या लोकांना ओळखत होती व जुन्यांची भेट घेत होती. त्यांच्याशी बोलत होती.

शर्मिला गावात येताच ती इमरानशीही बोलत असे आणि तोही तिच्या गावात गेल्यास तिच्याशी बोलत असे. तिच्या गावात गेल्यावर तिची आवर्जून भेट घेत असे. तसं पाहिल्यास तिचा पतीही त्याला चांगला ओळखत होता. कारण ते दोघंही एकाच वर्गात शिकले होते.

इमरानचा बकरे कापायचा व्यवसाय होता. तो बकरे खरेदी करण्यासाठी गावोगाव फिरायचा. त्यातच तो शर्मिलाच्याही गावाला जात होता. तिची भेट घेवून परत येत होता.

आज सकाळपासूनच इमरान बेचैन होता. केव्हा केव्हा शर्मिलाची भेट घेतो आणि केव्हा नाही असं त्याला होवून गेलं होतं. तसंच आबेदलाही वाटत होतं.

त्यातच रुबिनानं सकाळी सकाळी नाश्ता बनवला व तो आबेदला घेवून शर्मिलाच्या गावाकड चालता झाला.

काही वेळ गेला व शर्मिलाचं गाव आलं. तसं काही अंतरावर आबेदला ठेवून इमरान शर्मिलाच्या घरी गेला. त्यातच तिचा पती सकाळीच शेतावर गेला होता. तसं इमरानला पाहताच ती म्हणाली,

"अरे इमरान, इकडे कुठं आलाय?"

"आलोय तुझ्याकडंच एक काम घेवून."

"असं कोणतं काम काढलंय तू माझ्यासाठी?"

"आहे एक काम."

"कोणतं?"

तिनं विचारलेला प्रश्न. त्यातच तिचा पती घरी नसलेला पाहून तो म्हणाला,

"आबेद आलाय तुला भेटायला. तुझी भेट घेवू इच्छित आहे. जरा आणू का भेटीला?"

"कोण आबेद?"

"तो आपल्या गावचा. जो पाकिस्तानात गेला होता."

इमराननं आबेद व पाकिस्तानचं नाव घेताच शर्मिलाच्या सर्व गोष्टी लक्षात आल्यात. ती हाताची जखम व तो कापलेला हात. त्यातच त्यानं केलेला विश्वासघात. सारंच तिच्या लक्षात आलं होतं. त्यातच तिला पश्चातापही तेवढाच वाटत होता. तशी ती मौन होती. ते पाहून संधी साधून इमरान पुन्हा म्हणाला,

"काय झालं शर्मिला. घोडं कुठं अडलंय?"

"अरे इमरान. नाव नको काढूस त्या नालायकाचं."

"काय झालं शर्मिला. अशी एकदम रागावलीस का?"

"अरे त्यानं तर मला धोका दिलाय."

"धोका? काय केलंय त्यानं."

धोका शब्द तिच्या तोंडातून बाहेर पडताच इमराननं तो टिपला. तसं त्याच शब्दावर ट्रेस करीत तो पुन्हा म्हणाला,

"काय केलं. मला तरी सांगशील. मी कोणाला सांगणार नाही. कदाचीत हात कापण्याची तर घटना नाही?"

"तुला कसं माहीत?"

"मला सगळंच प्रकरण माहीत आहे. त्यानं तुला भेटायला येईल असं जे आश्वासन दिलं होतं तेही माहीत आहे. परंतु एक त्याच्या सफाईत सांगू."

"सांग. अन् तू तरी काय सांगणार. तू तेच सांगणार, जे त्यानं तुला सांगीतलं असेल."

"ऐकशील तर खरं."

"सांग तर."

"अगं, तुझं आणि त्याचं वय त्यावेळेस निर्णय घेण्याचं नव्हतंच. शिवाय ज्या दिवशी त्यानं तुला आश्वासन दिलं होतं. त्याच रात्री त्याच्या अब्बूनं त्याला जबरदस्तीनं पाकिस्तानात नेलं. आता विचार कर की त्याच्यावर काय बेतलं असेल

ते क्षण. बिचारा तुझ्या प्रेमात वेडापिसा तरी झाला असेल. त्याला तुझी आठवण होती. म्हणूनच तो तुला भेटायला इथंपर्यंत तरी आला. अन् तू त्याला नकार देतेस. अगं त्याला पश्चाताप आहे आजही. हवं तर तू त्याला तुझ्या पतीसमोर भेट. आपल्या पतीला त्याची ओळख करुन दे. म्हण की हा आमचा बालपणीचा मित्र. भेटायला आला आम्हाला. हा आता पाकिस्तानात राहतोय."

इमरान बोलत होता व शर्मिला ऐकत होती. तशी ती म्हणाली,

"परंतु इमरान, माझा आता विवाह झालाय. काही विपरीत घडलं तर....."

"नाही घडणार. मी आहे. तो फक्त तुला एकदाच भेटणार. त्यानंतर तो निघून जाणार. कायमचाच निघून जाणार पाकिस्तानात. पुन्हा कधीही तो या भारतात परतणार नाही."

"अन् यांना कोण सांभाळणार?"

"मीच सांभाळणार. तू त्यांचीही काळजी करु नकोस. तू फक्त बोलत बस त्याच्याशी तेही थोडक्यात. मी त्याला सांगतोय तसंच." तो म्हणाला.

तिनं तसा होकार दिला. त्यानंतर इमरान आबेदला आणण्यासाठी रवाना झाला होता. थोड्या वेळातच तो आबेदला घेवून परत आला. तोच तिचा पतीही शेतावरुन परत आला होता. त्यानंतर तिनं आपली जखम न्याहाळली. बरेच दिवस झाले होते तिला त्या जखमेचा विसर पडला होता. आता ती न्याहाळत होती. परंतु आता ती जखम अस्पष्ट झाली होती व ती दिसत नव्हती. तसा तिला त्या जखमेचा इतिहास आठवत होता. बहुतेक ती मिटल्यासारखीच झाली होती. तशी ती जखम

न्याहाळतच होती. तोच तिचा पती घरी आला. त्यानं आपल्या घरी इमरानला आलेलं पाहिलं. तसा तो म्हणाला,

"अस्लाम वालेकूम भाईसाहाब इमरानजी."

"वाले कू सलाम भाईजान."

"कसे काय आलात?"

"आलो होतो बकरे घ्यायला."

"आणि हा कोण?"

"हा माझा आणि तुमच्या पत्नीचाही मित्र आबेद आहे. जो आता पाकिस्तानात राहतो. आम्हाला भेटायला आलाय. मी म्हटलं याला की आपल्याबरोबर शिकलेली शर्मिलाही बाजूच्याच गावात राहते. चल भेटायला. त्यावर यानं होकार दिला व आणलंय भेटायला. आता सांगा, चूक झाली असंन तं माफी असावी."

"अरे, भाईजान. त्यात माफी कसली. हा थोडं ना आमच्या घरी राहणार आहे कायमचा. अरे मित्र ना आपण. मग ते भेटणारच ना. त्यात काय?"

शर्मिलाचा पती शंकेखोर नव्हता. तसे समस्त भारतातील लोकंच स्वभावानं चांगले होते. कारण त्यांच्यावर सुसंस्कार होते भारती आईचे. जिच्या कुशीत ते लहानाचे मोठे होत होते. त्यानं त्याला भेटायची परवानगी दिली. तसा शर्मिलानं चहा बनवला व ते गोष्टी सांगत बसले. त्यातच शर्मिलाला आबेद म्हणाला,

"कशी काय आहेस शर्मिला?"

"ठीक आहे." ती म्हणाली व ती स्वयंपाकघरात चालली गेली. ती त्याचेशी किंचीतही बोललीच नाही. मात्र आबेद काय समजायचं ते समजला. त्यानंतर तो काहीच बोलला नाही.

शर्मिलानं चहापाणी केला व त्या चहापाण्यानंतर शर्मिला जी स्वयंपाकघरात गेली, ती बाहेर आलीच नाही. परंतु तिला भेटण्यातून समाधान पावत आबेद निघाला. त्यातच ती त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडं पाहात होती. परंतु आता तो कधीही परत येणार नव्हता.

तिचं खरंच प्रेम होतं त्याचेवर. परंतु आता तिनं आपला विवाह केल्यामुळं आता ती बंधनात होती. आता ना ती त्याची आरास करु शकत होती. ना ती त्याच्याशी प्रेमाच्या दोन गोष्टी बोलू शकत होती.

आबेद इमरानच्या घरी आला होता. तसा त्यानं इमरानच्या आग्रहाखातर तीन चार दिवस त्याच्या घरचा पाहूणचार घेतला. त्यानंतर तो बाहेर पडला. सोबतच त्यानं गाव सोडलं होतं.

आबेदनं गाव सोडलं होतं. परंतु ते गाव जरी त्यानं सोडलं असलं तरी आताही त्याला गावआठवत होतं. त्यातच आठवत होतं बालपण आणि आठवत होती ती. अन् तिनं त्याचेसाठी कापलेल्या हाताची नसही.

आबेद विचार करीत होता. पाकिस्तानात जायचं की हिंदुस्थानात राहायचं. परंतु पाकिस्तानात जाणार तरी कसं? कोण असं आपल्या हक्काचं आहे? कोणासाठी जायचं? ना मुलं ना बाळं, ना पत्नी ना एखादी प्रेमिका, ना आई ना वडील, ना भाऊ ना बहिण. जाणार तरी कोणासाठी आणि जायचंच असेल तर व्हिसा कसा काढणार?

कोण देणार? ना आपल्याकडे कागदपत्रं. शिवाय तो व्हिसा काढण्यासाठी पुन्हा धावपळ करावी लागणार. त्यापेक्षा आपण इथंच भारतात राहायचं. उड्डाण पुलाखाली झोपायचं. वाटल्यास काम करायचं. परंतु आपल्याला काम तरी कोण देणार?

त्याचा तो विचार. काम तरी कोण देणार, तद्वतच त्याला आठवला त्याचा मालक. ज्या मालकाच्या खानावळीत तो काम करीत होता. त्यातच त्याला तो मालक आठवताच तो कामासाठी त्या शहरात रवाना झाला आणि मालकाला भेटला. परंतु मालकानं त्याला चक्कं सांगीतलं. चक्कं सांगीतलं की त्याच्या जागेवर त्यानं एका व्यक्तीला ठेवलेलं असून आता दुसऱ्याला ठेवायची आवश्यकता नाही. का ठेवलं असं विचारताच मालकानं त्याच्या प्रेमाची सफाई दिली. म्हणत होता की प्रेम आंधळं असतं व प्रेमासाठी जो व्यक्ती पाकिस्तानातून इथं येवू शकते. तोच व्यक्ती आपल्या प्रेमिकेची भेट घेण्यासाठी गेल्यावर आणि खरंच प्रेमिका भेटल्यावर परत येईल का? अशीच शंका त्याला वाटल्यानं त्यानं आबेदच्या जाग्यावर एका व्यक्तीला कामाला ठेवलं होतं.

आबेदला त्या मालकाच्या खानावळीत काम मिळालं नाही. त्यानंतर त्यानं बऱ्याच ठिकाणी काम शोधलं. परंतु सगळे त्याला ओळख म्हणून काही पुरावा मागू लागले होते. जो पुरावा वा त्या पुराव्याचे एखादे कागदपत्रं त्याचेजवळ नव्हते. त्यामुळंच की काय, आबेदला काम मिळालं नाही. परंतु त्याच्या पोटात भुकेची झोंब होती. त्यामुळं तेही भागवणं आवश्यक होतं. त्यामुळंच की काय, त्यानं ती भूक भागविण्यासाठी भिक्षेचा मार्ग अवलंबिला.

आबेद आता भारतातच त्या नव्या शहरात राहू लागला होता. भूक भागविण्यासाठी तो भीक मागू लागला होता. शिवाय आपल्या खिशात एक पाकीट वागवू लागला होता. ज्या पाकिटात एक दैनंदिनी होती. ज्यात तो आपली जीवनगाथा लिहू लागला होता. ज्यात त्या गावाचं वर्णन होतं. शिवाय पत्ताही.

आबेद विचार करीत होता आपल्या प्रेमाबद्दलचा. परंतु ते प्रेम त्याला मिळालं नव्हतं. जशी भारत पाकिस्तान फाळणी झाली होती. तशीच फाळणी त्यांच्या प्रेमाचीही झाली होती. परंतु आजही त्याच्या मनात तिचं प्रेम शिल्लक होतं. ज्या प्रेमासाठी तो पाकिस्तानातून भारतात आला होता. ते सर्व त्या दैनंदिनीत उतरवून ठेवले होते त्यानं. आपण आपल्या प्रेमासाठी काय काय हालअपेष्टा भोगल्या याचं वर्णन त्या दैनंदिनीत होतं.

आबेद लिहित असलेली दैनंदिनी आज पुर्ण झाली होती. तरीही तिची आठवण गेली नव्हती मनातून. ती आठवण त्याच्या मनात श्रावणासारखी फुलत होती आणि जेव्हा आठवण यायची. तेव्हा आजही त्याचा जीव कासावीसच होत होता.

आबेद दररोज विचार करीत होता तिचा. ती सुखात असली तरी. कधीकधी त्याला वाटायचं की ती भेटावी. आपल्याचजवळ राहावी. परंतु ते आता शक्य नव्हतं. असाच विचार करता करता एक दिवस त्याच्या मनावर परिणाम झाला व तो वेडा झाला. परंतु ती दैनंदिनी त्यानं आपल्या डोळ्यासमोरुन ओझल होवू दिली नाही. तो वेडा झाला असला तरी ती दैनंदिनी तो आताही सांभाळून ठेवत असे.

आबेदनं प्रेमासाठी केलेला संघर्ष वाखाणण्याजोगाच होता. त्याचं देशप्रेम व धर्मप्रेम वाखाणण्याजोगच होतं. ज्यासाठी तो भारत सोडून पाकिस्तानात गेला होता. परंतु देशप्रेमापेक्षाही तरुण तरुणीचं प्रेम व ती शर्मिलाची ओढ ही अतिशय महत्वाची गोष्ट होती. हे विसरुन चालत नाही.

************************

आबेद वेडा झाला होता. परंतु तो वेडा झाला असला तरी त्यालाही पोट होतंच. त्या पोटासाठी तो भीक मागत होता. त्या भीकेतून तो आपलं पोट भागवत होता. त्याला हिशोब येत असूनही आता वेडा झाल्यामुळं हिशोबही समजत नव्हता. ना त्याला रहदारीचा रस्ता समजायचा ना रस्त्यावरील रहदारी. कधीकधी तो एकटाच बरळायचा. सारखं शर्मिलाचं नाव घेत राहायचा. कधी गालातल्या गालात हसायचा. त्याला ऊन पाऊसही समजायचं नाही. कधी तो भरल्या पावसात पावसाची खंत न बाळगता भिजायचा. तर कधी तप्त उन्हातही अनवाणी पायांनी हिंडायचा. कधी त्याच्या अंगावर कपडे नसायचे. ते कपडे त्याच्या हातात असायचे. तर कधी ते अंगात. त्याचे कपडे विटलेलेच असायचे. तसा तो वेडा असल्यानं आपल्याच जगात खुश असायचा. त्यातच त्याच्याजवळ कोणीही जायचं नाही.

आबेद वेडा झाला असल्यानं तो आज अगदी जगावेगळा बनला होता. परंतु तो वेडा असला तरी एक गोष्ट आवर्जून त्यानं सांभाळून ठेवली होती. ती गोष्ट म्हणजे त्यानं लिहिलेली दैनंदिनी. तो पावसात भिजायचा. परंतु त्यानं लिहिलेली दैनंदिनी

त्यानं पावसाच्या पाण्यानं भिजू दिली नाही. ती त्यानं अगदी सांभाळून ठेवली होती. कधी सवड मिळालीच तर तो स्वतः ती दैनंदिनी काढत असे. त्या दैनंदिनीकडं एकटक पाहात असे व पाहून झालं की तो एकटाच हुंदके देत जोरानं रडत असे. ते रडणं पाहून आजुबाजूचेही लोकं त्याच्याकडे कुतूहलानं पाहात असत. त्यानंतर ते लोकं पाहू लागले की तो आपलं रडणं बंद करीत असे. त्यानंतर तो ती दैनंदिनी गुंडाळून व्यवस्थीत ठेवत असे. तिला पाणी लागू नये अशी. जणू ती दैनंदिनी म्हणजे केवळ दैनंदिनी नव्हती तर ती दैनंदिनी म्हणजे त्याची प्रेमिका शर्मिला होती. ती दैनंदिनी त्याच्यासाठी जीव की प्राण होती.

शर्मिलाची ती आठवण. ती आठवण करीत करीत तो जगत होता, तो वेडा झाला असला तरी. त्या वेडेपणाच तो काय करतोय हेही समजेनासं झालं होतं. अशातच तो काळा दिवस उजळला.

आज तो काळा दिवस होता. त्या दिवशी भर दुपारची वेळ होती. आबेद भरदुपारीच उन्हातान्हात रस्त्याच्या मधातूनच चालला होता. त्याच्या अंगावर पुरेसे कपडे नव्हते. अशातच एक वाहन भरधाव वेगाने आलं. त्या वाहनाला तो दिसलाच नाही. त्यातच त्याचा अपघात झाला. ज्यात तो मरण पावला होता.

*************

आबेद मरण पावला होता. त्याच्या अंगावरही पुरेसे कपडे नव्हते. मात्र अपघात तो अपघातच. सुरुवातीला तो कोण आहे? याची शहानिशा न करता

पोलिसांनी त्याला वेडा ठरवत त्याचं प्रेत टाकून दिलं होतं. परंतु जेव्हा ते गाठोडं तपासलं गेलं, तेव्हा त्यात तीच दैनंदिनी आढळली.

ती तीच दैनंदिनी होती त्यानं लिहिलेली. ज्यात शर्मिलाचं नाव व इमरानच्या घराचा पत्ता होता. कदाचीत त्यानं तो होशात असतांना ही दैनंदिनी शर्मिलाकडे जावी याचा जणू संकल्प घेतला असेल असे वाटत होते. शिवाय ती दैनंदिनी इमरानच तिला नेवून देवू शकतो असंही त्याला वाटलं असेल. म्हणूनच त्या दैनंदिनीवर इमरानच्या घराचा पत्ता होता.

पोलिसांनी ती दैनंदिनी उघडली. ज्यात इमरानचा पत्ता होता. ज्यात शर्मिलाचं नाव होतं. त्यानंतर तशी माहीती मिळताच पोलिसांनी शर्मिला व इमरानशी संपर्क साधला. त्यानंतर इमरान व शर्मिलाला मृतदेहाची ओळख करायला बोलावलं.

इमरान व शर्मिला पोलीसस्टेशनला आले होते. त्यांनी मृतदेहाला ओळखलं. तशी खात्री झाल्यावर त्यांनी मृतदेह कोणाचा आहे हे पोलिसांना सांगीतलं. त्यानंतर त्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा प्रश्न उद्भवला. त्यातच इमराननं धर्मभाऊ म्हणून त्या मृतदेहाचा स्विकार केला. त्यानंतर संपूर्ण प्रक्रिया पार पडली व शेवटी पुर्ण प्रक्रिया पार पडताच पोलिसांनी इमरानच्या ताब्यात त्यानं लिहिलेली दैनंदिनी दिली.

इमराननं ती दैनंदिनी ताब्यात घेतली. सोबतच तो मृतदेहही ताब्यात घेतला. त्यानंतर तो मृतदेह त्या दोघांनी मिळून गावाला आला.

मृतदेह गावाला आणला होता. तो गावच्या मातीत योग्य संस्कार करुन दफनही झाला होता. तसा आबेदचा एक आणि तोही शेवटचा अध्याय संपला होता.

इमरान घरीही आला होता. शिवाय विसरुन गेला होता तो आबेदला. अन् त्या दैनंदिनीलाही तो विसरला होता. त्यातच ती दैनंदिनी धूळखात एका कोपऱ्यात पडली होती. अशातच एक दिवस एक उंदीर त्यावरुन चालला. बहुतेक तो उंदीर मांजराच्या धाकानं आपला जीव वाचविण्यासाठी पळत होता. त्यातच तो उंदीर पळत असतांना अचानक ती दैनंदिनी खाली पडली. तसं इमरानचं लक्ष त्या दैनंदिनीवर गेलं.

दैनंदिनी उंदरानं पाडली होती. तसं इमरानचं लक्ष त्या दैनंदिनीवर जाताच त्यानं ती दैनंदिनी उचलली. क्षणातच त्याला आठवली ती दैनंदिनी. हीच ती दैनंदिनी त्याला पोलिसांनी दिली होती. हीच ती दैनंदिनी आबेदच्या गाठोड्यात सापडली होती. इमरानला सारंच आठवू लागलं होतं.

इमरानला सापडलेली ती दैनंदिनी. तसं पाहिल्यास आबेद मरायला भरपूर दिवस झाले होते. तो त्याला विसरुनही गेला होता. परंतु ती दैनंदिनी सापडताच त्याला आबेद आठवायला लागला होता. तसं त्यानं दैनंदिनीचं पहिलं पान उघडलं. ज्यात लिहिलं होतं की ही दैनंदिनी मी शर्मिलासाठी लिहित असून तिनं ती वाचावी एवढीच अपेक्षा आहे.

इमराननं ती दैनंदिनी पुर्णतः वाचून काढली. ज्यात त्याच्या प्रेमाची इतिश्री लिहिली होती. शेवटी लिहिलं होतं की ही दैनंदिनी तिचीच अमानत आहे. ती तिला द्यावी. त्याखाली त्याची स्वाक्षरी होती व पत्ता इमरानचा टाकला होता.

इमराननं ती दैनंदिनी वाचली. त्यानंतर त्यानं ती दैनंदिनी शर्मिलाकडं पोहचवली व तिला सांगीतलं की ही दैनंदिनी आबेदची असून तुझ्यावर लिहिलेली

आहे. त्यात लिहिलं आहे की शर्मिलानं ती दैनंदिनी एकदा तरी वाचावी. ही तिचीच अमानत आहे.

शर्मिलानं ती दैनंदिनी आपल्या ताब्यात घेतली. तसा इमरान माघारी फिरला. त्यानंतर ती त्याच दैनंदिनीचं एकेक पान वाचू लागली होती. ज्यात तिच्या प्रेमाचा सारीपाट वर्णन केल्या गेला होता. तसं वाचता वाचता तिच्या डोळ्यातून अश्रुधारा टपकू लागल्या होत्या.

आज ती दैनंदिनी तिच्या हाती आली होती. तिनं वाचायला सुरुवातच केली होती. तसे आठ दिवस झाले होते. आज ती वाचून पुर्ण झाली होती. तोच तिला अगदी मळमळायला लागलं होतं. त्यातच तिला ओकारी व्हायला लागली. शिवाय ओकाऱ्यात वाढ झाली होती. कसंतरी वाटू लागलं होतं. ओकाऱ्या थांबत नव्हत्या. शेवटी तिला वाटलं, वाटलं की आपण डॉक्टरकडे जायला हवं.

शर्मिलाचा डॉक्टरकडे जाण्याचा बेत. त्यातच ती डॉक्टरकडे गेली. ओकाऱ्याची तपासणी केली. ज्यातून निष्पन्न झालं की तिला होणाऱ्या ओकाऱ्या या साध्यासुध्या नाहीत. त्या ओकाऱ्या नवनिर्मीतीच्या आहेत. तिच्या घरी नवीन पाहुण्याचं आगमण होणार आहे.

नवीन पाहुण्याचं आगमण. डॉक्टर तसं बोलताच ती आनंदी झाली होती. तिच्या घरी बाळ जन्माला येणार होतं. ती गरोदर राहिली होती.

शर्मिला विचार करीत होती. विचार करीत होती की आतापर्यंत आपण बरेच प्रयत्न केलेत गरोदर राहण्यासाठी. औषधपाणीही घेतली. परंतु तरीही हा नवनिर्मीतीचा क्षण माझ्या आयुष्यात कधीच उजळला नाही. अन् ही दैनंदिनी? ही

दैनंदिनी वाचताच ओकाऱ्या व्हायला लागल्या. डॉक्टरांनी तपासल्यावर त्या ओकाऱ्या नवनिर्मीतीच्या आहेत असं सांगीतलं. हा काय चमत्कार आहे? दैनंदिनी वाचल्यावर हा चमत्कार? तिचा त्यावर विश्वासच बसत नव्हता.

शर्मिलाच्या विवाहाला बरेच वर्ष झाले होते. अजुनही तिच्या घरी पाहुणा हालला नव्हता. तिनं बरेच नवशं केले होते. देवाला साकडे घातले होते. डॉक्टरच्या तपासण्याही केल्या होत्या. परंतु योग जुळून आला नव्हता. परंतु नुकतीच तिनं ती दैनंदिनी वाचताच तो दिव्य चमत्कार झाला होता. ज्यातून ती गरोदर राहिली होती.

शर्मिलाला अतिशय आनंद झाला होता. आता ती आठवत होती ती दैनंदिनी. ज्यात शेवटी शेवटी लिहिलं होतं की मला तू भेटावी ही माझी अंतिम इच्छा आहे.

ती विचार करीत होती की कदाचीत मी त्याला मागील जन्मी नाही मिळाली एक प्रेमिका म्हणून. ती त्याची इच्छा अधूरीच राहिली असेल. कदाचीत मी त्याला भेटावं अशी त्याची इच्छा असेल. म्हणूनच ती दैनंदिनी माझ्यापर्यंत आली असेल आबेद बनून आणि तोच आबेद आज माझ्या पोटात. कदाचीत त्याची इच्छा असेल की निदान प्रेमिका बनून नाही तर तिचा बाळ बनून तरी तिच्याजवळ राहावं. हीच त्याची अंतिम इच्छा असेल.

शर्मिला गरोदर राहिली होती ती दैनंदिनी वाचून. त्यानंतर नऊ महिने पुर्ण होताच तिनं एका गोंडस बाळाला जन्म दिला होता. जो आबेद सारखाच दिसत होता. आता ती खुश होती. आज तिनं ती दैनंदिनी सांभाळून ठेवली होती. स्वतःच्या लेकरागत. ती दररोज त्या दैनंदिनीला आपल्या डोळ्याशी लावत असे. त्या

दैनंदिनीवर नतमस्तक होत असे. नव्हे तर ती दैनंदिनी तिला जीव की प्राण वाटत होती.

आजही तिला आबेद आठवत होता आणि आजही तिला आबेदच्या आठवणी आठवत होत्या. आज आबेद जगात नव्हता. फाळणीनं त्याला तिच्यापासून हिरावून घेतलं होतं. परंतु आजही आबेद तिच्यासाठी जीवंत होता एक दैनंदिनी बनून. तसाच तिचा मुलगा म्हणून तिच्या पोटी जन्म घेवूनही.

शर्मिला गरोदर होती. तशी ती रोजच ती दैनंदिनी पुन्हा पुन्हा वाचत असे. त्यातच तिच्या आठवणी ताज्या होत होत्या. परंतु आज त्या आठवणी ताज्या करुन आज काही उपयोग नव्हता.

काही दिवस गेले होते. शर्मिलानं एका गोंडस बाळाला जन्म दिला होता. त्यातच तिनं त्याचं नाव आबेदच ठेवलं होतं.

आबेद त्याचं नाव. ते नाव मुस्लीम वाटत होतं. परंतु ते नाव तिला आवडत होतं. कारण त्या नावात तिचं प्रेम लपलं होतं.

आजही तिला आबेदची आठवण यायची. तेव्हा जीव कासावीस व्हायचा. परंतु तिच्या पुढ्यात तिचा मुलगा दिसताच तिची येणारी आठवण विरुन जायची. त्यातच त्याला कवेत घेतल्यावर जणू आबेदच आपल्याला आलिंगण देत आहे असंच वाटायचं.

शर्मिलाला आज आबेदची आठवण आली होती. तिला त्याला भेटावेसे वाटत होते. परंतु ती भेटणार तरी कशी? त्यातच तिला आठवलं की गावाकडं त्याला दफन केलं होतं. त्याच ठिकाणी त्याची कबरही बनवली असेल. तसं आठवताच ती

काहीतरी बहाणा करुन गावाला आली. ज्यावेळेस नुकताच पावसाळा सुरु झाला होता.

शर्मिला गावाला आली होती. शिवाय पावसाळाही सुरु झाला होता. परंतु आता रस्ते चांगले बनलेले असल्यानं गावात चिखल वा पाणी गोळा होत नव्हतं. त्यातच तिला आठवलेला आबेद. त्याच्या समाधीची भेट घेण्यासाठी ती आतूर झाली होती. त्यातच तिला आठवत नव्हती त्याची समाधी. ती समाधी कुठे आहे कुठे नाही. याचा तिला थांगपत्ता नव्हता. ते पाहून तिचा जीव कासावीस होत होता. त्यातच तिला आठवला इमरान. कदाचीत इमरानला त्याची समाधी माहीत असेल, असंच वाटायला लागलं होतं. त्यानंतर लागलीच ती इमरानच्या घरी गेली. म्हणाली,

"इमरानभैया, मला आबेदची आठवण येत आहे. त्याची भेट घ्यावीशी वाटत आहे. परंतु मला माहीत आहे की आता इमरान जीवंत नाही. परंतु त्याची स्मृती आजही जीवंत आहे. तेव्हा मला त्याची समाधी दाखव. माझं मस्तक त्याच्या समाधीवर टेकविण्याची माझी इच्छा आहे."

इमराननं ते सगळं ऐकलं. तसा इमरान तिला त्याच्या समाधीजवळ न्यायला तयार झाला. लागलीच तिनं काही गुलाबाचीही फुलं घेतली व तिही त्या समाधीजवळ नतमस्तक होण्यासाठी जावू लागली. थोड्याच वेळात ती समाधी आली व समाधी पाहताक्षणी तिला भाष झाला. तो भाष आबेदचाच होता. कदाचीत आबेदच तिथं आपल्या आजुबाजूला अस्तित्वात आहे, असं तिला वाटायला लागलं होतं. तशी ती आणखी जवळ गेली समाधीच्या. त्यानंतर तिनं समाधीला आलिंगन दिलं आणि मस्तक टेकवलं. त्याचवेळेस तिला जाणवलं की आबेद तिथं

आलेला आहे. तिला तो भेटलेला आहे व तो म्हणत आहे की तो आजही मरण पावलेला नसून त्यानं जन्मच घेतलेला आहे. तिचं ते बाळ म्हणजेच त्याचा पुनर्जन्मच आहे.

ती समाधीजवळ गेली होती आबेदच्या. ज्याला ती मंडळी कबर वा मकबरा म्हणत. त्यानंतर तिनं आपले मस्तक त्या कबरीवर टेकवले. तोच तिला विचार आला. विचार आला की जर मी याच आबेद सोबत विवाह केला असता तर आज तो मरणागती गेला नसता. जे घडलं त्याला जबाबदार मीच आहे. कारण त्याची जी दैनंदिनी होती. ती दैनंदिनी तिनं वाचली होती. त्यात त्याचा जीवनवृत्तांत लिहिलेला होता. ज्यातून त्यानं आपली भुमिका मांडण्याचा प्रयत्न केला होता.

तिनं विवाहही केला असता त्याचेशी. परंतु तिच्या विवाहाच्या आड तिचे संस्कार येत होते. ते संस्कार की ज्यानं तिच्या मनात विवाह करण्याविषयी नकार भरला होता. ती मुळ भारतीय होती. ज्यांच्यात संस्कार कुटकूट भरले होते. तिनं प्रेम केलं होतं आबेदवर. खरं प्रेम. परंतु तिचं दुसरं प्रेम आपल्या मातृभुमीवरही होतं. त्या मातीवर होतं, ज्या मातीत तिनं जन्म घेतला होता. जी भारताची मातीत होती. ती भारतीय माती तिला पाकिस्तानात जायची परवानगी देत नव्हती. त्यातच तिच्या भारताचाही स्वातंत्र्यप्राप्तीचा इतिहास होता.

ती आबेदच्या कबरेवर नतमस्तक तर झाली होती. परंतु तिला आता एक खंत वाटत होती. ती खंत होती, आबेदसोबत बोलण्याची. आबेद जेव्हा तिला भेटायला आला होता, तेव्हा आबेदसोबत न बोलण्याची. ज्यावेळेस आबेद तिला भेटायला आला होता तिच्या घरी. त्यावेळेस त्याच्याशी बोलण्याची इच्छा असूनही तिला

त्याचेशी मनमोकळेपणानं बोलता आलं नाही. कारण तिचा पती. तो घरी असल्यानं ती बोलू शकली नाही. हेच ते भारतीय संस्कार होते. त्यामुळंच आज तिला वाटत होतं की कदाचीत याचाच धसका घेवून आबेदच्या मनावर परिणाम झाला असेल. ज्यात तो मरणागती गेला. तसं पोलीस स्टेशनला तिला बोलावणं आलं होतं, तेव्हा तिला पोलिसांनी माहिती दिली होती की आबेद त्यांना एका भिकाऱ्याच्या अवस्थेत सापडला. ज्याचे कपडेही त्याच्या अंगावर नसून ते कपडे त्या दैनंदिनीला गुंडाळून होते. ही भिकारी अवस्था आपल्यामुळंच झाली, याला कारणीभूत आपणच. असं तिला वाटायला लागलं होतं.

शर्मिलाला त्याच्याशी न बोलण्याचं शल्य जाणवत होतं. परंतु तिला वाटत होतं की आपण त्याचेशी विवाह केला असता तर...... कदाचीत तो भारतातच राहिला असता का? त्याचं उत्तर तिच्याजवळच होतं. जो व्यक्ती खरं प्रेम टाकून आपल्या अब्बुसोबत पाकिस्तानात जावं शकते. तो खरंच भारतात राहिला नसता. आलाही नसता आणि मला सदोदीत त्यानं बुरख्यातच ठेवलं असतं.

भारत....... कोणी भारताविषयी आत्मीयता बाळगत नाहीत व त्याला दोष देत जयजयकार करायलाही मागे पुढे पाहतात. शिवाय आता काहीजण म्हणायला लागलेय की भारतात आमची घुसमट होतेय. परंतु कशी घुममट होते, तेच कळत नाही.

भारत महान देश आहे. तो महान आजचा नाही. तो पुर्वीपासूनच महान आहे. हे या देशातील जन्मास आलेल्या थोर पुरुषांवरुन लक्षात येतं. या देशाचा इतिहास मोठा रक्तरंजीत आहे. तसाच तो समृद्धही आहे. तो समजणं गरजेचं आहे.

भारताला पुर्वी सोन्याची चिडीया म्हणायचे. त्याचं कारण होतं भारताचं समृद्धपण. भारतात एवढा हिरवेगारपणा होता आणि जंगलं होती की त्या जंगलात वन्य पदार्थ भरपूर मिळायचे. त्यातच भारतात हिऱ्याची सुद्धा खाण होती. ज्यात कोहिनूर हिऱ्याचा समावेश आहे. तसंच कितीतरी प्रमाणात सोने व चांदी भारतात अस्तित्वात होते.

भारतात सोन्या चांदीचा व हिऱ्याचा खजिना होता. अन्नधान्य वा विपूल प्रमाणात खनिज पदार्थ होते. त्यातच या मातीत अशा अशा वस्तू पीकत होत्या की ज्या वस्तू इतर देशात पीकत नव्हत्या. देशाच्या कोणत्याही भागात गेल्यास सर्वत्र भरभराटच दिसायची.

देशात सोनं विपूल प्रमाणात दिसल्यामुळं विदेशी लोकं भारतात येत व भारताला लुटून निघून जात. हे सिंकदरच्या स्वारीवरुन दिसून येते. सिकंदरही भारत समृद्ध आहे हे ऐकून भारताला जिंकण्यासाठी भारतात आला होता. परंतु या मातीत जशी खनिज संपत्ती, हिरे, पाचू, सोने व चांदी दडलेली होती. तशीच दडलेली होती माणसं. ती माणसं थोर होती. संस्कारी होती. त्याच माणसांच्या विरतेच्या साहाय्यानं विदेशी आक्रमणकर्त्यांना भारतातून वेळोवेळी पळ काढावा लागला होता.

भारतावर विदेशी आक्रमणं झाली. त्यातच त्या आक्रमणात कमीतकमी दोनशे वेळा विदेशी शासकांनी भारतावर आक्रमण करुन भारताला लुटलं. ज्यात पर्शियन राजा अचमेनिड याचा समावेश होतो. त्यानंतर सायरस द ग्रेट, डॅनियल द ग्रेट, झेरक्स यांनी अनेक वेळा भारतावर आक्रमणं केली. हे सर्व शासक ईराणमधील हखमनी वंशाचे राजे होते. तो काळ पाचशे पन्नास इस पुर्वचा मानला जातो. त्यानंतर

भारतातील आंबी राजाला हाताशी घेवून व करार करुन पुरु राजाला हारविण्यासाठी आणि भारताला लुटण्यासाठी सिंकदरही इस पूर्व तिनशे एकसष्टमध्ये भारतावर चालून आला होता. मात्र पुरुनं आपल्या विरतेचा परिचय देत अलेक्झांडर उर्फ सिकंदरला असे प्रत्युत्तर दिले की त्याची जगजेत्तेपणाची आस संपुष्टात आली व तो परत गेला आणि परत जातांना वाटेतच तो मरण पावला. आपल्या देशापर्यंतही गेला नाही. त्यानंतर मोहम्मद बिन कासीमनं भारतावर अनेक स्वाऱ्या केल्या. या स्वाऱ्यादरम्यान त्यानं सिंधचं राजपालपद सांभाळलं. त्यानंच राजा दाहिरची हत्या केली होती. तो काळ सन सातशे बारा ते सातशे पंधराचा होय. मोहम्मद बिन कासीम हा पहिला मुस्लीम विदेशी आक्रमणकारी होता. त्यानंतर गझनीचा मेहमूद याने भारतावर सतरा वेळा स्वाऱ्या केल्या. या स्वाऱ्यादरम्यान त्यानं अनेक मंदिरं लुटली. गावंची गावं लुटली. कित्येक महिलांचे मंगळसूत्र लुटले व भारताला कंगाल बनविण्याचा प्रयत्न केला. परंतु भारत कंगाल बनला नाही. हा काळ सन नवशे अठ्ठ्यानव ते एकहजार तीसचा धरले जातो. त्यानंतर मोहम्मद घोरीनं भारतावर सन अकराशे पंच्याहत्तर मध्ये आक्रमण केले. त्यानं बरेचवेळा भारतावर आक्रमण केले. ज्याला पृथ्वीराज चौव्हाननं त्याच्याच शहरात जावून त्याला ठार केलं. तेही त्याचाच बंदी असतांना. त्यानंतर तैमूर लंग याने भारतावर आक्रमण केले. तो काळ तेराशे अडतीसचा होय. त्याने तुघलक वंशाची राजसत्ता भारतावर स्थापन केली. त्यानंतर भारतात येणारा विदेशी आक्रमणकर्ता बाबर होय. त्यानं तर पुर्ण स्वरुपातच भारताला मुस्लीममय बनवलं होतं. बाकीचे आक्रमणकारी भारतात स्थिरावले नाही. ते भारताला लुटलूट लुटून निघून गेले. परंतु बाबर व बाबरनंतर आलेल्या तमाम शासकांनी भारतालाच आपला देश समजत इथंच वसाहती स्थापन केल्या व ते इथंच

राहू लागले. त्याचं कारण होतं भारताची सोन्याची चिडीयाच असणे. बाबरानंतर भारताला पुन्हा एकदा सोन्याची चिडीया समजत इंग्रजांनी भारतावर आक्रमण करुन भारताला गुलाम बनविले.

भारत सोने की चिडीयाच होता. त्याचं कारण येथील सोनं नव्हतं की जे लुटलूट लुटून नेला आलं होतं. काही साम्राज्यांनी येथील सोना व संपत्ती लुटून नेली. ते त्यालाच सोन्याची चिडीया मानत होते. परंतु मुस्लीम शासक बाबर याने येथील जमीनीला सोन्याची चिडीया समजून घेतलं. ती शेतजमीन त्यांना लुटून नेता येत नव्हती. म्हणूनच ते इथं स्थिरावले. कारण या जमीनीत तत्सम प्रकारचे मसाले पीकत होते. ज्याचा वापर स्वयंपाकात केल्या जात असे. शिवाय ते तत्सम पदार्थ टाकल्यानं भाजीला वेगळीच चवही येत असे. तसेच कित्येक प्रकारच्या औषध्या या जमीनीत उपलब्ध होत्या. हे मसाल्याचे पदार्थ व ह्या औषध्या जगात कुठेच उपलब्ध नसल्यानं भारतावर विदेशी आक्रमणं झालीत. नव्हे तर विदेशी आक्रमणकर्त्यांना या देशात स्थिरावायला भाग पाडलं. हेच दिसलं पुढे इंग्रज, डच, पोर्तुगीज व फ्रेंचांना. तेही या देशावर आक्रमण करण्यासाठी आले होते. परंतु त्यांचं इंग्रजांपुढं काहीच चाललं नाही. त्यातच फ्रेंचांचं युद्ध झालं व फ्रेचांना माघार घेवून परत जावं लागलं. त्यातच बाकीच्या शत्रुंनीही इंग्रजांपुढे शरणागती पत्करली.

इंग्रजांनी भारतात राहून भारतातीलच लोकांना गुलाम केलं, राबवलं व त्याच्या हातानं निर्माण झालेला माल आपल्या देशात नेला. त्यावर प्रक्रिया करुन तोच माल आपल्या देशात आणला आणि आपल्याला घ्यायला भाग पाडलं. उदाहरणार्थ लांब धाग्याचा कापूस. त्या कापसाला आपल्या देशात नेलं व प्रक्रिया करुन त्याचं कापड बनवून ते आपल्याला विकलं. त्यानंतर जेव्हा ते भारताला सोडून

गेले. तेव्हा त्या भारतातील जमीनीत सोनं पीकत होतं. त्या देशातील त्या जमीनीत सोनं पिकू नये म्हणून कित्येक जमीनीत मीठ टाकलं नसेल कशावरुन? कारण येथील उपजाऊ जमीन त्यांना लुटून नेता येवू शकत नव्हती.

हे सगळं घडलं. कारण आपण मुर्ख होतो. आपण बुवाबाजीत अडकलो होतो पुर्वीपासून. आपण माणसांना माणूस समजत नव्हतो पुर्वीपासून. आपण पुर्वीपासूनच आपल्याच भारतात राहणाऱ्या आपल्याच भाऊबंदांना आपले शत्रू समजत राहिलो आणि त्यांच्याविरुद्ध इस्तेमाल करण्यासाठी विदेशी लोकांना बोलावलं. जसे अलेक्झांडरला भारतात आक्रमण करायला आंबीनं बोलावलं नव्हे तर त्यानं सिकंदरला मदतच केली. मोहम्मद बिन कासीमला ज्ञानबुद्ध व बुद्धभुषणनं बोलावलं. त्यानं अलोर किल्ल्याचा राज मोहम्मद बिन कासीमला सांगीतला. कारण त्याला राजा बनायचं होतं. परंतु त्याची अपेक्षा पुर्ण झाली नाही. मोहम्मद घोरीला राजा जयचंदनं बोलावलं. त्यालाही राजा बनायचं होतं. परंतु अपेक्षाभंग झाला. इंग्रजही भारतात आले. त्यांना व्यापारी सवलती त्यावेळच्या जहांगीर बादशाहानं दिल्या होत्या. व्यापार करण्यासाठी. पुढं त्यांनी पाय रोवले. परंतु व्यापार करण्याच्या इंग्रजांना सवलती देणे म्हणजेच एकप्रकारे इंग्रजांना मदतच करणे होते. ज्यातून भारत इंग्रजांचा गुलाम बनला होता.

इंग्रजांनी भारतात सुधारणा केल्या. त्यासाठी त्यांनी कायदेही केले. येथील सतीप्रथा बंद केली. जी प्रथा महिलांना तिच्या पतीच्या निधनानंतर त्याच्या शरणावर जीवंत जाळत होती. त्यांनी विधवा पुनर्विवाहाचा अधिकार मिळवून दिला. बालविवाह प्रथा थांबवली. समाज सुधरवला. मात्र भारताला सोन्याची चिडीया ठेवलं नाही. जेवढं भारताला लुटून नेता येईल. तेवढं लुटून नेलं. शिवाय येथील

जमीनीतून ते सोन्याचं उत्पन्न घेण्यासाठी असं असं रसायन फवारलं की ज्या ठिकाणी सोनं पीकत होतं, त्या शेकडो हेक्टर जमीनी बंजर झाल्या. ज्यावेळेस भारत स्वतंत्र्य झाला होता. त्यावेळेस भारतातील कित्येक हेक्टर जमीनीवर वाळूचेच साम्राज्य पसरले होते. जिथं पुर्वीच्या काळात हरियाली असेल. परंतु त्यावरही मात करीत भारत स्वतंत्र्य झाल्यावर येथील राजकीय नेत्यांनी आपल्या अपार कष्टानं तसंच तनमनधनानं पुन्हा एकदा वैभवशाली दिवस प्राप्त करुन दिलेत. यात त्यांनी केलेली अपार मेहनत मोलाची आहे. शिवाय या भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे क्रांतिकारक लढले व अल्पावधीतच फासावर गेले वा हुतात्मे झाले. त्यांचे हुतात्मपण वाखाणण्याजोगंच आहे. अवघ्या आठ वर्षाचा नंदूरबारचा शिरीष, घनश्यामदास, रणछोडदास, अवघ्या तेवीस वर्षाचा भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव. या व्यतिरिक्त लाला लजपतरायसारखे अनेक वीर पुरुष. या सर्वांच्या रक्तानं पावन झालेली ही भारतभुमी. याच भुमीवर काल बाजीप्रभूचं रक्त सांडले, विदेशी राज्यकर्त्यांचा प्रतिकार करतांना आणि याच भुमीवर जालियनवाला बागेत शेकडो वीर जनरल डायर नावाच्या विदेशी माणसांच्या गोळयांचे शिकार बनलेत. याच भुमीत राणी लक्ष्मीबाईला वीरमरण आलं, अन् याच भुमीत ताराबाईनं स्वराज्य टिकवलं तरी तिला मृत्यूपर्यंत सन्मान मिळालं नाही. त्याचं कारण होतं, आपण वागणं. आपण आपल्याच माणसांशी माणसासारखं वागत नाही. तर त्यांना आपण आपलेच शत्रू समजत वागतो. व्यवहारही करतो.

विशेष सांगायचं झाल्यास आपण आपल्या माणसांशी वागतांना आपली भुमिका बदलवावी. सौहार्दपुर्ण वागावं. त्यांना शत्रू समजू नये आणि त्यांना शत्रू समजत विदेशी लोकांना आपल्याच देशात शिरण्याची परवानगी देवू नये. कारण

कोणताच विदेशी व्यक्ती आपल्याला चतकोर पोळीची मदत करेल. परंतु त्याचबरोबर तो पाऊण कोर पोळी हस्तगत करण्याचा प्रयत्न करेल यात शंका नाही. तेव्हा वेळीच सावधान व्हावं. तसंच हेही लक्षात घ्यावं की भारत सोने की चिडीया होती. त्याला सोन्याचीच चिडीया बनवायचे आहे. त्यादृष्टीनंच पावलं टाकायची आहेत. त्याशिवाय भारत पुन्हा एकदा सोन्याची चिडीया बनणार नाही व भारताचे निघून गेलेले गतवैभव भारताला पुन्हा प्राप्त होणार नाही. हे तेवढंच खरं.

भारताचा इतिहास हा बुरख्यातील नव्हताच. बुरखा पद्धती मुस्लिमांनी आणली. त्याचं कारण होतं त्यांचा अधिवास. मुस्लीम समुदाय हे वाळवंटात राहात होते. तिथं कडक ऊन्हं पडायचं. त्यातच उन्हाचा दाह चेहऱ्याला होवू नये व काळे कापड उष्णतेचा सामना करु शकतो असा विचार करुन त्या लोकांनी काळे कपडे वापरण्याची सुरुवात केली होती.

शर्मिलाचा तो विचार. ती गेलीही असती पाकिस्तानात. परंतु तिला बुरखा पसंत नव्हताच. तिला आबेद आवडत होता. परंतु त्याचं पाकिस्तानात जाणं आवडलं नाही. म्हणूनच ती हाताची नस कापली गेली. आज त्या नस कापण्याचा तिला पश्चाताप नव्हता. पश्चाताप होता आबेदच्या मरणाचा. तशी ती त्या कबरेवर नतमस्तक होताच स्वगत बोलली,

"आबेद, मी तुझ्याशी विवाह केलाच असता रे. जर तू पाकिस्तानात गेला नसतास तर."

तिचा तो विचार. तो विचार रास्तच होता. कारण तिचा देश महान होता व त्या देशातील लोकांमध्ये महान असे संस्कार होते. ते कोणाही एकावर प्रेम करीत

होते आणि निभवीत असत शेवटपर्यंत. त्यामुळंच तिचा तो विचार. तोच त्या कबरेतून आवाज आला. जणू ती कबर बोलत होती. म्हणत होती,

"बरं झालं तू माझ्याशी विवाह केला नाहीस तर........ मी मानतो की तुझं माझ्यावर प्रेम होतं. प्रेम निरतिशयच होतं. परंतु ते प्रेम होतं. तो विवाह नव्हता. अगं आमच्याकडं विवाह हा करार असतो. तो अजुनही बदललेला नाही. ज्यात कबूल कबूल तीनवेळा म्हटलं की विवाह आणि तलाक तलाक तीन वेळा म्हटलं की तलाक. मग जी पत्नी वा प्रेमिका आपल्यावर निरतिशय प्रेम करते. ते नातं कितीही पवित्र वा कितीही चांगलं असलं तरी ते नातं एका सेकंदात खल्लास. आम्ही आमचे मायबाप, आमचे पुर्वज यांच्या मनानं व मतानं वागणारी माणसं. शिवाय सगळं त्यांच्या मनानंच व्हायला हवं. नाही झालं तर जेहाद. मग त्याचा परिणाम काहीही होवो, आम्ही विचारच करीत नाही. माहीत आहे, आम्ही पाकिस्तान तर मागीतला. परंतु त्याची हालत कशी आहे. अगं तुमचा भारत तरी बरा. परंतु आमचा पाकिस्तान यापेक्षा वेगळाच आहे. तिथं नीट रस्ते नाहीत. गरीबी आहे. खाणारी तोंड जास्त आहेत. प्रत्येक घरी शिक्षण नाहीच. कारण मुलं जास्त असतात. त्यांना पोषता पोषता नाकी नव येतो. परंतु समाजाची ती एक प्रथा आहे. लेकरं पैदा होवू देणं हा आमचा एक रिवाज आहे. आम्ही लेकरं पैदा होण्याला अल्लाची देणच समजतो. कुटूंब नियोजनाला आम्ही अल्लाच्या कामात टांग अडवणं समजतो. शिवाय केवळ अंधश्रद्धाच आहेत आमच्याकडं. बऱ्याच अंधश्रद्धा, ज्या भारतातही आहेत. माहीत आहे, तू जर माझ्याशी विवाह केला असता, तर तुझ्या स्वयं व्यक्तीस्वातंत्र्याची गळचेपीच झाली असती, नव्हे तर हत्याच. मग मी भारतात जरी राहलो असती तरी. अगं माझी इच्छा नसतांनाही तुला मी बुरख्यातच ठेवलं असतं. कारण परंपरा मोडता

येत नाही. आता सांग की तुला बुरखा पसंत राहिला असता का? अन् मला जरी त्याचा विरोध असता तरी मी ती प्रथा बदलवू शकलो नसतो. शिवाय या भारतातही मी असतो तुझ्याबरोबर तर आज तुला मी मुलं पैदा करण्याची मशीन समजत कितीतरी मुलं जन्मास घातली असती, अल्लाच्या कामात अडथळा नको म्हणून. म्हणूनच सांगतोय की बरं झालं, तू माझ्याशी विवाह केला नाही म्हणून. अगं तू जर आमची एखादी प्रथा मोडली असती ना, तर त्याचं चित्रही वेगळंच राहिलं असतं. ते चित्र असतं तुझी हत्या. या हातानं मला नाईलाजानं तुझी हत्या करावी लागली असती आणि ज्या खड्ड्यात आज मी कबर बनून आहे ना. आज मी जीवंत असतो आणि तू त्याच खड्ड्यात आज पडली असती. निपचीत, काहीही गुन्हा नसतांना. म्हणूनच बरंच झालं समज की तू माझ्याशी विवाह केला नाहीस व मी भारतात राहिलो नाही. हे सगळं अल्लानंच घडवून आणलं. अल्लानंच मला पाकिस्तानात पाठवलं. जर मी पाकिस्तानात गेलो नसतो तर कदाचीत आपण विवाह करुन मोकळे झालो असतो व इमरानसारखं आयुष्य आपल्यालाही जगावं लागलं असतं."

कबरेतील आबेदचं बोलणं झालं होतं. तो काय बोलला ते आता शर्मिलाला नीट समजलं होतं. परंतु शेवटचं तिला काही समजलं नव्हतं. ती त्यावर विचार करीत होती. त्या कबरेतील आबेद बोलला होता इमरानसारखं आयुष्य आपल्याला जगावं लागलं असतं. त्यावर ती विचार करीत होती. विचार करीत होती की ती कबर इमरानसारखं आयुष्य जगावं लागलं असतं, अशी का म्हणाली. इमरान तर आज बराच सुखी आहे.

कबरेतील आबेदचं ते वाक्य. ते इमरानसारखं आयुष्य? त्या बोलण्याचा अर्थ काय? तिच्या मनातील तो विचार. त्यावर ती बराच विचार करीत होती. परंतु तिला

काही उत्तर सापडत नव्हतं. त्यातच ती ते उत्तर शोधत होती. ते उत्तर शोधता शोधता तिची नजर तिथंच उभ्या असलेल्या इमरानकडे पडली. तशी ती म्हणाली,

"इमरान ही कबर बोलते का रे?"

इमरान तिथंच उभा होता. त्याला काहीच ऐकायला आलं नाही. तसा तो बोलला,

"नाही तर."

"तुला काहीच ऐकायला आलं नाही का रे?"

"नाही तर."

"इमरान ही कबर बोलते. म्हणत होती की इमरानसारखं आयुष्य तुलाही जगावं लागलं असतं. याचा अर्थ काय रे? जरा तुला तरी सांगता येईल काय?"

इमराननं ते ऐकलं. तसा तो म्हणाला,

"ती समाधी आहे. ती समाधी काहीही बरळणारच. तो आपला भाष असतो. त्यावर विश्वास ठेवायचा नसतो. चल घराकडं."

असं म्हणत तिला इमराननं उठवलं. सायंकाळ झाली होती. तसे ते दोघंही ताबडतोब घरी आले होते. मात्र आताही शर्मिलाच्या मनात तो प्रश्न सारखा घोळतच होता.

***********************

किमान एक वर्ष झाला होता. शर्मिला आपल्या गावात होती. तसा एक प्रश्न तिच्या मनात घोळतच होता. तो प्रश्न होता इमरानच्या जीवनातील. आबेद कबरीतून

म्हणाला होता की इमरानसारखं आयुष्य आपल्यालाही जगावं लागलं असतं. त्याच प्रश्नाच्या गुंताळ्यात तिनं एक वर्ष काढला होता. परंतु अजुनही तिला त्या प्रश्नाचं उत्तर सापडलं नव्हतं. तशी ती त्याच प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी परेशान होती. कधीकधी इमरान बकऱ्या घेण्यासाठी यायचा. ती त्याला विचारायची. परंतु तो त्याला वेळ नाही, असं सांगून टाळायचा.

आज त्या गोष्टीला एक वर्ष झालं होतं. त्या प्रश्नाचं उत्तर तिला काही सापडलं नव्हतं. त्यातच तो पावसाळा सुरु झाला होता.

शर्मिला तशी दर पावसाळ्यात गावाला एकदा तरी येत असे. याही पावसाळ्यात ती गावाला आली होती. त्यातच तिला तो वर्षभर सतावणारा प्रश्न आजही सतावू लागला होता. तशी ती ताबडतोब इमरानच्या घरी गेली. म्हणाली,

"इमरान, तुला आठवतंय का ती एक गोष्ट?"

शर्मिलाचं ते बोलणं. ते ऐकून इमरान म्हणाला,

"कोणती गोष्ट?"

"तुला आठवतंय, मागील वर्षी आपण आबेदच्या कबरीजवळ गेलो होतो. त्यावेळेस मी म्हटलं होतं की कबर बोलते काय? त्यावर तू म्हटलं होतं की कबर बोलत नाही. तुला काहीतरी भाषच होतोय. माहीत आहे त्यावेळेस मी तुला एक प्रश्न विचारला होता. ज्याचं उत्तर तू टाळलं होतं."

"कोणता प्रश्न?"

"मी म्हटलं होतं की कबर बोलते व या आबेदच्या कबरेनं मला एक प्रश्न केलाय. तो म्हणजे मी जर आबेदशी विवाह केला असता तर माझी आणि त्याची

अवस्था ही तुझ्यासारखी होईल. ते मला काही नीट समजलेलं नाही. नक्कीच त्याला काय म्हणायचं होतं?"

इमराननं तो प्रश्न ऐकला. सुरुवातीला त्यानं आढेवेढे घेतले व नंतर तो म्हणाला,

"कदाचीत त्याला हे म्हणायचे असेल की आम्हाला आमचं स्वतःचं मत नसतं. कोणतेही निर्णय घेतांना ते काजीलाच विचारुन घ्यावे लागतात. तुमच्या धर्मात तुम्हाला कोणतेही निर्णय घेतांना पंडीतांना विचारलं पाहिजे, असा दृष्टीकोन नसतो. शिवाय आम्ही विवाह करतांना फक्त दूध पाळतो. याचाच अर्थ सख्ख्या बहिणीशी विवाह करीत नाही. इतर सर्वांशी विवाह करायला आम्हाला मोकळीक आहे. तुमच्या धर्मात तुम्ही धर्माला तेवढं स्थान देत नाही. आम्ही धर्माला फार मोल देतो. धर्मासाठी कटतो देखील आणि काटतो देखील. जर तू आबेदशी विवाह केला असता. तर तूही मुस्लीम झाली असती आणि तूही धर्म धर्म करीत ज्यानं मुस्लीम धर्माला दोष दिला असता. मग तो कितीही चांगला का असेना, आपला सगळा संबंधी का असेना. त्याचीही हत्या केली असती. हेच त्याला म्हणायचं असेल. जे तुमच्या धर्मात घडत नाही. म्हणूनच तुमच्या धर्माला कोणीही काहीही म्हणून जातात. तसं आमच्या धर्माला म्हणत नाहीत. आमच्यासाठी आमचा धर्म महत्वाचा आहे. हाच फरक आहे तुमच्या आणि आमच्या धर्मात. आमच्या धर्मातील प्रत्येक मुसलमान हा काटेकोरपणानं धर्म पाळतो. धर्माच्या नियमांचे काटेकोर पणानं पालन करतो आणि जो काटेकोर पालन करीत नाही, त्याची आमचा धर्म हत्याच करुन टाकतो. म्हणूनच आमच्या धर्मात काफिरांना किंचीतही स्थान नाही. पाकिस्तानात तर काफिरांना मुसलमानच समजत नाही. तसंच पाकिस्तानचं संविधान सांगतं. तसंच

ह्या सर्व गोष्टी मी आजपर्यंत करीत आलेलो आहे. महत्वाचं म्हणजे माझ्यासाठीही धर्म महत्वाचा आहे. मिहीधर्मासाठीच जगतो. हेच आबेदला सांगायचं असेल कदाचीत."

शर्मिलाला आता कळलं होतं, आबेद कबरीतून काय बोलला होता ते. तिला आता आपल्या धर्माचा अभिमान वाटायला लागला होता व तिला आपल्या प्रेमाची चीड यायला लागली होती. आता तिला पश्चाताप वाटू लागला होता की आपण एका मुस्लीम व्यक्तीवर प्रेम करायला नको होतं. हं, प्रेमच करायचं होतं तर ते आपल्याच बिरादरीतील एखाद्या हिंदूच व्यक्तीशी करायला हवं होतं.

तिला आता धर्माचा सन्मान माहीत झाला होता. जेव्हा इमराननं तिचे डोळे उघडले होते. आता ती खुश होती आपल्या पतीसोबत. त्यातच ती आपलं उर्वरीत आयुष्य काढू लागली होती. आता तिला राग येत असे, जर ती ऐकत असे, एखादी मुलगी अमूक अमूक मुस्लीम मुलाशी पळून गेलेली आहे. वाटत असे की ती मिळाल्यास तिला ती करकर कापून टाकेल. कारण तिच्या मनात आपल्या धर्माबाबत प्रेम तर दुसऱ्या परकीय धर्माबद्दल तेवढाच तिटकारा निर्माण झाला होता.

शर्मिलानं वाचली होती ती पुस्तक. ज्यात आबेदला झालेल्या वेदना लिहिल्या होत्या. आबेद पाकिस्तानात का गेला? त्याचं वर्णन सुद्धा लिहीलं होतं. त्यातच त्या गावात असतांना ते पावसात भिजणं. शिवाय नवरदेव नवरीचा खेळ. त्यातच त्या समुद्रात जावून विहरणं. वाळूत नाव लिहिणं. सारंच लिहिलं होतं. आता तिला आठवत होतं त्याचं नाव लिहिणं आणि तेही आठवत होतं, हाताची नस कापणं.

आजपर्यंत त्या हाताच्या नस कापण्याचा उलगडा तिला झाला नव्हता. परंतु आता तिला समजून येत होतं की ती नस विधात्यानंच तिला कापायला लावली असेल, असंच तिला आज वाटत होतं. आबेद त्याच दिवशीपासून तिच्या जीवनातून कितीतरी दूर जाणार होता. याचा संकेत विधात्यानं तिला दिला होता. कारण जी नस कापली गेली होती. ती नस तिच्या हातावर कोरलेल्या आबेद नावाला दुभंगून कापली गेली होती. ते आबेद नाव दुभंगून गेलं होतं व त्या आबेद नावाला दुभंगून टाकून त्या कटलेल्या नसंनंच आबेद या नावाचा नव्हे तर आबेदचाच भारत पाकिस्तान बनविल्याचं दाखवलं होतं. कदाचीत तो आबेद आजपासून तुझा नाही. याचा संकेत त्या नसंनं दिला होता.

ते नाव तिनं व त्यानं हातावर का गोंदवलं? त्याचंही एक कारण होतं. त्याचं कारण होतं त्या नावाचं मिटणं. त्यांनी बरेचदा पाहिलं होतं की ते नाव वाळूवर लिहिल्यावर जेव्हा समुद्राची लाट येत असे. त्यात ते नाव मिटल्या जात असे. ते पाहून त्यानं आपल्या शरीरावरच शर्मिला नाव गोंदवून टाकलं होतं. अन् तिनंही आबेद नाव आपल्या हातावर गोंदवलं होतं.

आज तिला अचानक आठवलं होतं की हे सारं विधात्यानंच घडवून आणलं होतं. त्या विधात्यालाच जणू तिच्या प्रेमाचा स्विकार नव्हता. म्हणूनच की काय, विधात्यानंच तिला नस कापायला लावली होती. तिच्या प्रेमाचा भारत पाकिस्तान बनू नये यासाठी. कदाचीत तिचं प्रेम जर यशस्वी झालं असतं तर आज चित्र निराळं असतं. आज ती त्याचेसोबत भारतात नाही तर पाकिस्तानात राहिली असती, तेही बुरख्यात. ते बुरख्यातीलच जीवन तिला कापावं लागलं असतं शेवटपर्यंत. शिवाय ना तिला स्वतंत्र्य राहता आलं असतं भारतात जशी वागत होती ती तशी. ना तिला

मुलांच्या पैदा करण्यावर कात्री लावता आली असती. शिवाय तिचं शोषणच झालं असतं अखेरपर्यंत.

***********समाप्त***********



# *अंकुश रा. शिंगाडे

*जन्मतारीख: ०३/०३/१९७७

*शिक्षण: एम ए, डी एड

## *प्रकाशित छापील साहित्य:

***कवितासंग्रह***

१)स्वातंत्र्याची गाणी २)आजादी के गीत(हिन्दी) ३)अश्रूंची गाणी ४) राजवाडा

***कादंबरी***

१)वेदना २)कंस ३)संघर्ष ४)चर्मयोगी

***कथासंग्रह***

१)मजेदार कथा २)चित्तथरारक ३)फोनच्या करामती ४)हरवलेलं बालपण ५)स्मशानाची राख ६)निकाल ७)अजून किती ८)निराशा

***लेखसंग्रह***

१)माझे शिकविण्याचे प्रयोग २)गतकाळातील शास्त्रज्ञ आणि शोध ३)अस्तित्व ४)अस्तित्वाची पाऊलवाट शोधतांना

***चारोळीसंग्रह***

१)आक्रमण

***प्रवासवर्णन***

१)प्रवास २)प्रवासातील गमतीजमती


*महाराष्ट्रात वेगवेगळ्या वृत्तपत्रातून साहित्य लेखन*










**अंकुश शिंगाडे यांची ई साहित्यवर उपलब्ध ईपुस्तके**
**ज्या कव्हरवर एक क्लिक कराल ते पुस्तक उघडेल.**






अंकुश शिंगाडे
चांद्रयान
कादंबरी


अंकुश शिंगाडे
शापित नदी
सरस्वती



अंकुश शिंगाडे
प्रवास
तिरुपती बालाजीचा



अंकुश शिंगाडे
सुजाता


अंकुश शिंगाडे
संस्कार



अंकुश शिंगाडे
मृत्यूदंड



अंकुश शिंगाडे
NOT
FOR SALE
वारांगना


अंकुश शिंगाडे
कोहीनूर


अंकुश शिंगाडे
संजय












अंकुश शिंगाडे

यांची ई साहित्यवर उपलब्ध ईपुस्तके

ज्या कव्हरवर एक क्लिक कराल ते पुस्तक उघडेल.




















http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/bappa_rawa
df



























अंकुश शिंगाडे
भुताटकी

रा
जा
दा
हि
र
अंकुश शिंगाडे

अंकुश शिंगाडे
घटस्फोट

अंकुश शिंगाडे
महाराणी संयोगीता आनि
पृथ्वीराज

अंकुश शिंगाडे
मा
र्ग
अर्जूनचा

अंकुश शिंगाडे
लेखक

अंकुश शिंगाडे
लिखीत
गोविंद गोपाळ गायकवाड
कादंबरी

अ
स्ति
त्व
अंकुश शिंगाडे

अंकुश शिंगाडे
कामगार

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सतरावे वर्ष.
# श्री अंकुश शिंगाडे यांचे ईसाहित्यवर हे एक्केचाळीसावे पुस्तक.

अंकुश शिंगाडे एक शिक्षक आहेत. शिक्षक ही त्यांची केवळ उपजीविका नाही तर जीविकाही आहे. समाजात सत्याचे आणि विज्ञानाचे ज्ञान पसरावे व समाज मनाने बळकट व्हावा, त्यातही मुलींनी शिकावे व त्यांच्या आत्मनिर्भरतेने समाजाला अधिक बळकटी यावी हे त्यांचे स्वप्न आहे. ते भरपूर लिहीतात ते समाजातील दबल्या गेलेल्या घटकांना आवाज देण्यासाठी. आपली पुस्तके समाजात जास्त वाचली जावीत असे त्यांना वाटते आणि ई साहित्य हे त्या दृष्टीने त्यांन योग्य वाटते. त्यांची आजवर २४ छापील पुस्तकेही विविध प्रकाशकांनी प्रकाशित केली आहेत व त्यांच्या पुस्तकांना मागणी आहे. पण तरीही ते आपली पुस्तके ई साहित्यच्या वाचकांना विनामूल्य देतात.

अंकुश शिंगाडे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१५), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (१०), डॉ. नितीन मोरे (५२ पुस्तके), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (२), मधुकर सोनावणे

(१२), अनंत पावसकर (१२), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी (५१), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४१), आनंद देशपांडे (३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (२), अरुण कुळकर्णी (१२), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), श्याम कुलकर्णी (२०), किशोर कुलकर्णी, रामदास खरे (५), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (१०), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (५), श्रीरंग कौलगी (४), यशवंत कदम (७), पांडुरंग सूर्यवंशी (३), सुधीर कारखान्नीस (४), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३), श्रीराम काळे (५), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी (३) रामकृष्ण बाक्रे(३) दिगंबर सलगर(२), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, उत्कृष्ट लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली उत्तमोत्तम पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।